# मिरा भाईंदर महानगरपालिका

महापालिका सभागृह कार्यालय,
तिसरा मजला,
दि. १७/११/२००६

आज दि. १७/११/२००६ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा सकाळी ११.०० वाजता सभा सुचना क्र. ०८ दि. ०६/११/२००६ रोजीच्या विषयपत्रिकेवर विचार विनिमय करणेकरिता महापालिका सभागृह, ३ रा मजला येथे मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली भरली असता खालीलप्रमाणे सदस्य हजर होते.

## उपस्थित सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्रीम. निर्मला बाबुराव सावळे | महापौर |
| २) | श्री. चंद्रकांत सिताराम वैती | उपमहापौर |
| ३) | श्री. मेन्डोसा स्टिवन जॉन | सभापती, स्थायी समिती |
| ४) | श्री. हॅरल जॉर्ज बोर्जीस | सभागृह नेता |
| ५) | श्री. पाटील परशुराम दामोदर | विरोधी पक्षनेता |
| ६) | श्रीम. जयाबाई यशवंत भोईर | सभापती, महिला व बालकल्याण समिती |
| ७) | श्रीम. संगिता विजय म्हात्रे | उप-सभापती, महिला व बालकल्याण समिती |
| ८) | श्री. चिंतामण कमलाकर पाटील | सभापती, गलिच्छ वस्ती निर्मुलन समिती |
| ९) | श्री. अशोक बळवंत पाटील | सदस्य |
| १०) | श्री. अनंत रामचंद्र पाटील | सदस्य |
| ११) | श्रीम. डिसोझा ज्युडी थॉमस | सदस्या |
| १२) | श्री. शेख आसिफ गुलाब | सदस्य |
| १३) | श्री. ठाकुर नितिन गोपीनाथ | सदस्य |
| १४) | श्री. म्हात्रे मिलन वसंत | गटनेता |
| १५) | श्रीम. म्हात्रे नयना गजानन | सदस्या |
| १६) | श्री. अग्रवाल धनराज नंदलाल | सदस्य |
| १७) | श्री. अग्रवाल ओमप्रकाश गंगाधरजी | सदस्य |
| १८) | श्रीम. करंबेळे प्रियांका प्रकाश | सदस्या |
| १९) | श्री. सिंग मदन उदितनारायण | सदस्य |
| २०) | श्री. रोहिदास शंकर पाटील | गटनेता |
| २१) | श्रीम. पाटील प्रभात प्रकाश | सदस्या |
| २२) | श्री. भुदेका शिवप्रकाश प्रल्हादराय | सदस्य |
| २३) | श्री. भोईर गजानन लक्ष्मण | सदस्य |
| २४) | श्री. नलावडे दिनेश दगडू | अध्यक्ष, प्रभाग समिती क्र. ०३ |
| २५) | श्रीम. पाटील सुनिता कैलास | सदस्या |
| २६) | श्रीम. पाटील लिला गुरुनाथ | सदस्या |
| २७) | श्री. पाटील प्रफुल्ल काशिनाथ | सदस्य |
| २८) | श्री. रविंद्र भीमदेव माळी | गटनेता |
| २९) | श्री. घरत केशव रामभाऊ | सदस्य |
| ३०) | श्रीम. हसनाळे ज्योत्स्ना जालिंदर ऊर्फ शिंदे पुजा प्रताप | सदस्या |
| ३१) | श्रीम. अनिता जयवंत पाटील | सदस्या |
| ३२) | श्री. म्हात्रे परशुराम पद्माकर | सदस्य |
| ३३) | श्री. गावंड हरेश लक्ष्मण | सदस्य |
| ३४) | श्री. आसिफ गुलाम पटेल | सदस्य |
| ३५) | श्री. भोईर सुर्यकांत अनंतराव | सदस्य |
| ३६) | श्रीम. सुरेखा यशवंत गायकवाड | सदस्या |
| ३७) | श्री. मोदी चंद्रकांत भिकालाल | सदस्य |
| ३८) | श्री. खान शफीक अहमद | सदस्य |
| ३९) | श्रीम. सय्यद नुरजहाँ नझरहुसेन | अध्यक्षा, प्रभाग समिती क्र. ०४ |

| | | |
|---|---|---|
| ४०) | श्रीम. उमा विश्वनाथ सपार | सदस्या |
| ४१) | श्रीम. फॅरो ग्रिटा स्टीफन | सदस्या |
| ४२) | श्री. रोहिदास आत्माराम पाटील | सभापती, आरोग्य परिरक्षण समिती |
| ४३) | श्रीम. मेंडोंसा मायरा गिल्बर्ट | प्रथम महापौर |
| ४४) | श्री. कुरेशी याकुब इस्माईल | सदस्य |
| ४५) | श्री. कोलासो लिओ इजिदोर | अध्यक्ष, प्रभाग समिती क्र. ०१ |
| ४६) | श्रीम. जेन्वी युस्टस आल्मेडा | सदस्या |
| ४७) | श्रीम. ऊर्मिला कोमल भामरे | सदस्या |
| ४८) | श्री. घोन्सालवीस जोजफ जॉन | सदस्य |
| ४९) | श्रीम. जैन गिता भरत | सदस्या |
| ५०) | श्री. रॉड्रिक्स मॉरस जोजफ | सदस्य |
| ५१) | श्रीम. शाह रिटा सुभाष | सदस्या |
| ५२) | श्रीम. चौहाण महेंद्रसिंग | अध्यक्ष, प्रभाग समिती क्र. ०२ |
| ५३) | श्री. पाटील ध्रुवकिशोर मन्साराम | सदस्य |
| ५४) | श्रीम. नरावत भवरीकुंवर चेनसिंह | सदस्या |
| ५५) | श्री. पाटील रतन कृष्णा | गटनेता |
| ५६) | श्री. पाटील शरद केशव | सदस्य |
| ५७) | श्रीम. गोयंका सुधा लक्ष्मीकांत | सदस्या |
| ५८) | श्री. शशिकांत जगन्नाथ भोईर | गटनेता |
| ५९) | श्रीम. मुक्ता प्रविण रांजणकर | सदस्या |
| ६०) | श्री. प्रेमनाथ गजानन पाटील | सदस्य |
| ६१) | श्रीम. नाईक शुभांगी सिताराम | सदस्या |
| ६२) | श्री. मेहता नरेंद्र | सदस्य |
| ६३) | श्री. तुळशिदास दत्तु म्हात्रे | सदस्य |
| ६४) | श्री. जैन रमेश धरमचंद | सदस्य |
| ६५) | श्री. दुबोले प्रकाश शंकर | नामनिर्देशित सदस्य |
| ६६) | श्री. पांगे संजय नारायण | नामनिर्देशित सदस्य |
| ६७) | श्री. सुवर्णा रोहित मोहनचंद्र | नामनिर्देशित सदस्य |
| ६८) | श्री. टेरी पॉल परेरा | नामनिर्देशित सदस्य |

## गैरहजर सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्रीम. गोविंद हेलन जॉर्जी | सभापती, पुर्व प्राथमिक व माध्यमिक शिक्षण समिती |
| २) | श्री. तिवारी सुरेंद्रप्रसाद मुरलीधर | सदस्य |
| ३) | श्रीम. गोहिल शानु | सदस्या |
| ४) | श्री. पांडे हंसु कमलकुमार | गटनेता |
| ५) | श्री. पाटील जयंत महादेव | सदस्य |
| ६) | श्री. पाटील अशोक पांडुरंग | सदस्य |
| ७) | श्री. कोलासो जेम्स इजिदोर | सदस्य |
| ८) | श्रीम. जानी कैलासबेन दिनेशचंद्र | सदस्या |
| ९) | श्रीम. शाह रक्षा एस. | सदस्या |
| १०) | श्री. पाटील मिलन गोविंदराव | सदस्य |

## रजेचा अर्ज दिलेले सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्रीम. वाडे जिवी हिरा | सदस्या |
| २) | श्री. गावंड आत्माराम बाळाराम | सदस्य |
| ३) | श्रीम. पाटील भानु भगवान | सदस्या |
| ४) | श्री. शशिकांत रतिलाल शहा | सदस्य |
| ५) | श्री. मोहन मधुकर पाटील | सदस्य |
| ६) | श्री. ठाकूर प्रकाश पांडुरंग | नामनिर्देशित सदस्य (सभापती, शिक्षण मंडळ) |

**नगरसचिव :-**

मा. महापौर मॅडमच्या निर्देशाप्रमाणे काँग्रेसमध्ये विलीन झालेल्या आघाडीगटाने सुरुवातीपासून चौथ्या लाईनमध्ये बसण्याची व्यवस्था करण्यात येत आहे आणि राहिलेल्या जागेपासून भारतीय जनता पार्टीने बसावे अशी मी मा. महापौरांच्या वतीने विनंती करतो. सर्वांनी राष्ट्रगीताला उभे रहायचे आहे. राष्ट्रगीत वंदे मातरम एक साथ शुरू कर.

('' वंदे मातरम '' या राष्ट्रगीताने सभेला सुरूवात करण्यात आली.)

**मा. महापौर :-**

नमस्कार महानगरपालिकेच्या सभागृहात १७ नोव्हेंबर,२००६ च्या सभेला उपस्थित असलेले या शहराचे उपमहापौर मा. चंद्रकांत वैतीजी, मा. आयुक्त सुदामराव गायकवाडसाहेब, सभागृह नेते मा. हॅरल बोर्जीस, विरोधी पक्ष नेते सन्मा. परशुराम पाटीलसाहेब, स्थायी समितीचे सभापती स्टिवन मेन्डोसासाहेब, सर्व पक्षाचे सन्मा. गटनेते, सर्व प्रभाग समितीचे सन्मा. अध्यक्ष, सर्व समित्यांचे सन्मा. सभापती, सर्व सन्मा. नगरसेवक व नगरसेविका, महापालिकेचे सचिव हरेश पाटील, सर्व सन्मा. उपायुक्त, सर्व विभागाचे खात्याचे अधिकारी वर्ग, सर्व वृत्तपत्राचे गॅलरीत बसलेले प्रतिनिधी, प्रेक्षक गॅलरीतील सर्व नागरीक बंधू आणि भगिनींनो मिरा - भाईंदर शहरातील काही खेळाडूंनी आंतरराष्ट्रीय स्तरावर पुरस्कार प्राप्त करुन आपल्या मिरा - भाईंदर शहराचे नावलौकिक वाढवलेला आहे. याचा आपल्या सर्वांना अभिमान आहे. आजच्या या मा. महासभेत सदर व्यक्तिंचा सत्कार आयोजित केलेला आहे. प्रथम भाईंदर गीता नगर येथे राहणारे मिल्टन डिसोझा यांनी तिसऱ्यावेळी मिरा - भाईंदर महानगरपालिकेच्या वतीने अमेरीका येथे आंतरराष्ट्रीय जागतीक किंक बॉक्सिंग चॅम्पियनशीपमध्ये भाग घेउन महानगरपालिकेतर्फे मिळालेले अनुदान घेउन त्यांना पाठवण्यात आले होते. आणि त्यांनी मिरा - भाईंदर शहराचे प्रतिनिधित्व करुन तिसऱ्यांदा पदक मिळवून पुरस्कार प्राप्त केलेला आहे. तसेच, द्वितीय कोलोंबो श्रीलंका येथील आंतरराष्ट्रीय स्तरावर झालेल्या कराटे स्पर्धेत मिरारोड पुर्व, शितल नगर येथे राहणारी श्रीमती शर्मिला रतन घारु यांनी कराटे स्पर्धेत एक सुवर्ण पदक व दोन कांस्य पदक मिळवून पुरस्कार प्राप्त केलेला आहे. त्यांचाही आज आपण सत्कार करणार आहोत. तृतीय, भाईंदर कोळीवाडा येथील तानाजी पांडूरंग जाधव यांचा उत्कृष्ठ कामगार म्हणून मुंबई पोस्ट लेखाविभागातर्फे त्यांनी पुरस्कार प्राप्त केलेला आहे. सदर तिनही व्यक्ति मिरा - भाईंदर शहराचे नागरिक असुन यांनी प्राप्त केलेला पुरस्कार ही अभिमानास्पद गोष्ट आहे. सभागृहाच्यावतीने तसेच शहरातील नागरिकांच्यावतीने त्यांचे आपण अभिनंदन करुया. या मिरा - भाईंदर शहरातील नागरीकांना मुलभुत सोयी - सुविधा उपलब्ध करुन देत असतांना प्रशासनाने नुकताच महाराष्ट्राचे आदरणीय मुख्यमंत्री विलासरावजी देशमुख यांच्याकडे जो जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरिक पुनःर्निर्माण अभियानाचा सी. डी. पी. जो सादर केला होता. या सुविधा आणि यातून मिळणारे अनुदान हे आपल्या शहराला लवकरात लवकर मिळावे म्हणून आज सभेपुढे आर्थिक प्रशासकिय मंजूरीसाठी हा विषय ठेवण्यात आलेला आहे. त्याच बरोबर इतरही विषय आहेत. आपण सर्व सभागृहाच्या सन्मा. सदस्यांनी या विषयाना चांगल्याप्रकारे खेळीमेळीच्या वातावरणात चर्चा घडवून आणून सहकार्य करावे. अशी मी विनंती करते. धन्यवाद! सन्मा. सचिवांनी कामकाजाला सुरूवात करावी.

**नगरसचिव :-**

मा. महापौरांच्या परवानगीने या सुचनेद्वारे आपणास कळविण्यात येते की, मिरा - भाईंदर मनपा ची मा. महासभा शुक्रवार दि. १७/११/२००६ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा - भाईंदर मनपाचे मुख्य कार्यालय तिसरा मजल्यावरील सभागृहात महासभा सुचना क्र. ८ दि. ६/११/२००६ रोजीच्या सोबतच्या विषय पत्रिकेवर प्रकरणावर विचार विनिमय करण्यासाठी सभा आयोजित करण्यात येत आहे. आजच्या सभेत मा. महापौरांनी तीन लोकांचे सत्कार करण्याचे ठरविले आहे. त्यापैकी श्री. मिल्टन डिसोझा हे काही कारणास्तव हजर राहीलेले नाहीत. दुसरे आहेत श्रीम. शर्मिला रतन घारु ह्याही काही कारणास्तव हजर राहीलेल्या नाहीत. तिसरे जे आहेत तानाजी पांडूरंग जाधव हे उत्कृष्ट कामगार म्हणून मुंबई पोस्ट लेखाविभागातर्फे त्यांचा सत्कार करण्यात आलेला आहे. याबद्दल मिरा - भाईंदर महानगरपालिकेच्या वतीने मा. महापौर त्यांच्या सभागृहात सत्कार करीत आहे.

(मा. महापौरांनी श्री. तानाजी जाधव ह्यांचा सभागृहासमोर सत्कार केला.)

**रिटा शाह :-**

मा. महापौर मॅडम, यांच्या परवानगीने बोलत आहे की, सन्मा. वैती साहेब, मागच्या मिटींगमध्ये आणि त्याच्या पुढच्या मिटींगमध्ये मा. उपमहापौर चंद्रकांत वैती साहेब आणि काँग्रेस पक्षाचे सर्व सन्मा. नगरसेवक यांनी एक लक्षवेधी पाण्याबद्दल ठेवली होती. तेंव्हा मा. महापौरांनी रुलिंग दिली होती, की पुढच्या महासभेमध्ये आपण रितसर विषय म्हणून घेउ. त्यानंतर मा. महासभा झाली त्याच्यामध्ये विषय घेतला नाही आणि आता तिसरी मा. महासभा लागली आहे. पण ह्याच्यावरसुद्धा पाण्याचा विषय दिसत नाही. म्हणून मला असे वाटत आहे की, या सभागृहाला पाण्याविषयी चर्चा करणे किंवा त्याच्यावरती काही निर्णय लावणे महत्त्वाचे वाटत नाही आणि मा. उपमहापौर आणि काँग्रेस पक्षाचे सन्मा. नगरसेवक यांनी अती महत्त्वाचा विषय लक्षवेधी म्हणून ठेवला होता. तो विषय म्हणून आपण विषयपटलावर घेतलेला नाही. म्हणून काँग्रेस पक्षाचे सर्व सन्मा. नगरसेवक सदर विषयाचा मी निषेध व्यक्त करत आहे आणि मी सभात्याग करते असा मी ठराव मांडते.

**एस. ए. खान :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलत आहे की, पाण्याचा विषय घेतलेला नाही आणि टँकरचा जो कारभार चालला आहे. मिरारोड मध्ये तो कोणाच्या आदेशाने मोफत टँकर देण्यात आले. ह्याचे पुरावे माझ्याकडे आहेत.

**सुरेखा गायकवाड :-**

मा. महापौरांच्या परवानगीने ठराव मांडत आहे.

**मा. महापौर :-**

सर्व सन्मा. सदस्यांनी बसून घ्या. मला बोलू द्या.

**सुरेखा गायकवाड :-**

मा. महापौर मॅडम, मी एक ठराव मांडत आहे.

**मा. महापौर :-**

या शहराचे मा. उपमहापौर.....

**रोहिदास पाटील :-**

सन्मा. सदस्या रिटा शाह मॅडम यांनी केलेल्या निवेदनामध्ये सभागृहाला कळकळ नाही असे नाही. सत्ताधारी पक्षाला......

**रतन पाटील :-**

या शहरात पाण्याचा ज्वलंत असा प्रश्न आहे. त्याबाबत पहिल्यांदा निवेदन करायचे तर आपण दुसरेच निवेदन करत आहात.

**सुरेखा गायकवाड :-**

खंडारा जिल्ह्यातील गावामध्ये दलित कुटूंबातील दोन महिलांची विटंबना करुन चार व्यक्तिंची निर्घृण हत्या करण्यात आली. या अंगावर शहारे आणणारे व माणूसकीला काळीमा फासणाऱ्या घटनेचा मी निषेध करत आहे व असा मी ठराव मांडत आहे.

**रतन पाटील :-**

आपण सुद्धा कशाला बसायचे? मिरा - भाईंदर शहराला पाणी पाहीजे आंम्हाला व सर्व जनतेला पाणी पाहीजे आहे. आम्ही कशाला बसायचे. जर सत्ताधारी पाण्यासारख्या विषयासाठी लढतात तर ह्या जनतेला पाणी नको का? पाणी द्या. अन्यथा आम्ही खाली बसतो.

(काँग्रेस पक्षाच्या सर्व सन्मा. सदस्यांनी दु. १२.०५ वा. सभात्याग केला.)

**रोहिदास पाटील :-**

महापौर मॅडम, काँग्रेस, मी त्याच्यामध्ये दुरुस्ती सुचवीत आहे. सन्मा. सदस्या रिटा शाहा मॅडम यांनी केलेल्या निवेदनामध्ये ही सत्य स्थिती आहे की त्यांच्या निवेदनामध्ये मोठी गफलत झालेली आहे. त्यांनी केलेल्या निवेदनाबद्दल सभागृहाला जाणीव नाही, असे नाही. सत्ताधारी पक्षाला त्याची जाण नाही. तो दोष सत्ताधारी पक्षाला जात आहे. त्यातील अर्धा सत्ताधारी पक्ष बाहेर गेला असेल पण आम्ही बाहेर जाणार नाही.

**लिओ कोलासो :-**

मा. महापौर साहेबा, आमचा ह्या गोष्टीला आक्षेप आहे की, सत्ताधारी पक्षाला काहीच पडलेले नाही. हे असे सन्मा. सदस्य रोहिदास पाटील बोलले.....

(सभागृहात गोंधळ)

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य आपण सर्वांनी कृपया बसुन घ्यावे.

**शिवप्रकाश भुदेका :-**

जो साडेचार साल से ठराव पढते नही थे उसके पहीलेही अनुमोदन तयार था। अभी एक आदमी अंदर नही है। अभी आप ठराव पढोगे तो अनुमोदन के लिए एकभी आदमी नही है।

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य शिवप्रकाश भुदेकाजी आपको बोलने के लिए परमिशन नही दिया गया है।

**महेंद्रसिंग चौहान :-**

अनुमोदन की जरुरत नही है। जो मॅडम बोल रही है वह सुननेकी जरुरत है। अगर आप लोग बचे हुए है तो आप सुनिए वो क्या बोल रही है। हम लोगों को कितनी जानकारी है पानी के बारे में कितना हम लोग मेहनत कर रहे है। लेकीन अब जो जा चुके है वह जा चुके है। लेकिन आप तो सुनिए ना।

**शरद पाटील :-**

पानी के बारे में सभा लेना चाहिए ना। आपको इस बारेमें बहुत जानकारी है और आप इस बारेमें बहुत मेहनत कर रहे है। उसबारेमें हमको शंका नही है। लेकीन जो पानी के बारेमें खास सभा लगाने की थी वह सभा क्यों नही लगाई? जरुरत क्या है? यह उसके बारेमें तिसरी सभा हो रही है।

**महेंद्रसिंग चौहान :-**

शहर के विकासकी अगर आपको पडी है तो सुनिए।

**शरद पाटील :-**

जैसे के शहर विकास के बारे में नही पडी है।

(सभागृहात गोंधळ)

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य खाली बसावे.

**रोहिदास पाटील :-**

मा. महापौर मॅडम, आपण पाण्याचा विषय का घेत नाही. हा मुद्दा आहे ना.

**शरद पाटील :-**

आपण विषय का घेत नाही. त्याचे आंम्हाला पहिल्यांदा उत्तर द्या.

**रोहिदास पाटील :-**

आपण तो विषय का घेत नाही. हा आमचा मुद्दा आहे ना. त्यांच्या या विषयाशी आम्ही सहमत नाही. त्यांची जी भावना आहे त्याच्याशी आम्ही सहमत आहोत. आपण हा एवढा जिव्हाळ्याचा विषय, आपण रुलिंग देता. पिठासीन अधिकारी मा. महापौर म्हणून आपण रुलिंग देता.

**हॅरल बोर्जीस :-**

सन्मा. सदस्य रोहिदास पाटीलजी जेवढी आस्था आणि कळकळ आपल्याला आहे ना. तेवढीच आस्था आणि कळकळ सत्ताधारी पक्षालाही आहे.

**रोहिदास पाटील :-**

पुढच्या सभेमध्ये विषय घेण्याकरिता आपली असमर्थता काय आहे तेही आपण सांगा.

**हॅरल बोर्जीस :-**

सदरचा विषय सभागृहासमोर कशाकरिता आला नाही त्याचे स्टेटमेंट त्यांचे वक्तव्य मा. महापौर मॅडम, करत होत्या. परंतु, आपली मानसिकता ऐकण्याची नव्हती. अजूनही जर मानसिकता असेल तर मा. महापौर मॅडम जे वक्तव्य करत आहे ते आपण ऐका.

**रतन पाटील :-**

साहेब, आपण मानसिकतेचा प्रश्न सोडून दया.

**रोहिदास पाटील :-**

आपण त्या भ्रमात राहू नका.

**शरद पाटील :-**

आपणच लोकांच्या मानसिकतेचा कधीही विचार केला नाही.

(सभागृहात गोंधळ)

**रोहिदास पाटील :-**

मा. महापौर मॅडम, आपली सभा सायं. ७.०० वा. पर्यंत चालेल. आपण सावकाश घ्या. काही घाई करु नका. आम्ही तुम्हाला प्रेमाने विचारतो, आदर ठेवून विचारतो की, तुम्हीच रुलिंग दिले होते की, पाण्याचा प्रश्न अत्यंत जिव्हाळ्याचा आहे आणि तुम्हालाही जाणवते तुमच्याही इमारतीत पाणी नाही. ही आजची स्थिती आहे. म्हणून त्याच्यावर एक सभा बोलवा. खरोखरच आपले कामकाज कुठपर्यंत चालले आहे ते सांगा. आपल्यामध्ये असे कोण आहेत का? शुक्राचार्य की, ज्यांच्यामुळे येणारी योजना थांबते की, केलेल्या कामाला यश येत नाही अशी अपेक्षा सभागृहाची आहे. ह्यांची आम्हाला ही खात्री आहे की, तुम्ही उठून लगेच उदयाला पाणी देणार नाहीत. कोणी देणार नाही. पण जे काम चालले आहे किंवा जी वस्तूस्थिती आहे त्याच्यावर निवेदन होणे गरजेचे आहे आणि हे सभाशास्त्र आहे. तुम्ही पिठासिन अधिकारी आहात. मा. उपमहापौर रागाने कशाला गेलेत हे माहित नाही , पण ते गेले. त्याचे काही ठरले असेल. पण आमची अशी अपेक्षा आहे की, ह्याच्यावर निवेदन होणे गरजेचे आहे. आपण का विषय घेतला नाही?

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य आपण बसून घ्या. त्याच विषयाला खुलासा करत असताना आपण उठून उभे राहून बोलायला लागले. आणि एक आपल्या माहितीसाठी सांगते की, आपण जेव्हा बोलत असता तेव्हा आपले जे इतर सन्मा. सदस्य आहेत ते एकत्र उठून बोलत असतात. कृपया करून आपण एकेकांनी बोलावे प्रत्येकाला बोलण्याची संधी दिलेली आहे.

**शिवप्रकाश भुदेका :-**

आप हम को बोलो की हमे इतना टाईम बोलने को मिलेगा तभी हम लोग ऐसा करेंगे।

**मा. महापौर :-**

आपका जो प्रतिनिधीत्व कर रहे है वह बोल रहे है। तो आप सुचना देंगे तो भी चलेगा।

**शिवप्रकाश भुदेका :-**

आपकी बात बराबर है। हम हमारे वॉर्ड का प्रतिनिधत्व करते है।

**शरद पाटील :-**

मा. महापौर मॅडम, आम्ही असे उठत नाही. पण जेव्हा ते लोक उठतात म्हणून आम्हाला उठायला लागते.

**शिवप्रकाश भुदेका :-**

अभी सन्मा. सभागृह नेते इन्होंने बोल दिया की मानसिकता नही है...

**शरद पाटील :-**

आपण त्यांना बसायला सांगा ना की, एक सदस्य बोलत असताना दुसऱ्याने मध्ये बोलू नये.

**मा. महापौर :-**

सगळे सदस्य उठून बोलत असतात म्हणून आपल्याला सांगणे गरजेचे आहे.

**शरद पाटील :-**

एक सदस्य बोलत असताना दुसऱ्याने मध्ये बोलू नये.

**शिवप्रकाश भुदेका :-**

अभी इन्होंने बोला। इनकी मानसिकता नही। इनकीही मानसिकता बिगडी हुई है।

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य आपण बसून घ्या.

**शिवप्रकाश भुदेका :-**

और सन्मा. सदस्य महेंद्रसिंग चौहाण साहब अपने लडकेका नाम विकास रख दिया।

**मा. महापौर :-**

सन्मा. शिवप्रकाश भुदेकाजी आप बैठीए।

**रोहित सुवर्णा :-**

तिकडच्या सन्मा. नगरसेवकांना तुम्ही बसायला सांगा. ते सारखे का उभे राहतात मग आम्हीही उभे राहतो. त्यांना तुम्ही सांगणार नाही. प्रत्येक वेळेस आम्हालाच का बोलता तुम्ही? त्यांनाही बोला तुम्ही. त्यांनी तुमची परमिशन घेतली का? हे बघा उभे राहीले?

**मा. महापौर :-**

परमिशन घेउनच बोलत आहेत ते. परमिशन दिल्यानंतरच ते बोलत असतात.

**रोहित सुवर्णा :-**

आम्हालाही बोलायची संधी दया. आपण आम्हाला बोलायची संधी कधी देणार?

**मा. महापौर :-**

आपण संधीचा गैरवापर करता. संधी दिलेली असते.

**रोहित सुवर्णा :-**

तुम्ही शिकवा आम्हांला. सन्मा. मायरा मेंडोसा असताना ते प्रत्येकाला संधी दयायचे.

**मा. महापौर :-**

आपल्याला संधी दिलेली असते. त्याचा गैरवापर करु नका. संधी सर्वांना दिली गेलेली आहे. आपण जास्त बोलत आहात.

**रोहित सुवर्णा :-**

आम्ही जास्त बोलतो आहे पण ते खरे असते .

**मा. महापौर :-**

नगरसचिवांनी हे शब्द कामकाजातून काढून टाकावे.

**नयना म्हात्रे :-**

मॅडम, कधीतरी राष्ट्रवादीचे नगरसेवकांनी परमिशन घेउन बोलतात का ते सांगा. ते कधीच परमिशन घेउन बोलत नाही आणि याबाजूचे लोक फक्त परमिशन घेउन बोलतात. ते कधीच परमिशन घेउन बोलत नाहीत.

**शिवप्रकाश भुदेका :-**

जो बोलते है वही उल्लंघन करते है।

**लिओ कोलासो :-**

उल्लंघनाचा प्रश्न नाही. मा. महापौर साहेबा, मी मुद्दामून खुलासा करत आहे की, सन्मा. रोहिदास पाटील यांनी सत्ताधारी पक्षाचा उल्लेख केला आणि ते जर सत्ताधारी पक्षा बद्दल चुकीचे बोलत असतील तर त्याला इंटरप्शन करण्याचा आमचा हक्क आहे. त्यामुळे त्या हक्काने बोललो आहोत.

**रोहित सुवर्णा :-**

आम्ही पुर्ण बोलू मग बोला ना तुम्ही.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य आता हे तुम्ही काय करत आहात. दुसरे बोलत असताना मध्ये उठून बोलता म्हणजे किती शिस्त आहे ते दाखवता का सभागृहाला . आपण आता बसून घ्या. मी जो काही खुलासा करत आहे ते

ऐकून घ्या. आपण बसून घ्या. दोन मिनिटं बसून घ्या. या शहराचे जे उपमहापौर आहेत त्यांनी जी लक्षवेधी गेल्या सभेला दिली होती. एक सभा झाली आणि आता आहे ती दुसरी सभा एम.आय.डी.सी. कडून जी आपल्याला कागदपत्रांची पुर्तता आवश्यक होती. तीचा सतत मी महापौर म्हणून पाठपुरावा करुन तसेच या शहराचे आयुक्त आयुक्त व पाणीपुरवठा विभागाचे बारकुंड साहेब यांनी एकत्र मिळून सतत एम.आय.डी.सी. चे मंत्री अशोक चव्हाण साहेब आणि दुसरे धोटे साहेब आहेत. त्यांच्याकडून आम्हाला जी कागदपत्रांची पुर्तता होण्याची गरज होती. ते आम्हाला चार ते पाच दिवसामध्ये मिळणार होती. त्याच्यासाठी सतत पाठपुरावा करत होतो. परुंत, अनेक तांत्रिक अडचणीमुळे, त्यांच्या मिटींग लागल्यामुळे आम्हाला आतापर्यंत कागदपत्र मिळू शकले नाहीत आणि हे एस्टिमेट, कोटेशन मिळेपर्यंत ३५ एम.एल.डी. पाण्याची जी मिटींग आपल्याला लावायची होती. ती कागदांची पुर्तता न झाल्यामुळे आपण लावू शकलो नाही.

**रोहिदास पाटील :-**

सन्मा. महापोर मॅडम, ह्याच्यात आमची अपेक्षा एवढीच की, तुम्ही काही वेगळे कराल अशी अपेक्षा करत नाही. तुम्ही चुकीचे करता असेही मी बोलत नाही. पण तुम्ही कर्तव्य निभावत नाही. जर हा प्रश्न पिठासिन अधिकारी म्हणून तुम्ही त्याला उत्तर दिले होते. एक सोडून दोन वेळा दिले. आजची सभा लागायच्या आधी आदल्या दिवशी जर गटनेत्यांना बोलावलं असतं. बैठक घेतली असती आणि या तांत्रिक अडचणीमुळे हा विषय आपण घेवू शकत नाही. तर एवढे सन्मा. सदस्य बाहेर गेले नसते. याच्यामध्ये गावाची अब्रु जात नाही का? एक सत्ताधारी पक्ष आत बसला आहे आणि दुसरा सत्ताधारी पक्ष बाहेर जात आहे. इथे पेपरवाले बसलेले आहेत. ते तेच लिहतील की इथे भाईंदरमध्ये राष्ट्रवादी आणि कॉंगेस (आय) मध्ये मोठी तेढ निर्माण झाली. कॉंग्रेस (आय) वाले बाहेर निघून गेले. अशी बातमी छापून येईल.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, मी मघासपासून परमिशन मागत आहे.

**आसिफ शेख :-**

सन्मा. महापौर मॅडम, आमचे जेष्ठ सदस्य रोहिदासजी पाटील यांना आमच्या सत्ताधारी पक्षाची एवढी काळजी आहे. आमचं काय आहे ते आम्ही बघून घेउ. आपण आपलं बघा.

**मिलन म्हात्रे :-**

आम्हाला कोणाचीही काळजी नाही. एक लक्षात घ्या. मा. महापौर मॅडम, हा खेळ नाही आहे.

**आसिफ शेख :-**

सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे साहेब मी तुम्हाला बोलत नाही आहे. त्यांच्यावतीने तुम्ही वकीलपत्र घेउन बोलू नका.

**मिलन म्हात्रे :-**

सन्मा. महापौर मॅडम, मी जे बोलत आहे ते लक्ष देउन एका. गेल्या एक महिन्यामध्ये मी दोन तीन पत्र पाणी विभागाला दिलेली आहेत की, या शहरामध्ये आता बजेटची मिटींग लागेल. मी स्टॅण्डींगमध्ये सदस्य असताना तेव्हापासून पाण्यात तीन-चार करोडची तुट येते. आपले जे मिटर रिडर आहेत. ते सोसायटयामध्ये जाउन चाळीस-पन्नास हजाराची बिल कमी करुन तिकडेच पाच-पाच हजार रूपये घेउन त्यांचे २० हजार, १५ हजार अशी बिल कमी करतात. म्हणजे प्रत्येक सोसायटीचे जवळ-जवळ २० हजाराचे बिल कमी येते. अधिकारी आपल्याकडे उपस्थित आहेत. त्यांनी सांगावे की, मी पत्र दिलं आहे की नाही. एक कनेक्शन पास होते. एक खड्डा मारला जातो चार कनेक्शन लावली जातात. तुमच्या एका कनेक्शनचे पैसे डिपॉझिटचे जमा होतात आणि लागतात चार कनेक्शन आजही आपण राहतात. त्या एरियामध्ये सुद्धा माझ्याकडे सगळे बरोबर रेकॉर्ड आहेत. पण मी वाट बघतो प्रशासनाची. वेळ आली तर आमच्याकडे कमिशनर जेव्हा क्रियाशील होतील हे किंवा येणारे. तेव्हा आम्ही आमचे सगळे सिक्वेन्सचे पत्ते बाहेर काढणार आहोत. आता जे कोणी त्यामध्ये सामील आहेत. ते उघडे पडणारच आहेत. माझ्या वॉर्डमध्ये मी तो प्रकार करुन चोरीचे कनेक्शन पकडून दिलेली आहेत म्हणून मला पूर्ण हक्क आहे. आज सत्ताधारी विरोधक कोण आहे ते सोडून दया. पण ज्या पाण्याची गळती आणि चोरीचे नळ कनेक्शन दयायचे प्रकार हायवेच्या एरियामध्ये पाईप लाईन मंजूर करायची खाजगी बिल्डरच्या अंतर्गत जागेमध्ये पाईप लाईन टाकून दयायच्या त्याची बिल्डर लोकांनी अधिकाऱ्यांना सांभाळून लाखो रूपयाची जागा त्यांच्या खाजगी जागेत पाईप लाईन टाकून दिलेली आहे. हे आरोप मी पुराव्यासकट बोलत आहे. आपल्याला जी काही कार्यवाही माझ्यावरती करायची आहे ती करु शकता. पण हे जर सत्य निघाले तर स्वतः आपण कार्यवाहीला तयार राहा. मी स्वतः आपल्यावर कार्यवाही करायची तयारी करीन. कारण आपल्याला मी रितसर पत्र दिले आहे. पुरावे दिले आहेत. सोसायटी वाले ॲफीडेवीट दयायला तयार आहेत. त्यादिवशी आपले जे.ई हाते. त्यांच्या समोर सोसायटीवाले बोलले की, आमच्याकडे जे मिटर रिडर येतात. त्यांनी आमचे चाळीस हजार रूपयाचे बिल वीस करून दयायचं मान्य केले आहे आणि त्यांनी आमच्याकडे पैशाची मागणी केली आहे, त्याचं आम्ही ॲफीडेव्हीट दयायला तयार आहोत. मी जे आता या मिटींगमध्ये बोलत आहे, तुमच्या सत्ताधाऱ्याने विषय काढला. कोण चांगलं? कोण वाईट ते सोडून दया. तुम्ही किती पत्र व्यवहार केला किंवा कोणाला भेटून आलात त्याच्याने आजच्या तारखेला माझ्या मिरा भाईंदरला पाणी आताच मिळणार नाही. जे तुमचे लोडशेडींग आहे, शटडाउन आहे जे काही प्रॉब्लेम आहे. आजच्या

तारखेला जे एम.एल.डी पाणी येत आहे, किती एम.एल जे पाणी येते आणि किती जाते ह्याचा हिशोब कोणी ठेवला आहे? तो हिशोब मागण्या करिता आम्ही पत्रव्यवहार केला त्याचे उत्तर मिळालेले नाही. आता नवीन आलेले सरकारी अधिकारी म्हणतात की, सन्मा. नगरसेवकांना लेखी उत्तर दयायची गरज नाही. हा जो नवीन त्यांनी जावई शोध लावला आहे त्यांना वेळीच आवरा. नाहीतर आमच्या परीने कार्यवाही करावी लागेल. सभागृहाच्या बाहेर जे फटाके फोडलेत तर मला बोलायला अभिमान वाटतो. जो माझा हॉस्पिटलचा 'ज' चा प्रस्ताव आपण फेटाळलात. तो उच्चन्यायालयाने काल त्याच्या वर निकाल दिला. त्यामुळे महानगरपालिकेला साडे तीन करोड रुपयाचा फायदा झाला आहे आणि सहा आठवडयामध्ये प्रत्यक्ष जागेचा ताबा आणि ६ महिन्यामध्ये जनरल हॉस्पिटलचे काम सुरू करण्याचे उच्च न्यायालयाने आदेश दिलेला आहे. महानगरपालिकेच्या सत्ताधाऱ्यांना हायकोर्टाने मारलेली सणसणीत चपराक आहे आणि ह्याच्यावरती आपल्याला काही वक्तव्य करायचे असेल तर करा. ह्याच्यामध्ये मला ७ महिने कोर्टामध्ये चप्पल घासायला लागली. केवळ आपल्या सत्ताधाऱ्यांमुळे त्याच्यामध्ये आकस केला. केवळ माझा प्रस्ताव म्हणून आपण नाकारला. पण माझे नाव मिलन म्हात्रे आहे. उच्च न्यायालयामध्ये लढाई लढलो आणि मा. महापौर आपल्या निर्णयाच्या विरोधात हा निकाल घेउन आलेलो आहे. ह्याची आपण नोंद करावी. धन्यवाद.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

अध्यक्ष महोदय, यह जो सब्जेक्ट इन्होंने बताया पानी के बारे में अगर ऐसा पुरावा है तो फौरन पुरावा पेश करना चाहिए हम भी उसका स्वागत करेंगे। सन्मा. मिलन म्हात्रेजी....

**मिलन म्हात्रे :-**

हम पुरावा पेश करेंगे। पहले आप प्रशासन को कितना पगार देतो हो उनको गाडीयाँ देते हो। अधिकारीओं को केबीन सजाके देतो हो। उनको पावर दे दिया है। उन्होंने अपने पावर का इस्तिमाल करना चाहिए। उसके बाद हम पुरावा देंगे। उसके पहले नही देंगे क्योंकी पहले जाके चोरी के कनेक्शन कट करते है। उसमे आपका सहभाग होता है।

**महेंद्रसिंग चौहाण :-**

अगर ऐसा है तो यह सिरीयस है। अगर ऐसे कोई सोसायटीका ॲफीडेवीट आता है तो उसका स्वागत होगा। आपकी भी तारीफ होगी की आपने यह काम किया है। तो कृपया सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे जी से पुरावे मांग लिजिए।

**मिलन म्हात्रे :-**

मै प्रोसिडींग का पान नंबर २१ पढता हूँ इसमें आपने बोला है की, महानगरपालिका का स्टाफ आरामसे सोते बैठे है। मंदीरमे चढावा चढना पढता है यह आपका वक्तव्य है। मंदिर कौनसा है यह आप बताओं। वो मंदीर आप ही का है। इसमें जो भगवान बैठा है वह आपही का है और वह बैठकर पैसा खा रहा है। मेरे पास पुरावा है। मैं बोल रहा हू ना कानून कार्यवाही जो भी करनी है वो मैं ही करने वाला हूँ। आपको किसने डिसिजन लेनेको कहा नही है। आप अपना काम करो मैंने अपना काम किया है।

**महेंद्रसिंग चौहाण :-**

आपके पास पुरावा है तो वह आप सबमिट किजिए।

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे यांनी कोर्टाचा विषय काढला आणि काल जी केस होती त्याचा निकाल महानगरपालिकेच्या बाजूने लागलेला आहे. तर आपण जो उल्लेख केलेला आहे.

**मिलन म्हात्रे :-**

महानगरपालिकेच्या बाजूने नाही. तुम्हाला कोणीतरी तुम्हाला मागे बसलेल्या अधिकाऱ्यांनी मिसगाईउ केलेले आहे. ऐकून घ्या. मी प्रिटीशनर आहे. महानगरपालिकेला विरोधक पार्टी प्रतीवादी म्हणून मी बनविले होते. तो आमच्या बाजूने निकाल लागला आहे. तुमच्या बाजूने नाही. तुमच्या निर्णयाच्या विरोधात मी केस केली होती आणि मी ती केस जिंकलो आहे. त्याच्यामध्ये महापालिकेचा टेक्नीकली 'ज' चा प्रस्तावात काय दम असतो. त्याच्यात कायदयाची काय परिभाषा असते. आणि 'ज' च्या प्रस्तावावरती हायकोर्टात काय काय होते ते मी उभ्या महाराष्ट्राला दाखवून दिलेले आहे. आपल्या मंत्रिमंडळासकट.

**मा. महापौर :-**

मी आपल्या सर्वांच्या माहितीसाठी सांगत आहे की, मिरा भाईंदर महानगरपालिकेने टेम्बा हॉस्पिटल हे आरोग्य केंद्र आपल्या ताब्यात मिळावे म्हणून सन्मा. सर्व सत्ताधाऱ्यांनी आपले महाराष्ट्र राज्याचे जे मा. मंत्री आहेत त्यांच्याकडे सतत पूर्ण मी महापौर कालावधीत असताना मी १ वर्षापासून स्वतः पत्रव्यवहार केलेला आहे आणि त्यांना प्रत्यक्ष भेटून....

**रोहिदास पाटील :-**

सभागृहामध्ये एक मताचा ठराव दिला होता ह्याचा उल्लेख करणे गरजेचे आहे.

**मिलन म्हात्रे :-**

ह्या ९३ सालची गोष्ट करतो.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य महापौर बोलत असताना आपण मध्ये बोलता आपण मुद्दा समजून घ्या. पिठासिन अधिकाऱ्याला आपण बोलू तरी दया.

**मिलन म्हात्रे :-**

१ डिसेंबर १९९३ ला शासनाने सदर जागा मोफत देण्याबाबतचे पत्र आपल्याला पाठविलेले आहे. त्याच्यावर त्यावेळीच्या तत्कालिन कोणी राजकारण्यांनी प्रयत्न केले नाहीत. १ डिसेंबर १९९३ चे पत्र आपल्याकडे आहे. त्याच्यात शासनाने क्लिअर सांगितले होत की, ही जागा आपल्याला मोफत देण्यात येत आहे. १३-१४ वर्षापासून आपण काय केले याचा फक्त हिशोब दया. मोफत मिळालेली जागा आपण मागण्या करिता काहीही प्रयत्न केलेले नाही हे त्या वेळच्या सत्ताधारीचं हायकोर्टामध्ये ओपन झालेले आहे.

**मा. महापौर :-**

आपल्या माहितीसाठी मी सांगत आहे, आरोग्य केंद्र आपल्या ताब्यात मिळावे म्हणून सतत आम्हीसुद्धा प्रयत्न केलेले आहेत. कोर्टातून जो निकाल लागलेला आहे तो जनतेच्या हिताचा झालेला आहे.

**मिलन म्हात्रे :-**

आपण काहीही बोला पण मिटींग वर मिटींग तारीख पे तारीख उसके बाद कुछ नही। हातमें कुछ नही आ रहा है। ही सत्य बाब आहे. हे लेखी उत्तर आहे. तुमच्याशी आम्हाला वाद घालायचा नाही. आमचा निकाल आलेला आहे.

**रोहित सुवर्णा :-**

फेब्रुवारी महिन्यात तुम्हीच तो प्रस्ताव फेटाळला होता.

**आसिफ पटेल :-**

तुम्ही लोकांना शिकवतात आणि स्वतः दोघे एकत्र उठून बोलत आहात. कृपया एकाने उठून बोला.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही एकत्र उठून बोलतात तेव्हा.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

जब मा. महापौर बीच मे अपना वक्तव्य दे रही है। तब बिच मे बोलने की क्या जरुरत है।

**आसिफ पटेल :-**

तुम्ही दोघं एकत्र बोलतात लोकांना समजलं पाहिजे ना की, कोण काय बोलतात. नुसते बोंबा मारतात. कुणाला काहीच समजत नाही. एकेकजण उठून व्यवस्थित बोला. मा. महापौर मॅडमचा अपमान करु नका.

**रोहित सुवर्णा :-**

बराबर है। मा. महापौर मॅडम, सब जानती है। मा. महापौर मॅडमचा अपमान करु नका.

**रोहित सुवर्णा :-**

आम्ही मा. महापौरांचा अपमान करत नाही.

**शुभांगी नाईक :-**

आम्ही अपमान केला असं तुम्ही बोलू नका.

**रोहित सुवर्णा :-**

आम्ही अपमान नाही करत पण मा. महापौरांनी आमचा मान सन्मान ठेवायला पाहिजे. फेब्रुवारी महिन्यामध्ये अर्ज फेटाळला होता. त्याच्या विरोधात सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे यांनी हायकोर्टामध्ये जनहित याचिका दाखल केलेली आहे.

**मा. महापौर :-**

सन्मा. सचिव पुढील कामकाजाला सुरूवात करावी.

**नगरसचिव :-**

मगाशी सुचित केल्याप्रमाणे तीन लोकांचा सत्कार करायचा होता. त्यापैकी एक दुसरे म्हणजे शर्मिला रतन घारू कोलंबो, श्रीलंका येथे आंतरराष्ट्रीय स्तरावर झालेल्या कराटे स्पर्धेत मिरारोड व शितलनगर मध्ये राहणाऱ्या शर्मिला रतन घारू यांना कराटे स्पर्धेमध्ये एक सुवर्ण पदक व दोन कास्य पदक मिळविले आहेत. त्यांचा मा. महापौरांच्या हस्ते सत्कार करण्यात येत आहे.

(मा. महापौर मॅडम यांच्या हस्ते श्रीम. शर्मिला रतन घारु यांचा सत्कार करण्यात आला.)

**नगरसचिव :-**

मा. महापौर साहेबा, प्रश्न उत्तरांच्या तासाला सुरूवात होत आहे. दु. १२.२० मि. झालेली आहेत. सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवालजींचा प्रश्न आहे.

**लिओ कोलासो :-**

मा. महापौर साहेबा, प्रश्नोत्तराच्या तासाला सुरूवात होण्यापूर्वी सन्मा. ओमप्रकाश अग्रवालजी ह्याचा प्रश्न आहे. आम्ही प्रश्नात जात नाही. परंतु, प्रश्नावलीत आम्हाला जे प्रश्न दिलेले आहे.

**शिवप्रकाश भुदेका :-**

नगरसचिव उतना टाईम देख के रखो। सन्मा. सदस्य टाईम बिगाड रहे है। उतना टाईम लेस करके रखो।

**लिओ कोलासो :-**

पिठासिन अधिकारी साहेबांच्या निदर्शनास मी मुद्दामून आणून देउ इच्छितो की, जी प्रश्नावली आम्हाला देण्यात आलेली आहे त्याची उत्तरे मला आनंद होत आहे. की, याठिकाणी एकूण दिलेल्या सर्व एकविस प्रश्नामध्ये कॉर्पोरेशनने महापालिकेने पुर्ततासहित उत्तरे दिलेली आहेत आणि एवढया प्रश्नांचा निपटारा केलेला आहे. ही खरचं प्रशासनाच्या दृष्टीने एक चांगली गोष्ट आहे त्याबद्दल मला आनंद होत आहे तो मी व्यक्त करतो. धन्यवाद!

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, माझा दुसरा प्रश्न शिक्षण संबंधी आहे. शिक्षण अधिकारी कोण आहे? जरा व्यासपिठासमोर आले तर बर होईल. मला शिक्षण संबंधी प्रश्न विचारायचे आहे. शिक्षण अधिकारी कोण आहे? मा. महापौर मॅडम, आता अर्ध्या सत्ताधारी पक्षाचे....

**शिवप्रकाश भुदेका :-**

मा. आयुक्त साहब, इनको आपने सेवामुक्त किया था तो अब यह कहासे आ गये?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, या सभागृहात कशाप्रकारे काम होत आहे यासाठी आत्ता अर्ध्या सत्ताधारी पक्षाने सभात्याग केलेला आहे. आता जे शिक्षण अधिकारी उभे आहेत या सभागृहाने या शिक्षण अधिकाऱ्यावर अकार्यक्षम, बेजबाबदार असा आक्षेप करून त्यांना पुन्हा पाठविलेले होते. आता मा. उपमहापौर उपस्थित नाही. आणि मा. आयुक्त साहेबांनी ताबडतोब घरी पाठविण्याचे निर्देश दिले होते. त्यांना निलंबित केले होते आणि आज तेच अधिकारी या व्यासपिठवर उभे राहून जर आम्हाला उत्तर देत असतील तर आम्ही काय समजावे. हा सभागृहाचा अपमान आहे की हा मा. महापौरांचा अपमान आहे की मा. आयुक्तांचा अपमान आहे की मा. उपमहापौरांचा अपमान आहे की, सत्ताधारी पक्षाचा अपमान आहे. याची पहिले खात्री करा. ते अधिकारी या सभागृहात या व्यासपिठावर कसे आले. याचा पहिल्यांदा आयुक्तांनी मा. महापौरांच्या वतीने खुलासा करावा. नाहीतर तोपर्यंत या शिक्षण अधिकाऱ्यांची कोणतीही गोष्ट आम्ही ऐकून घेणार नाही.

**आसिफ पटेल :-**

मा. महापौर साहेबांच्या परवानगीने बोलतो. सन्मा. सदस्य गारोडिया साहेब जे आरोप करीत आहेत. मा. महापौर मॅडम, मा. आयुक्त साहेब तो खरोखरच आरोप मान्य आहे. आता बघा एक नगरसेवक आहेत. मा. आयुक्त साहेब, माझी ही एक शाळा १० वी पर्यंत आहे. जी.आर. एज्यूकेशन ट्रस्ट त्याचा त्याच्यात उल्लेख नाही. आपण येथे झोपा काढायला येता की, शिक्षण संस्थेवर लक्ष दयायला येतात. अशा व्यक्तिंना खरोखरच निलंबित केलेच पाहिजे का नको? मा. स्थायी समितीचे सन्मा. सभापती स्टिवन मेन्डोसा साहेब आहेत. यांचाही आरोप आहे की, दोन तीन शाळेचे नाव ह्यात नाही. जे ह्याच्याशी संबंधित आहेत. ती नाव कुठे गेली आहेत आणि हे काही वाचत आहेत की नाही? का अधिकारी खुर्च्या गरम करायला बसतात. ह्यांच्यावर कार्यवाही केलीच पाहिजे. मी आपल्या मताशी सहमत आहे.

**शिवप्रकाश भुदेका :-**

तब भी जो आरोप किया था सही आरोप किया था।

**आसिफ पटेल :-**

आपके सब आरोप माननेका ऐसा नही है। आरोप मत किजिए जो सच्चाई है वह सत्ताधारी भी बयान करते है।

**रोहित सुवर्णा :-**

बिल्कुल. परंतु...

**आसिफ पटेल :-**

यह बात आप अपने जहेन मे रखीए।

**शिवप्रकाश भुदेका :-**

आप साडे चार साल मे एक-दो बार तो बोलते है।

**आसिफ पटेल :-**

ऐसा नही है,हमे बोलना आता है और आपको चिल्लाने आता है। आप चार लोग जमा करके लाएगें ताली बजानेके लिए तो कैसा होगा।

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्या शिवप्रकाश भुदेकाजी आप बैठीए।

**लिओ कोलासो :-**

पिठासिन अधिकारी साहेबा, हे जे सन्मा. सदस्य भुदेकाजी साडे चार वर्ष असे नेहमी बोलतात. तर ह्याच्यावर आम्ही उत्तर देउ का? हे अशा पध्दतीने चेष्टा मस्करी जे करीत आहेत ते त्यांना थांबावायला सांगा.

असे आपण त्यांना कृपया निर्देश दयावे. ते काय करत होते साडे चार वर्षे? त्यांन काय काय केलं ते आम्हाला माहित नाही का? आम्ही पण ते बाहेर काढू.

**शिवप्रकाश भुदेका :-**

ते पण तुम्ही बोलून टाका.

**रोहिदास पाटील :-**

जे केले असेल ते आपण बोला ना.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

जे मी विचारलेले आहे. या सभागृहाने ज्या अधिकाऱ्याला इथून निलंबित केलेलं आहे. अकार्यक्षम, बेजबाबदार म्हणून इकडे आपण सर्वांनी एकमताने टाळ्या वाजवून त्यांना घरी पाठविलेले आहे. हा कोणाच्या इज्जतीचा प्रश्न आहे. सभागृहामध्ये कोणाची अब्रु गेली आहे. आपली का, आमची का? मा. उपमहापौरांची कोणाची? म्हणजे ह्या व्यासपिठावर जे निर्णय होतात ते बेकायदेशीर होतात. जी विधान होतात ती बेकायदेशीर होतात. प्रशासन त्याच्यावर बेकायदेशीरपणे गोष्टी करत आहे. हे या अधिकाऱ्यांमुळे सिध्द झालेले आहे त्यामुळे याचा पहिल्यांदा खुलासा करावा. हे कशा पध्दतीने मा. आयुक्त साहेबांनी त्यांना निलंबित केले आहे तर हा अधिकारी ह्या व्यासपिठावर कसा काय उभा आहे?

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य ओमप्रकाशजी अग्रवाल आपण या विषयाला धरुन बोलावे विषयांतर करु नका.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

तो अधिकारी आहे ज्याचा या विषयाचा संबंधच नाही आणि त्याला निलंबित करण्यासाठी सर्वांनी त्याला समर्थन दिलेले होते.

**आसिफ पटेल :-**

मा. महापौर मॅडम, ह्यांना उत्तर द्या. ह्यांना गोंगाट घालायला का लावतात? त्यांना बसायला सांगून त्यांच्या प्रश्नावर खुलासा करावा. थोडक्यात करा. हे लांब लचक नको. आम्ही येथे टाईमपास करायला आलेलो नाही. त्यांना लगेच उत्तर द्या आणि त्यांना सांगा तुम्ही बसून घ्या.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब, तुम्ही पण टाळ्या वाजवल्यात नुसता मी टाळ्या वाजवल्या नाही तर आपण ही टाळ्या वाजवल्यात ही आपणाला ही शर्मेची बाब आहे. जो अधिकारी इथे उभा राहून आपल्याला उत्तरे देत आहे. त्याला तुम्हीच निलंबित केले आहे. मी नाही.

**आसिफ पटेल :-**

सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवाल जी त्यांचे आपण उत्तर घ्या ना.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आम्हांला त्यांच्याकडून उत्तराची अपेक्षा नाही.

**आसिफ पटेल :-**

मग आपल्याला काय पाहिजे?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आपण पहिल्यांदा त्यांना डायसवरुन खाली उतरवा. त्यांना मा. आयुक्त साहेबांनी निलंबित केलेले आहे तरी ते डायसवर कसे काय आले?

**महेंद्रसिंग चौहाण :-**

मा. महापौर मॅडम, इन्हे उत्तर नही चाहिए जब सक्षम अधिकारी आ जाये तभी आप इनके सवालो के जवाब दिजिए।

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहब,आप बीच मे मत बोलिए। मॅडम, आता कोण मध्ये बोलले. आम्हाला तुम्ही सांगता मध्ये बोलायचं नाही.

**आसिफ पटेल :-**

मा. महापौर मॅडम, सन्मा सदस्यांना यांच्याकडून उत्तर नको तर दुसऱ्या विषयाला सुरूवात करा.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

नाही. मॅडम, पहिला प्रश्न असा की तो अधिकारी या व्यासपिठावर कसा काय? कारण त्यात आपला अपमान झालेला आहे. मा. उपमहापौरांच्या अपमान झाला आहे. या मा. सभागृहाचा अपमान झालेला आहे. असा अपमान या सभागृहामध्ये आम्ही खपवून घेणार नाही. पहिला त्या अधिकारीला ज्याला या सभागृहामध्ये आपण एक मताने निलंबित केले तो अधिकारी कसा काय व्यासपिठावर येतो.

**मा. महापौर :-**

संबंधित विषयात मा. आयुक्त साहेब खुलासा करतील सन्मा. सदस्य आपण बसून घ्या.

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सभागृहामध्ये मागच्या सभागृहामध्ये शिक्षण अधिकाऱ्यांच्या बाबतीमध्ये चर्चा सुरू होती आणि त्या चर्चेच्या अनुषंगाने मा. महासभेला मी आश्वासन दिले होते की, शिक्षण अधिकाऱ्यांना त्यांच्या मूळ विभागामध्ये परत पाठवण्यात येईल. त्याप्रमाणे शिक्षण अधिकाऱ्यांना मुळ विभागामध्ये परत पाठवण्यात आले होते आणि त्याप्रमाणे आदेश ही मी निर्गमित केले होते. परंतु, या संदर्भामध्ये शासनाकडून आपल्याला सुचना आल्या की, त्यांची आम्ही लवकरच बदली करणार आहोत. परंतु, जोपर्यंत बदलीची व्यवस्था होत नाही किंवा पर्यायी अधिकाऱ्यांची व्यवस्था होत नाही तोपर्यंत त्यांना तेथे कार्यरत ठेवावे. अशा प्रकारच्या सुचना आल्यामुळे ते परत या ठिकाणी कार्यरत झालेले आहेत.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. आयुक्त साहेब, जे शासनाकडून पत्र आले आहे त्याची आम्हाला प्रत मिळेल का?

**मा. आयुक्त :-**

होय.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आता सभागृहात मागवा ना. हा सभागृहाचा विषय आहे.

**आसिफ पटेल :-**

आपण त्यांच्या दालनामध्ये जावून ही माहिती घ्यावी.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

दालनाचा विषय नाही. हा या मा. सभागृहाचा विषय आहे म्हणजे आता ज्या अधिकाऱ्याला ज्या सत्ताधारी पक्षाने बडतर्फे केले त्याचे तुम्ही समर्थन करता.

**हॅरल बोर्जीस :-**

मा. महापौर मॅडम, हा कृपया प्रशासकीय कामकाजाचा भाग आहे. जर सन्मा. सदस्यांनी ह्याची जर प्रत हवी असेल तर मा. आयुक्त साहेबांना त्यांनी तसे लेखी पत्र द्यायला सांगा आणि त्यांना तशी एक प्रत आपण उपलब्ध करुन द्या.

**रोहिदास पाटील :-**

मा. महापौर मॅडम, माझी अशी एक विनंती आहे की, सन्मा हॅरलजी बोर्जीस आसिफ पटेल पण बोलतात. त्यांचे ही म्हणणे खरे असू शकते. आम्ही अपेक्षा करतो की, ते डायस पवित्र आहे. त्या व्यासपिठावर होणारी सगळी ॲनाउसन्समेंट ही शास्त्रशुद्ध, ताळतम्य राखून व्हायला पाहिजे. जेव्हा मा. उपायुक्तांनी, मा. उपमहापौरांनी मागणी केली त्याचवेळी मला ते बोललेले आठवते की, ते नियमानुसार बोला भावनात्मक बोलू नका मा. आयुक्तांनी उत्तर देते वेळी आम्ही तीच अपेक्षा केली होती की नियमात असेल तेच आम्ही त्यांना विचारले होते की, तुम्ही डायसवर बसल्यानंतर तुम्हाला माहिती पडते की, शिक्षण अधिकारी नाही. हे कसे काय आम्ही कोणावरही दोष आरोप करण्यासाठी बसलो नाहीत. मा. आयुक्त साहेब त्यांना काढू शकत नव्हते. तर त्यांनी ते बोलायला नको. मा. उपमहापौर यांना ही त्याची जाणीव असायला पाहिजे होती की, आपण मॅजोरीटी मध्ये आहोत म्हणून ठराव करून काढता येत नाही. त्यांनी माहिती घ्यायला पाहिजे होती ते आहेत किंवा नाही त्यांनी दिलेल्या उत्तरामुळे आमचा प्रश्न आहे. तुम्ही पिठासिन अधिकारी म्हणून उत्तर दिले. मा. आयुक्त म्हणून उत्तर दिले. आणि मा. उपमहापौर सत्तेचे जे भागीदार आहेत त्यांनी मागणी केली होती आणि त्याच्यावर कोणी दुमतही व्यक्त केले नव्हते. मग, येतेवेळी ते आले तर ते तुम्हाला माहितीच नव्हते की होतं त्यांना तुम्ही काढूच शकत नाही. तर तुम्ही उत्तरच द्यायला नको पाहिजे होते. आपण प्रयत्न करुया असे सांगायला पाहिजे होते. सक्षम अधिकारी शोधू असे सांगायला पाहिजे होते. पुढची व्यवस्था होईल तोपर्यंत त्यांच्याकडून समजूत घालून काम करून घेउ असे सांगायला पाहिजे होते. पण निवेदन करतेवेळी आपण भान ठेवत नाही हे आज सिद्ध होते. मा. महापौरांनी, मा. उपमहापौरांनी ही भान ठेवलं नाही. मा. आयुक्तांनी सेवेच्या प्रेशरमध्ये येउन उत्तर देउन टाकले असे कसे चालेलं. आम्ही विनंती करतो की, पुन्हा पुन्हा ही सभा एक तासाची २ तास चालू द्या एकेका प्रश्नाचा नीट निकाल लागू द्या की, जेणेकरून आपली शान वाढेल.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, जो शिक्षण अधिकारी आहे प्रश्नाचं उत्तर ही आता दोन मिनिटापूर्वी दिलेलं आहे. म्हणून मी या सभागृहामध्ये जी विधाने झाले मागच्या मिटींगमध्ये अशा विधानाचे सत्ताधारी पक्ष पालन करत नाहीत. या व्यासपिठाची आपण अब्रु घालवलेली आहे म्हणून शिक्षण अधिकाऱ्याचा आणि या प्रश्नाचा फक्त मी निषेध व्यक्त करत आहे आणि माझा पुढचा प्रश्न तुम्ही घ्या.

**मा. महापौर :-**

सन्मा. सचिव सदस्यांनी जे अपशब्द सभागृहाबद्दल वापरले ते कामकाजातून काढून टाकण्यात यावेत.

**नगरसचिव :-**

सन्मा. सदस्य प्रकाश दुबोले यांचा प्रश्न आहे ते सभागृहात गैरहजर आहेत.

**रोहिदास पाटील :-**

पिठासिन अधिकाऱ्यांनी सांगितले की, जे अपशब्द सभागृहाविषयी काढलेत ते कामकाजातून काढून टाकावेत तर कोणी अपशब्द वापरले आहेत? मा. मॅडम, आम्ही तुम्हाला अत्यंत सौजन्याची भुमिका घेउन हे सभागृहाचं कामकाज चालवत आहोत तर आमचा अपशब्द काय?

**मा. महापौर :-**

विषय संपलेला आहे. आपण बसून घ्या. जे शब्द आहेत ते सचिव कामकाजातून काढून टाकतील. रेकॉडिंगला ते शब्द आले आहेत.

**रोहिदास पाटील :-**

आमचे काय अपशब्द आहेत. कोणीही सांगावे. सत्ताधारी पक्षानेही सांगावे आणि जर ते माझ्या तोंडातून अपशब्द निघाले असतील तर मला सांगावे मी तर क्षमा मागेल.

**हॅरल बोर्जीस :-**

मा. महापौर मॅडम, सभेच्या कामकाजात धरून जे अपशब्द आले असतील तर सभागृहाच्या कामकाजातून वगळण्यात यावे.

**रोहिदास पाटील :-**

आलेले असतील तर असे नाही. आले असतील तर मी क्षमा मागतो ना.

**हॅरल बोर्जीस :-**

सन्मा. सदस्य रोहिदास पाटील (काका) ते रेकॉर्डिग मध्ये आलेले आहे.सभेच्या कामकाजाच्या दृष्टीने जर असे काही शब्द आले असतील तर ते वगळण्यात येतील.

**रोहिदास पाटील :-**

आपण जागृक आहात की नाही. आपण सभागृह नेते आहेत. कामकाजावर आपले लक्ष आहे. जर अपशब्द असतील तर सांगा अपशब्द आले असतील म्हणजे काय?

**महेंद्रसिंग चौहाण :-**

अगर अपशब्द नही है तो आप बोलिए अपशब्द नही है तो जरुरत क्या है? आप अगला विषय लिजीए।

**नगरसचिव :-**

श्री. सन्मा. सदस्य मदन उदीत नारायण सिंग यांचा पुढचा प्रश्न आहे. प्रश्न क्रमांक ७० आहे.

**मदन उदित नारायण सिंग :-**

सदरची मालमत्ता यांचे सर्व्हेक्षण करताना सिमेंट पत्र्याचे शेड असलेले पक्के बांधकाम होते. परंतु, महानगरपालिकेच्या अतिक्रमण विभागामार्फेत सदर बांधकाम तोडण्यात आलेले आहे. म्हणजे कोणतेही पक्कं बांधकाम लिगल असेल तरी ही महानगरपालिका तोडते का?

**अजित पाटील :-**

अनधिकृत बांधकाम असल्यामुळे ते बांधकाम तोडले गेले आहे.

**मदन उदित नारायण सिंग :-**

आपण तिथे अनधिकृत लिहलं नाही पक्के बांधकाम होते.

**अजित पाटील :-**

बांधकाम करायला परमिशन त्याची नव्हती.

**मदन उदित नारायण सिंग :-**

परमिशन नव्हती म्हणून ते तोडलेलं आहे. म्हणजे ते इललिगल होते अनधिकृत होते.

**अजित पाटील :-**

होय.

**मदन उदित नारायण सिंग :-**

अनधिकृत होते मग त्याला कर कसा लावण्यात आला.

**अजित पाटील :-**

महानगरपालिका हद्दीमध्ये कोणताही अनधिकृत असले तरी टॅक्स लावण्याचे गर्व्हमेंटचे आदेश आहेत. महानगरपालिकेचे उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने तसे गर्व्हमेंटचे आदेश आहेत. टॅक्स लावताना त्याच्यामध्ये असा आम्ही शिक्का मारतो की, अनधिकृत बांधकामास बाधा न येता. टॅक्स लावण्यात येत आहे. कोणतेही शहरात कोणतेही बांधकाम अधिकृत असो किंवा अनधिकृत असो टॅक्स हा लावला जातो.

**मदन उदित नारायण सिंग :-**

ते बांधकाम तोडण्यात आले. नंतर ते कर लावण्यात आला होता ते वजा करण्यात आले का?

**अजित पाटील :-**

आपल्याकडे कर चालू आहे.

**मदन उदित नारायध सिंग :-**

म्हणजे तिथे काहीही प्रापर्टी नाही तरी कर चालू आहे.

**अजित पाटील :-**

तिथे प्रॉपर्टी आहे. तिथे प्लॉस्टीकचे छप्पर लावलेले आहे आणि पाण्याचे ड्रमसुद्धा आहे.

**मदन उदित नारायण सिंग :-**

ते कुणाचे आहेत? ती मालमत्ता कुणाची आहे.

**अजित पाटील :-**

आमच्या रेकॉर्डप्रमाणे श्रीदेवी खंण्डेलवाल असे त्यावेळेला नाव दिलेले आहे.

**मदन उदित नारायण सिंग :-**

मग त्याचे कर भरणे तुमच्याकडे झालेले आहे का?

**अजित पाटील :-**

नाही. बाकी आहे.

**मदन उदितनारायण सिंग :-**

ती जागा कोणाची नाही.

**अजित पाटील :-**

२००१ साली सर्व्हेक्षणामध्ये टॅक्स लावलेलं आहे.

**मदन उदितनारायण सिंग :-**

म्हणजे महानगरपालिकेतील कोणतेही गटार कोणतीही जागा तुम्ही कोणालाही देणार आहात का?

**अजित पाटील :-**

२००१ साली टॅक्स लावलेली ही घटना आहे.

**मदन उदितनारायण सिंग :-**

पण टॅक्स लावण्यात आलेले आहे ना.

**अजित पाटील :-**

लावलेली आहे, ही वस्तूस्थिती आहे.

**मदन उदितनारायण सिंग :-**

ते गटार तुम्ही त्यांच्या मालकीचे केलेले आहे का?

**अजित पाटील :-**

ते मालकीचं होत नाही. स्ट्रक्चर ला टॅक्स लावलेला आहे.

**अजित पाटील :-**

टॅक्स लावला म्हणजे...

**रोहिदास पाटील :-**

सन्मा. सदस्य पाटील साहेब, साधारण महानगरपालिकेचा नियम आहे. जी वास्तू तुम्ही अनधिकृत पणे पाडली. तुमच्या रेकॉर्डवरून ती नष्ट झाली. तर तो लावलेला टॅक्स आहे तो कमी करायचा, काढून टाकायचा ते खातं बंद करायचे. हा असा नियम आहे ना. तुम्ही ते खाते ओपन ठेवणार. परत त्याला सांगणार परत कोणाला तरी अधिकारी त्याला सहानभूती दाखवणार परत ते ओपन होणार.

**अजित पाटील :-**

आजच्या तारखेला...

**रोहिदास पाटील :-**

आजच्या तारखेला हे सांगा की, हे जे खातं आहे. तिथे कोणतीही मालमत्ता नाही. होती ती तुटलेली आहे. महानगरपालिकेने अनधिकृत बांधकाम तोडलेले आहेत आणि ते जे खातं आहे ते बंद करण्यात येईल असे रुलिंग दयायला पाहिजे.

**अजित पाटील :-**

ठिक आहे. या संदर्भामध्ये प्रत्यक्ष जागेची पाहणी करून आम्ही जर म.न.पा तर्फे तोडलेले बांधकाम असेल किंवा गटार असेल तर मा. आयुक्त साहेबांच्या आदेशानुसार आकारणी बंद करण्यात येईल.

**मदन उदितनारायण सिंग :-**

हा प्रश्न येथे आणण्याचा माझा हेतू असा की, आज आपल्या शहरात कितीतरी फ्लॅट ओनर आहेत, करधारक आहेत, ज्याची मालमत्ता, सन्मा. सचिव साहेब ज्याची मालमत्ता लिगल आहे, जे सगळे लिगल करधारक आहेत तरीही त्यांच्या नावावर मालमत्ता हे कर होत नाही. त्यांना आपला वॉर्ड ऑफीसमध्ये महानगरपालिकेमध्ये शंभर चकरा माराव्या लागतात. त्यांना कुठल्या-कुठल्या अधिकाऱ्यांना पैसेही दयावे लागतात. तरी त्यांचे काम होत नाही आणि ही मालमत्ता जागेवर नसताना इललिगल असताना कसे काय झाले? आणि हे कोणी केलेलं आहे? ते करणारे अधिकारी कोण?

**अजित पाटील :-**

२००१ साली सर्व्हेक्षणामध्ये झालेले हे काम आहे.

**मदन उदितनारायण सिंग :-**

२००१ साली जे सर्व्हेक्षण झाले त्यात अधिकारी कोण होते? हे कोणी केले?

**अजित पाटील :-**

कोणी केले? काय केले? या संबंधी सर्व्हेक्षण रेकॉर्ड बघून याची पुढील सभेत देण्यात येईल.

**मदन उदितनारायण सिंग :-**

ती माझ्या समोर दया. तुम्ही आता ते प्रश्न आणला.

**अजित पाटील :-**

ह्याचे सर्व्हेक्षण कोणी केले? याची फाईल काढून आपल्याला लेखी माहिती देण्यात येईल.

**मदन उदितनारायण सिंग :-**

आता हे प्रश्न आल्यावर माहिती आणायला पाहिजे होती ना.

**अजित पाटील :-**

आता माझ्याजवळ माहिती नाही. पुढच्या वेळी माहिती लेखी स्वरुपात देतो.

**मदन उदितनारायण सिंग :-**

आता आपला हा प्रश्न किती दिवसांनी आला आहे. वर्षाने हा प्रश्न आला आहे. वर्षात तुम्ही ती माहिती काढू शकत नाही. म्हणजे आपले काम कसे काय चालले आहे.

**अजित पाटील :-**

आम्ही चार दिवसांनी याची माहिती देऊ.

**मदन उदितनारायण सिंग :-**

ठिक आहे.

**नगरसचिव :-**

पुढचा प्रश्न सन्मा. सदस्य धनराज अग्रवाल यांचा आहे.

**धनराज अग्रवाल :-**

महानगरपालिकेत शासनातर्फे रिक्त पदोन्नतीची पदे भरण्याबाबत विलंब. मी असा प्रश्न विचारला होता. आपण जे उत्तर दिल आहे की दि. १२/८/२००५ रोजी ठराव २९ अन्वये नेमणूकीसाठी अर्हता व सेवाभरती नियम २००५ मंजुर केलेले असून त्यानुसार पात्र कर्मचाऱ्यांना दि. २८/०२/२००२ च्या आदेशानुसार पदोन्नती देण्यात आलेली आहे. पण असे माहित पडते की, सगळ्या कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्यात आलेली नाही. तर आपल्याकडे किती कर्मचारी बाकी आहेत? सफाई कर्मचारी बाकी आहेत, क्लर्क बाकी आहेत. सफाई कामगार, शिपाई सगळे किती लोक बाकी आहेत. तुमच्याकडे त्यांची संख्या आहे का? जे ग्रामपंचायतीच्या काळापासून कामे करीत आहेत. त्यांनासुध्दा अजुन त्यांचीही पदोन्नती झालेली नाही. त्यांची संख्या किती? आणि कोण कोण बाकी आहेत?

**संजय गोखले :-**

सन्मा. महापौरांच्या परवानगीने बोलत आहे की, पदोन्नती देण्यात आलेली आहे, त्यात वर्ग-१, वर्ग-२, मुख्यलिपिक, वरिष्ठ लिपिक,लिपिक, वाहन चालक ह्या सर्वांना पदोन्नती देण्यात आलेली आहे. तर सध्या आपल्याकडे पदोन्नती देण्यासाठी कर्मचारी शिल्लक नाही.

**धनराज अग्रवाल :-**

कर्मचारी शिल्लक आहेत. आमच्याकडे तक्रार येते. शिल्लक कसे नाही.

**मा. आयुक्त :-**

कोणाची तक्रार आहे?

**धनराज अग्रवाल :-**

तक्रार आहे. तुम्हाला मी देईन. तुमच्याकडेही तक्रार आलेली आहे.

**रोहिदास पाटील :-**

ज्या तक्रारी तुमच्याकडे मा. महापौर साहेबा आम्ही सगळ्याना न्याय देण्यासाठी विचारतो एका व्यक्तीसाठी तर बोलत नाहीत. ज्या दोन कर्मचाऱ्यांबद्दलचा विषय मी मा. आयुक्त साहेब आपल्यासमोर आणले होते. आज त्या गोष्टीला ३ महिने होऊन सुध्दा ते निकाली निघाले नाही. प्रत्येक स्टॅन्डीगमध्ये चर्चा होऊन सुध्दा त्या दोन मुलांचे निकाल लागला नाही. ३ महिन्यानंतर ह्या त्या दोन मुलांना शिपाई पदावर कायम करण्यात आलेले आहे. ही कोणत्या कामाची पध्दत आहे. १४ वर्ष जेव्हा २ शिपाई करतात. १४ वर्ष त्यांना आपण पेमेंट देतो. कोर्टाच्या आदेशानुसार आपण पेमेंट देतो. आम्ही तुम्हाला विनंती केली होती. आमची विनंती अतिशय प्रमाणिक होती, प्रांजळ होती की, इतके वर्ष ती लोक काम करतात, त्यांना पदोन्नती आणि वेतनश्रेणी ह्या दोन्ही लागू व्हायला पाहिजे अशी मी तुमच्याकडे विनंती केली होती. मी प्रत्यक्ष तुम्हाला दोन वेळा भेटलो. तुमच्या नावाने पत्र दिले. आजच्या घटकेला स्टॅन्डीगमध्ये मला उत्तर दिले त्या पत्राची कॉपी दिली. ती त्या कर्मचाऱ्याने आणून दिली की, आता तुम्हाला कायम स्वरुपी नोकरी दिलेली आहे. १४ वर्षानंतर कायम स्वरुपी नोकरीचे आपण पत्र देतो. साहेब, एखाद्या कोणताही कर्मचारी तो सफाई कामगार असू द्या, शिपाई असू द्या, लिपिक असू द्या किंवा इंजिनियर असू द्या तो माणूस त्याच्यावर अवलंबून असलेले कुटूंब, सगळी कुटूंबव्यवस्था, आपला नवरा, आपला मुलगा, आपला कोणीतरी महानगरपालिकेत काम करतो आहे. १४ वर्ष त्याने काम केल्यानंतर त्याला शिपाई पदावर कायम केले असे प्रेमपत्र दिलं ते कसे काय? पुन्हा आम्ही मा.

खतगावकर साहेबांना विचारले तेव्हा परत सन्मा. खतगावकर साहेब म्हणतात आता काका स्टॅन्डीगला घेऊन परत देऊ आम्ही ३ महिने झाले तेच बोलत आहोत. स्टॅन्डीगची पहिली बैठक होती. हा एक विषय झाला. अजुन अनेक कर्मचाऱ्यांची पदोन्नती आणि वेतनश्रेणी झालेली नाही. अमुकाकडे एक बोट दाखवायच आमचा उद्देश नाही. इतकी मोठी महानगरपालिका चालते. एकदम खेळीमेळीचे चालते. एखाद्या कर्मचाऱ्यावर अन्याय होतो तो का व्हावा? सगळ्यांना न्याय मिळतो. असे चित्र व्हावे. मा. आयुक्त साहेब, न्याय देतात असे तर नक्कीच चित्र व्हावे. मा. आयुक्त साहेबांनी न्याय दिला. आम्ही एकदा भेटलो, दोनदा भेटलो पुन्हा पुन्हा रिविजन होते आणि मग ते तिथे दिसून येते. साहेब, विशिष्ट प्रकारच्या एखाद्या बढतीबाबत कोणीतरी वेगळ्या पध्दतीने प्रयत्न केल्यानंतर यश येते आणि एखाद्याला येत नाही असे चित्र आपल्या महानगरपालिकेत नको. एखाद्याला उशीरा मिळेल ते खरं आहे. पण त्याला मिळेल याची खात्री मिळायला पाहिजे. तो मिळेल मिळेल म्हणून इतके वर्ष थांबले. हे शोभा वाढवणार काम नाही.

**मा. आयुक्त :-**

इथे दोन कर्मचाऱ्यांच्या बाबतीमध्ये तुम्हाला त्यांच्या बाबतीमध्ये डिटेल माहिती द्यायला सांगु का?

**रोहिदास पाटील :-**

माझ्याजवळ त्या बाबतची फाईलच आहे. श्री. संजय गोखले ह्यांनाही माहित आहे. ती फाईल घेऊन मी त्यांच्याजवळ बसलो होतो. मी त्यांना असाच प्रश्न केला होता की, जर कोणीही कर्मचारी जर महानगरपालिकेत काम करतो त्याची बायको, त्याची आई काय अपेक्षा करत असेल? ह्याचे उत्तर द्या ना. तुमचा नियम कुठे आहे, काय कुठे आहे? अनेक गोष्टींना आपण नियमात बसवून आपण व्यवस्था केली असेल. जे नियमात नाही असे म्हणत नाही. पण नियमात बसवून आम्ही अनेक गोष्टी मार्गी लावल्या. त्याही गोष्टी मार्गी लागायला पाहिजे. आम्हांला त्याचे आश्चर्य वाटते की, ते काम मार्गी का लागत नाही. सांगा ना. काही जर तांत्रिक अडचणी होत्या त्याची तरी समजून काढायला पाहिजे होती. या तांत्रिक अडचणी आहेत. कोणतीही तांत्रिक अडचण नाही. ३ महिन्यानंतर मा. खतगांवकर साहेबांनी उत्तर दिले की, आता परत स्टॅण्डींगला घेतो. ते कशासाठी?

**मा. आयुक्त :-**

स्टॅण्डींगला तो विषय कशाला घ्यायला सांगितला आहे?

**रोहिदास पाटील :-**

काय माहित नाही. आम्ही काय वकिल नाही.

**याकूब कुरेशी :-**

मा. महापौर साहेबांना विचारु इच्छितो की, प्रश्न उत्तरासाठी किती तास टाईम लिमिट दिलेले आहे. अजून टाईम संपला नाही का? अर्धा तास झालेला नाही का?

**नगरसचिव :-**

संपत नाही अजून अर्धा तास झाला नाही.

**रोहिदास पाटील :-**

वेळ संपत आली असेल तर मी बसतो. आमची हम्बल रिक्वेस्ट आहे की, असे एक सोडून अनेक कर्मचारी आहेत. आज माझ्याकडे  ८-९ लोकांचे कागदपत्र नाही. पण अशा ११ कर्मचाऱ्यांच्या बाबत आपण न्याय देण्यात बाकी आहोत. आपण अन्याय करतो असा आम्ही शिक्का मारत नाही. पण न्याय देण्यात बाकी आहोत.

**मा. आयुक्त :-**

शक्यतो आपण कर्मचाऱ्यांना त्यांचे जे काही फायदे आहेत ते त्यांना देण्याचा प्रयत्न केलेला आहे आणि आपण अजून प्रयत्नशील आहोत.

**रोहिदास पाटील :-**

उदयाच्या बजेटमध्ये साडे ४०० कोटी रुपयाचे दयाल. तर कशासाठी आपण ८-१० कर्मचाऱ्यांना वंचित ठेवायचे.

**धनराज अग्रवाल :-**

साहेब, त्यांना न्याय मिळेल का? आमची अशी मागणी आहे की, त्या कर्मचाऱ्यांनी न्याय मिळेल का नाही?

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्य रोहिदास पाटील यांनी दोन कर्मचाऱ्यांच्या बाबतीत जो मुद्दा उपस्थित केला आहे. त्याच्याबद्दल मी म्हणालो त्यांना ह्या दोन कर्मचाऱ्यांच्या बाबतीमध्ये जी काही त्याची बॅक हिस्ट्री आहे. त्याच्या बद्दल माहिती पाहिजे असेल तर मी दयायला सांगतो. आता लगेच किंवा जर समजा त्यांच्यावरती आपल्याला असे वाटत असेल की, खरोखरच अन्याय झालेला आहे. तर त्या संदर्भामध्ये आपण माझ्या दालनामध्ये या मी तुमचे त्याबाबतीमध्ये पूर्ण समाधान करीन.

**धनराज अग्रवाल :-**

आमच्या गटनेत्यांनी सांगितले आहे की, अजून १० ते ११ माणसे बाकी आहेत.

**अनंत पाटील :-**

मा. महापौर मॅडम, पदोन्नतीच्या संदर्भात आणि श्रेणी जेष्ठत्वानुसार ग्रामपंचायती पासून आजपर्यंत बरेचसे कर्मचारी शिल्लक आहेत आणि असे आपण आता म्हटले की, सन्मा. गोखले साहेबांनी तसे कोणी राहीलेच नाही आणि सन्मा. सदस्य रोहिदास पाटील साहेब म्हणतात की, दोन कर्मचाऱ्यांना तुमच्याकडे दिलेले आहे. मला असे वाटते की, १५ ते २० कर्मचारी ग्रामपंचायतीच्या सेवेपासून आतापर्यंत काम करत आहेत. त्यांना पदोन्नती देणे आवश्यक असताना त्यांना का डावळले जाते? त्याच्याबद्दलही सहानूभूती दाखवायला पाहिजे त्या दृष्टीने खुलासा करावा.

**मा. आयुक्त :-**

पदोन्नतीच्या संदर्भामध्ये मा. महासभेने जे काही धोरण ठरविलेले आहे. त्या धोरणाप्रमाणेच आपण पदोन्नती देतो. पदोन्नतीसाठी आपण वेगळे निकष लावलेले आहेत. अशातील काही भाग नाही किंवा प्रशासनाने काहीतरी वेगळी प्रश्नावली तयार केलेली आहे. अशातील भाग नाही. जे मा. महासभेने ठरविलेले आहे. ते त्या मा. महासभेने निश्चित केलेल्या धोरणाप्रमाणेच कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्यात येते.

**रोहिदास पाटील :-**

साहेब, मी शांतपणे विचारतो कुठे ही घाई करत नाही. मध्ये प्रतिष्ठेचा प्रश्न आणला. आम्ही मॅडम, यांना रिक्वेस्ट करत होतो की, हे बघा तुम्ही आमचे ऐकून तरी घ्या. सहा कर्मचाऱ्यांना तुम्ही कामावर घ्यायचे ठरविले स्थायी समितीचा ठराव आहे. मा. महासभेचा ठराव आहे. पुन्हा स्थायी समितीचा ठराव आहे. तर त्यात २४ पैकी ६ लोकांना घेतले १८ लोकांना बाकी ठेवलं. सन्मा. गोखले साहेबांना माहिती आहे ते सांगा. ठराव त्यांच्याकडे आहे. मॅडमला त्यांच्यामध्ये काही माहिती नाही असे आम्ही म्हणत नाही. तुम्ही जसे रिपोर्टींग कराल तसेच त्या रुलिंग देतील. खरी रिपोर्टींग जर नाही केली तर त्यांनी त्याच्यात तशी दुरूस्ती केली असती पण तुम्ही त्यात खरी रिपोर्टींग केली नाही. सन्मा. रविंद्र माळी इथे आहेत. त्यांना मी नंतर सांगितले की, ६ माणसांचा जर तुम्हाला पुळका होता पण त्या १८ माणसांनी काय गुन्हा केला होता? मी त्यांना विचारलं, प्रेमाने विचारले आणि पुन्हा विनंतीही केली की, तुम्ही तुमच्या गटाचे नेते आहात. तुम्ही जो ठराव दिला तो परत येईल. त्या लोकांना न्याय द्या. पण आपण विशिष्ट लोकांना न्याय देऊन उगाच समाजामध्ये आपल्या बद्दल एक वेगळे मत तयार करत आहोत. ती ही माणसे आपली आहेत. त्यांनीही काम केलेले आहे. कोणाच्या जमिनी घेतल्या आहेत. त्यात आपली काय चूक आहे? त्या भुमिकेत काय चूक आहे ते सांगा. मागणाऱ्याची काही चूक आहे. बोलणाऱ्याची काय चूक आहे. पण जेव्हा ते मोजकेच घेतले तर ते वेगळे होते. मॅडम, आज मी तुम्हाला दोष देणारच नाही. या प्रकरणात पण तुम्ही फक्त तुम्ही पिठासिन अधिकारी आहेत म्हणून तुम्ही जिद्द केली आणि तुमचा विजय करुन घेतला. आमच्या तो पराजय नाही आणि प्रत्येक वर्षाच मान्य आहे की जे मतावर जाईल ते भारतीय जनता पार्टीच्या दृष्टीने आम्ही मताने मागे जाणार आहोत. पण जी वास्तविकता आहे त्याला जेव्हा नाकारता तेव्हा आम्हाला कळवळा येतो, वाईट वाटते कशासाठी आपण बोलतो. मी एवढं तुम्हाला प्रेमाने सांगितलं तुम्ही सांगत नाही. १६ कर्मचाऱ्यांचे बघते, रिपोर्ट घेतो. पुढच्या मिटींगला मी आणते. आपण अन्याय करत नाही आणि आपण कोणाची बाजुही घेत नाही. ह्यात तपास करुन पुढच्या मिटींगमध्ये घेणार असे सांगा. सरांनी आम्हाला मदत केली.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य रोहिदास पाटील यांनी जी सुचना मांडली आहे त्या सुचनेमध्ये सर्व कर्मचाऱ्यांना सामावून घ्यावे असे त्याचे म्हणणे आहे. त्य संबंधिताची सर्व माहिती आहे. ती पुर्ण माहिती मागवून लवकरात लवकर त्यांच्यावरही त्यांनाही न्याय मिळवून देण्याचा पूर्ण प्रयत्न करु. विषय पूर्णतः सहा कर्मचाऱ्यांचा विषय करुन घेतला त्याचप्रकारे ह्या विषयालाही आपण प्राधान्य देऊ या.

**रोहिदास पाटील :-**

धन्यवाद.

**लिओ कोलासो :-**

मॅडम, आपली परवानगी असेल तरच मी बोलतो. या संदर्भामध्ये मी 'ज' खाली प्रस्ताव टाकला आहे. सन्मा. सदस्य रोहिदास पाटील यांनी चर्चा करताना जे काही मुद्दे मांडले ते विचार करण्यासारखेच आहेत. पण त्याही पलिकडे आम्ही असे म्हणतो, मी माझा 'ज' चा प्रस्ताव पण मागे घेईन. परंतु, जसे आपण म्हणता की, ते तपासून त्याप्रमाणे निर्णय घेऊ. आम्हाला मा. आयुक्तांनी, मा. महापौरांच्या माध्यमातुन आपल लक्ष वेधतो की, निर्णयासाठी किंवा छानणीसाठी जे काही कागदपत्र त्या त्या कर्मचाऱ्यांच्या संदर्भात व्यवस्थितरित्या पुटअप करायला पाहिजेत. ते करताना कुठेतरी प्रशासन डावी, उजवी भुमिका घेत आहे अशा स्वरुपाच मतं आमचे झालेले आहे. इट ईज व्हेरी सॅड ते फार दुःखदायक आहे की, चार माणसांना न्याय द्यायचा आणि दोन माणसांना कोणाच्या हट्टा खातर, कोणाच्या आवडीसाठी, कोणाच्या मतभेदासाठी बाजुला ठेवायचे असे होता कामा नये. आपले प्रशासन खरोखरच चांगल आहे. विरोधी पक्ष कधीच मानणार नाही की मिरा भाईंदरच प्रशासन चांगल नाही. परंतु, .......

**रोहिदास पाटील :-**

कधी तरी मानणार अशी परिस्थिती तयार करा ना.

**लिओ कोलासो :-**

तशी परिस्थिती निर्माण करतो. मा. महापौर साहेब त्याच्याचसाठी आम्ही सत्ताधारी असताना 'ज' चा प्रस्ताव टाकायचा, लक्षवेधी टाकायची आणि सगळं चव्हाट्यावर आणायला मागणी करायची तर नाही, इट ईज नॉट रिक्वायर. परंतु, आमची भुमिका स्पष्ट आहे की, कुठल्या कर्मचाऱ्यांना त्यांची सेवाजेष्ठता देताना निकषानुसार देण्यात यावेत. आमच्याकडे आहेत. बऱ्याचशा गोष्टी आहेत की, ज्या समोरासमोर बसून ॲलाब्रेट करुन त्याचा निर्णय घेणे भाग पडेल. म्हणून ही चर्चा प्रश्नोत्तराचा तास असताना सुध्दा करत आहे आणि माझा 'ज' चा प्रस्ताव आपण फेटाळला तरी चालेल. परंतु, प्रशासनाने त्याची योग्य ती नोंद घ्यावी अशी अपेक्षा व्यक्त करतो.

**नगरसचिव :-**

प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे. आजच्या सभेकरिता एकूण चार लक्षवेधी आलेल्या आहेत. त्या मा. महापौर मॅडम यांच्याजवळ सादर करीत आहे.

**मा. महापौर :-**

आजच्या सभेसाठी एकूण चार लक्षवेधी आलेल्या आहेत. प्रथम आलेली लक्षवेधी सन्मा. सदस्य प्रकाश दुबोले यांची. विषय महानगरपालिकेच्या कामात सुसुत्रता आणण्याबाबत. दुसरी लक्षवेधी सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवाल यांनी दिलेली आहे. विषय केंद्र शासनाने सुरु केलेल्या सर्वशिक्षण अभियानाअंतर्गत ६ ते १४ वयोगटातील महात्मा फुले शिक्षण केंद्र हमी योजना अंतर्गत मिरा भाईंदरमध्ये सुरु करण्यात आलेल्या योजनेत भ्रष्टाचार. तिसरी लक्षवेधी सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवाल यांनी दिलेली आहे. विषय मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम १०६ नुसार वार्षिक लेखा परिक्षण अहवाल सादर करण्याबाबत. चौथी लक्षवेधी सन्मा. सदस्य रोहिदास शंकर पाटील यांची. विषय आहे, रेल्वे फाटकावरील बोगदा छोटा झाल्यामुळे पाण्याचा निचरा होण्यास अडचण होईल त्यामुळे निर्माण होणाऱ्या गंभीर पुर परिस्थिती बाबत. अशा एकूण चार लक्षवेधी आलेल्या आहेत. सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवाल यांनी जी केंद्रशासनाने सुरु केलेल्या सर्वशिक्षण अभियान अंतर्गत ६ ते १४ वयोगटातील महात्मा फुले शिक्षण हमी केंद्र योजना अंतर्गत मिरा भाईंदरमध्ये सुरु असणाऱ्या ज्या योजनेमध्ये भ्रष्टाचार झालेला आहे. त्याबद्दल जी माहिती दिलेली आहे ती लक्षवेधी स्विकारत आहे. ह्याच्यावर १० ते १५ मिनिट चर्चा घडवून आणून चर्चा करण्यात येईल.

**याकुब कुरेशी :-**

मा. महापौर मॅडम, यांना विनंती करु इच्छितो की, आज शुक्रवार असल्यामुळे आमच्या नमाज पढण्याचं टाईम होत आहे आणि आम्ही नमाज पढण्यास जात आहे. कृपया याची नोंद घ्यावी.

(नगरसचिवांनी सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवाल यांच्या लक्षवेधीचे वाचन केले.)

**लिओ कोलासो :-**

मा. महापौर मॅडमच्या परवागनीने बोलतो. ही जी लक्षवेधी वाचली ह्याच्या शेवटच्या भागामध्ये असे म्हटलेले आहे की, वृत्तपत्रातील बातमीवरुन समजत आहे. इज इन डीड. मी पिठासिन अधिकाऱ्यांना विनंती करतो की, पिठासिन अधिकाऱ्यांना किंवा मा. आयुक्तांच्या कडून खुलाशाची अपेक्षा करतो की, वृत्तपत्रीय बातमी ही लक्षवेधीचा विषय होऊ शकतो काय? आम्हाला त्यांना विरोध करायचा नाही. वुई वील एक्सेप्ट वुई वील पार्टीसिपीट इन द डेलिग्रेशन. परंतु, वृत्तपत्रातील बातमी ही लक्षवेधीचा विषय होऊ शकते काय? याच्यावर कोणी तज्ञ खुलासा करतील तर बरे होईल.

**रोहिदास पाटील :-**

मा. महापौर मॅडम, याच्यावर वेळ घालवण्यापेक्षा सन्मा. सदस्य लिओ कोलासो यांनी विचारलेली माहिती त्यांच्यादृष्टीने योग्य असेल. पण ती वृत्तपत्रातील माहिती नसुन वस्तुस्थिती आहे की, त्यामुळे त्याच्या प्रत्येक गोष्टीचा रस्व, दिर्घ काढण्यापेक्षा त्या वस्तुस्थितीवर बोला की, ज्या संस्थांनी याचा गैरवापर केलेला आहे असे प्रथम दर्शनी तसे दिसून आलेले आहे. मा. आयुक्तांची कुठपर्यंत खात्री पटलेली आहे. मा. पिठासिन अधिकाऱ्यांची, त्यामुळे सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवालजींना विचारायचे काही कारण नाही. त्यांनी वृत्तपत्रातील मुद्दा लिहला आहे असे कारण नाही. त्याची वस्तुस्थिती काय आहे असे विचारा तर आम्हाला बरे वाटेल.

**लिओ कोलासो :-**

आमची मा. पिठासिन अधिकाऱ्यांना विनंती आहे की, जर खरोखरच अशा प्रकारची वस्तुस्थिती असेल तर, तर सभागृहाला अवगत केली तरी सुध्दा चांगलच आहे.

**शिवप्रकाश भुदेका :-**

हमारे पत्रकारोंपर आपको विश्वास नही है क्या?

**अनंत पाटील :-**

मा. महापौर महोदया, आपल्याला विनंती करतो की, जी योजना आता बालविकास यांच्या संदर्भामध्ये खिचडी संदर्भात ही योजना आहे आणि यांच्या संदर्भामध्ये राईला प्राथमिक शाळेमध्ये जवळजवळ ११ गोणी हे तांदुळ जसेच्या तसे .........

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सन्मा. अनंत पाटील साहेब, पहिल्यांदा प्रशासनाला याबाबत खुलासा करु द्या. कारण आपण हे त्यांना दिलेले आहे तरी त्यांनी सांगितले की, आपणाकडून आले तर मान्य करणार नाही.आपल्याकडे काही पुरावे आहेत आपण त्या आधाराने बोलू. आता त्यांना खुलासा करु द्या. त्यांनी याच्यावर काय कार्यवाही केली. हे एका वर्तमानपत्रामध्ये नाहीतर अनेक वर्तमान पत्रामध्ये ही बातमी आलेली आहे आणि वर्तमानपत्रामध्ये नाहीतर आपल्या या सभागृहाचे मा. उपमहापौर यांनी या मुलाखतीमध्ये या भ्रष्टाचाराचा उल्लेख केलेला आहे. मी नाही, मा. महापौर साहेबा, आपले उपमहापौर गेलेले आहेत. त्यांनी स्वतः एका वाहिनीमध्ये मुलाखत दिलेली आहे. तरी प्रशासनाने याची बाजु सांगावी, नंतर पुढे सांगु.

**मा. महापौर :-**

लक्षवेधी स्विकारलेली आहे. लक्षवेधीवर आपण दहा मिनिटे चर्चा करु.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

ही जी गोष्ट मी विचारलेली आहे की, भ्रष्टाचार झालेला आहे की नाही? केंद्र सुरु आहे की नाही? जे मी माझ्या लक्षवेधीमध्ये सांगितलेले आहे की, अशी केंद्र सुरुच नाही किंवा आहे ते दुसऱ्या ठिकाणचे आहे. याचा रितसर खुलासा करा. त्यांनतर मी पुढील गोष्टीवर बोलतो.

**मा. महापौर :-**

संबंधित विषयाचा मा. आयुक्त साहेब खुलासा करतील.

**मा. आयुक्त :-**

महात्मा फुले हमीयोजनेच्या संदर्भामध्ये दैनिक लोकमत, नवशक्ती, सामना इत्यादी वर्तमानपत्रामध्ये ज्या बातम्या आलेल्या होत्या. त्या संदर्भामध्ये मी स्वतः त्यांना संबंधित विभागाला दि. ०४/१०/२००६ रोजी आदेश दिलेले होते. ह्या ज्या बातम्या आलेल्या आहेत. ह्या बातम्यामध्ये ज्या काही नमुद केलेल्या बाबी आहेत. त्याचा स्वयंस्पष्ट अहवाल माझ्याकडे सादर करा. त्याप्रमाणे त्यांनी दि. १२/१०/२००६ ला अहवाल सादर केलेला आहे आणि त्याच्यामध्ये सन २००६-०७ याच्यामध्ये महानगरपालिका परिसरामध्ये फेब्रुवारी, २००६ पर्यंत एकूण ३६ केंद्र सुरु केली होती. त्याच्यामध्ये १ लाख ९५ हजार ६०० रुपये इतके मानधन व अनुदान अदा केलेले आहे. अशाप्रकारे त्यांनी खुलासा केलेला आहे आणि त्यापैकी अभिनव शेतकरी शिक्षण मंडळ, न्यु लाईट एज्युकेशन व मिरा भाईंदर कला क्रिडा आणि संकुल या संस्थांना जे धनादेश दिलेले आहेत. ते धनादेश अद्यापपर्यंत आपल्या खात्यातुन त्यांच्याकडे वर्ग झालेले नाहीत. त्याचप्रमाणे संबंधित विभागाच्या अधिकाऱ्याने दि. ०७/१०/२००६, दि. ०८/१०/२००६, दि. ०९/१०/२००६, दि. ११/१०/२००६ आणि दि. १२/१०/२००६ असे जवळजवळ ५ ते ६ दिवस सतत प्रत्येक केंद्रांना भेटी देऊन त्याबाबतचा वस्तुनिष्ठ अहवाल सादर केलेला आहे. ह्याच्यामध्ये एकूण ७ संस्थाने मिळून वाटप केलेल्या ३६ केंद्रांपैकी ११ केंद्र ही पूर्णपणे बंद असल्याने निदर्शनास आलेले आहे. त्याच्यापैकी जी केंद्रे सुरु होती. त्या संदर्भामध्ये त्यांनी पाहणी केलेली आहे आणि त्यांच्याकडून काही माहितीसुध्दा मागवण्यात आलेली आहे. या बातमीमध्ये ही चौकशी ही अंतिम टप्प्यात आलेली आहे आणि या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करण्यासाठी मा. उप-आयुक्त मुख्यालय यांना मी निर्देश दिलेले आहेत. लेखी स्वरुपात निर्देश दिलेले आहेत. त्यांच्याकडून साधारणपणे आठवड्या भरामध्ये अहवाल आपल्याकडे प्राप्त होईल आणि अहवाल प्राप्त झाल्यानंतर ह्या बाबतची माहिती आपल्याला समक्ष माझ्याकडून हवी असेल तर मी आपल्याला समक्ष देईल किंवा सभागृहामध्ये जर आपल्याला माहिती हवी असेल तर सभागृहामध्येही मी माहिती देईन.

**रोहिदास पाटील :-**

साहेब, आम्ही दोन्ही गोष्टीची अपेक्षा करतो. आम्ही जेव्हा तुम्हाला पत्र दिले त्यात तुम्ही मला लेखी कळवावे असे दिलेले आहे. याला पुष्कळ उशीर झाला. पण, जाऊ द्या प्रक्रिया चालू आहे आणि आम्हालाही पत्र द्या, सभागृहातील पत्र द्या. आता याच्यमध्ये प्रश्न एवढाच आहे की, जी ११ केंद्र बंद आहेत त्यांनी आपल्याकडून किती रुपयाचे धनादेश स्विकारलेले आहेत आणि त्यांनी वटवलेले आहेत किंवा ते त्याचे बंदच आहेत आणि आपण दिले. आम्ही अधिकाऱ्यांवर दोष ठेवतो अशा भुमिकेत नाही. वस्तुस्थिती नंतर बोलू पण जर आपण योजनेतील पैसे सद्‌भावनेने दिले आणि चालवणाऱ्या संस्थांनी त्या पैशांचा दुरुपयोग केला तर ते कसे काय? किती प्रमाणात झाला? किती टक्के दुरुपयोग झालेला आहे? जी केंद्र आजच्या घडीला बंद म्हणून दिसतात. ती प्रथम आपल्या पाहणीत रेकॉडवर आली की, ती ११ केंद्र बंद आहेत त्यांनी धनादेश घेतले का? घेतले तर किती रुपयाचे वटवले जसे आपण काहींना दिले त्यांना आपण दिले पण त्यांनी वटविले नाही. त्यांनी त्यांच्या खात्यात डिपॉझीट केले नाही. म्हणजे त्याच्यावर आज काही आपण फार बोलावे की, नाही असा विषय येईल. तुमच्या निवेदनानुसार पण जी ११ केंद्र बंद आहेत. त्यांना किती रुपयाचे धनादेश दिले त्याची थोडी माहिती सांगा.

**मा. आयुक्त :-**

म्हणून मी आपल्याला आता सांगितले की, या संदर्भामध्ये चौकशी ही अंतिम टप्प्यामध्ये आहे. सात दिवसामध्ये या चौकशीचा अहवाल माझ्याकडे प्राप्त होणार आहे. म्हणून मी आपल्याला सांगितले की, जर

आपल्याला वैयक्तिक माहिती हवी असेल तर आपण माझ्या चेंबरमध्ये येऊन घेऊ शकता किंवा जर आपण म्हणालात तर मी सभागृहापुढे ती माहिती उपलब्ध करण्याची व्यवस्था करेल.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सभागृहामध्ये चर्चा झाली पाहिजे.

**मा. महापौर :-**

आपण विचारलेल्या प्रश्नाबाबतची जी माहिती आहे ती पूर्णपणे सभागृहापुढे देण्यात येईल. सन्मा. सचिव पुढील कामकाजाला सुरुवात करावी.

**अनंत पाटील :-**

मा. महापौर महोदया, आपण आता जे खिचडी योजने अंतर्गत जी बाब हा प्रश्न निर्माण झाला होता. राईच्या शाळेमध्ये जो तांदूळ मिळायला या ठिकाणी राई प्राथमिक शाळेमध्ये खिचडी बनवून मुलांना वाटली जाते. परंतु, त्या शाळेच्या गोदामामध्ये तांदुळाच्या ११ गोणी भरुन पडलेल्या आहे. त्या तांदळाच्या गोणी तिकडे आल्या कशा? जर मुलांना आपण खिचडी बनवून देतो तर ते रेग्युलर देतो. त्यात भेदभाव करत नाही किंवा देत नाही. अशातलाही विषय नाही. परंतु, त्या गोदामामध्ये ११ तांदळाच्या गोणी पडून आहेत. त्या तिथे कशा आल्या? याचा खुलासा करावा.

**मा. महापौर :-**

संबंधित अधिकारी आपल्या प्रश्नाचा खुलासा करतील.

**सुर्यवंशी (शिक्षण अधिकारी) :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो. राई शाळेमध्ये ज्या ११ गोणी तांदळाच्या पडलेल्य आहेत तर २९ सप्टेंबरला जेव्हा गोदामामधून जे तांदूळ उचलले ते वाटप करताना उशीर झाला होता आणि त्याच्यामुळे न्युलाईट आणि गणेश कृपा या दोन संस्थांचे महात्मा फुले शिक्षण हमी योजना शिक्षण केंद्र हे स्वयंसेवकाच्या घरात किंवा समाज मंदिर अशा ठिकाणी भरवले जाते आणि म्हणून ती सेंटर बंद झाली होती व उशिर झाल्यामुळे ११ गोणी तांदूळ मनपाच्या शाळेमध्ये उतरवल्या आहेत आणि दुसऱ्या दिवशीच त्यांना सांगून वाटप करण्यात येईल.

**अनंत पाटील :-**

आतापर्यंत पडून आहेत त्याचं काय? जिथे खिचडी वाटतो आपण पण ते अशातऱ्हेने गोदामात टाकल्या आहेत. तिथे सर्व पडलेले आहे, तुटलेली बाकडी आहेत. तर ते कसे काय? म्हणजे एका शाळेचा वाटा दिला. आदर्श विद्यामंदिरमध्ये मी स्वतः होतो. तिथे गोणी दिल्या गेल्या. परंतु, आम्ही हा टेम्पो पाहताना तो शाळेजवळ उभा राहिल्यानंतर तिकडचे वॉचमेनही सांगायला लागले की, इथे ठेऊ नका. तर आमच्या अंगावर येईल एवढी खिचडी आम्ही कुठे घेऊन जाणर. परंतु, त्या गोणी तिथे जबरदस्तीने उतरवल्या गेल्या. तर ह्या गोणी जबरदस्तीने का उतरवल्या? तिथे शिक्षण मंडळाचे अध्यक्षही गेले होते आणि त्यांनीही ते पाहिलेले आहे. हा प्रकार काय आहे? तांदूळ तिकडे ठेवण्याचा उद्देश काय? तुम्ही म्हणालात शटर बंद झाला होता तर मग सकाळी तांदूळ का नाही उचलला?

**सुर्यवंशी (शिक्षण अधिकारी) :-**

त्या संबंधी चौकशी झाली. त्यांनी मला सांगितले की, दोन संस्थानांचे ऑफिस बंद झाल्यामुळे तिथे तांदूळ उतरविलेले होते आणि दुसऱ्या दिवशी ते देणार. परंतु, त्याच्यानंतर बातमी आल्यामुळे न्युलाईट शाळेने सांगितले की, आम्ही केंद्रच बंद केले म्हणून त्यांना देण्यात अर्थच नव्हता. म्हणून ते अजून तिथेच पडून आहेत त्याच्यानंतर नोव्हेंबरच्या नियत्तनमध्ये आम्ही त्याचे समायोजन करणार होतो. म्हणजे राई शाळेला, आपल्या मनपाच्या शाळेला आपण नोव्हेंबरची उचल करणार. त्यावेळी त्याचे तिथेच समायोजन करणार कारण नियत्तन एकदा उचलल्या नंतर तर ते पुन्हा परत पाठविता येत नाही. पण नोव्हेंबरचे देताना आम्ही कमी मागणी करणार जे आलेले आहे ते त्यांना जिथल्या तिथे देणार.

**अनंत पाटील :-**

सद्य परिस्थिती त्या तांदळाची तुम्ही अवस्था पाहिलीत का? आता तिथे राहिलेले तांदूळ आहेत काय? ते उंदरांनी कुडतडले आहेत का ते आपण पाहिले का? ते वापरण्याच्या सुध्दा लायकीचे नाही.

(नगरसचिवांनी प्रकरण क्रमांक ८४ चे वाचन केले.)

**रोहिदास पाटील :-**

मा. महापौर मॅडम, इतिवृत्तांताला आपण मंजुरी देऊ या. याच्यामध्ये जेव्हा आपला सहीचा विषय आला. तर ती आपण सांगितले ती सही माझी नाही, माझी आहे. काय नक्की आता कुठपर्यंत आम्ही तुम्हाला विनंती केली होती, आग्रह धरला होता की, तुमची सही जर दुसऱ्यांनी केली असेल असे तुमचे ठाम मत आहे. तर तुम्ही पोलिस केस करा. फौजदारी गुन्हा दाखल करा. तुम्हीही सांगितले होते की, सभा संपल्यानंतर मी फौजदारी गुन्हा दाखल करीन. आपण पुढे त्या बद्दल काय केले हे आम्हाला कळले नाही. कळल असेल तर त्याचे निवेदन करावे. इतिवृत्तांत फार मोठा नाही. सन्मा. सदस्य रोहित सुवर्णा यांच्या सुचना आहेत त्या घ्याव्या लागतील. पण त्यात खरं काय? जेणेकरुन त्या दिवशी ते प्रकरण वाढल होत वेळ गेला होता. काय नक्की आहे ते सांगा.

**हॅरल बोर्जीस :-**

सन्मा. महापौर मॅडम, ऑक्टोंबर महिन्याच्या १२ तारखेच्या मा. महासभेमध्ये ठरावाच्या स्वाक्षरी बाबतीत जो सभागृहात मुद्दा उपस्थित झाला होता. तो प्रशासनाच्या मार्फत १३ ऑक्टोंबरला ह्या स्वाक्षरीच्या विषयी तज्ञाकडे अहवाल मागण्यासाठी प्रस्ताव पाठविला आहे. तर सन्मा. सदस्य रोहिदास पाटील यांना कदाचित कल्पना नसेल तर प्रशासनाकडून सदर ठरावाच्या स्वाक्षरी बाबत.....

**रोहिदास पाटील :-**

सन्मा. सदस्य हॅरलजी बोर्जीस आपण सभागृहाचे नेते आहात म्हणून आम्ही मान ठेवतो. आम्ही सांगतो की, जसे खेळीमेळीने चालले आहे तसेच चालू द्या. आपण एवढीच विनंती केलेली आहे की, त्या स्वतः म्हणतात ती सही माझी नाही त्यामुळे त्यांनी काय केले? कोणती भुमिका बजावली? कारण त्या एकट्या नाही. त्या एकट्या असत्या साध्या नगरसेविका बोलल्या असत्या तर गोष्ट वेगळी. त्या पिठासीन अधिकारी तसेच मा. महापौर आहेत. त्यामुळे त्याला एक महत्व आहे. म्हणून आज जर त्या म्हणत असतील ती सही माझी होती तर तो वेगळा विषय होतो व आजही त्या म्हणत असतील की, ती सही माझी नाही. तर स्वाभाविक आहे की, ती सही त्यांची नाही. एखाद्या कोणी कर्मचाऱ्याने ती सही करण्याचा प्रयत्न केला किंवा एखाद्या नगरसेवकांनी ती सही करायचा प्रयत्न केला. असे जर केलेले असेल तर तो विषय वेगळा आहे. त्यामुळे त्यांना निवेदन करु द्या.

**हॅरल बोर्जीस :-**

सन्मा. सदस्य रोहिदास पाटील स्वाक्षरी तज्ञांना ..........

**रतन पाटील :-**

साहेब, आपण त्या दिवशी निवेदन केलेले आहे. आपण त्या ठरावाला स्वतः सुचक म्हणून आहात.

**रोहिदास पाटील :-**

मा. महापौर मॅडम, सन्मा. सभागृह नेते यांना बोलू देऊ नका.

**रतन पाटील :-**

मॅडम, यांना बोलू द्या. आपण सुचक आहात. आपण प्लेअर झालेले आहात.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य रतन पाटील आपण बसून घ्या.

**रतन पाटील :-**

यावर मा. महापौरांनी निवेदन करायचे आहे.

**रोहिदास पाटील :-**

आम्ही आपल्याला सांगतो. आम्ही आपल्याला काहीच त्रास देणार नाही. साधं एकदम स्वयंस्पष्ट म्हणजे नीट रेकॉर्डिंग होईल असे निवेदन करावे.

**हॅरल बोर्जीस :-**

सन्मा. सदस्य रोहिदास पाटील निवेदन अगदी शॉर्टमध्ये एवढचं सांगितले की...

**रतन पाटील :-**

आपण सुचक म्हणून होता आणि विरोधी पक्षनेते अनुमोदक होते.

**रोहिदास पाटील :-**

तुम्ही त्याची चांगली बाजू घेउन मांडा पण तुम्ही त्यांना बोलू द्या ना.

**रतन पाटील :-**

त्यांनी निवेदन करावे ना. आपल्या बद्दल आमचे काहीच म्हणणे नाही.

**रोहिदास पाटील :-**

आपल्याला गप्प बसायला सांगत नाही.

**हॅरल बोर्जीस :-**

आपण बोलायला द्याल तेव्हा मी बोलणार ना.

**रतन पाटील :-**

सन्मा. सदस्य रतन पाटील आपण ऐकून घ्या. खाली बसा.

**रोहिदास पाटील :-**

सन्मा. सदस्य हॅरल बोर्जीसजी आपण न बोललेले बरे म्हणजे हे प्रेमाने होईल.

**रतन पाटील :-**

याबाबत मा. महापौरांनीच बोलावे.

**लिओ कोलासो :-**

पिठासिन अधिकारी साहेबा, सभागृह नेते बोलत असताना आपण बोलू नका हे अशा स्वरूपाचे बोलणे हे लोकशाहीवादी जनतेचे काम नाही हा काहीतरी गोंधळ घालण्याचा प्रकार आहे. सभागृह नेते जेव्हा सभागृहाने ऐकायला पाहिजे ना.

**हॅरल बोर्जीस :-**

मा. महापौर मॅडम, सभागृहामध्ये मी एवढया साठीच वक्तव्य करतो की, त्या ठरावावर...

**रोहिदास पाटील :-**

ठिक आहे. सभागृह नेते बोलतात ते आम्ही ऐकतो.

**हॅरल बोर्जीस :-**

सन्मा. सदस्य रोहिदास पाटील १२ ऑक्टोंबर २००६ च्या मा. महासभेत ठरावाच्या बाबतीमध्ये मा. महापौरांचा स्वाक्षरी बाबत जो आक्षेप होता. १३ ऑक्टोंबरला प्रशासनाच्या मार्फत मा. आयुक्त महाशयांनी सदर ठरावाच्या स्वाक्षरी बाबत सविस्तर अहवाल तज्ञाकडे पाठविले आहे. अजूनपर्यंत तज्ञांचा अहवाल प्रशासनाला प्राप्त झालेला नाही. तर त्या स्वाक्षरीच्या बाबतीमध्ये जे मत मा. महापौर मॅडमच पूर्वी होत ते आजही आहे. सदर ठरावाच्या स्वाक्षरी बाबत ज्यावेळेला तज्ञाकडून अहवाल प्राप्त होईल त्यावेळी त्याच्यावर उचित भाष्य करणे योग्य होईल.

**रोहिदास पाटील :-**

मी सभागृहाला माहिती देतो आणि रेकॉर्डवर येणे अत्यंत गरजेचे आहे हे सभागृह त्याच बरोबर स्थायी समिती सभागृह दोन्हीही महानगरपालिकेची महत्त्वाची सभागृहे आहेत. त्यात बोलले जाणार सर्वच बोलणं खरं असावे असे सगळ्यांना अभिप्रेत आहे आणि अपेक्षाही करतात. पण सभागृह नेते जे माहिती देतात ती आणि स्थायी समितीत दिलेली माहिती स्थायी समिती होउन ८ दिवस झाले नाहीत. स्थायी समितीचे सभापती बसलेले आहेत. त्यावेळी उपायुक्त मुख्यालय यांनी निवेदन केले की, ह्याच्याबद्दल मी निवेदन करतो की, पुढे काय झालेले नाही जे झालेलं आहे ते सन्मा. सचिवांना माहित आहे.

**हॅरल बोर्जीस :-**

मा. महापौर मॅडम, ज्यावेळी स्थायी समितीवर याबाबत चर्चा झाली. मी जरी स्थायी समितीचा सद्य स्थितीमध्ये सदस्य नसलो तरी सन्मा. मुख्यालय उपायुक्त स्थायी समितीला अशाप्रकारचे निर्देश दिले की हा विषय मा. महासभेचा असल्यामुळे याच्यावर स्थायी समितीमध्ये अधिक भाष्य करणे उचित होणार नाही. अशा प्रकारची त्यांना माहिती दिली.

**रोहिदास पाटील :-**

नाही. तुम्हाला त्यातले थोडेसे सांगितले त्याच्या पलिकडचे सांगितले नाही. अशी त्यांनी शंका व्यक्त केली. मा. आयुक्त साहेब मॅडम, त्यांनी शंका व्यक्त केली का मा. महासभेची विषय स्थायी समितीत चर्चा करावी का? शहराच्या दृष्टीने अति महत्वाचा विषय आहे. कामकाजाच्या दृष्टीने अतिमहत्त्वाचा विषय आहे आणि त्यांनी मलाच विचारलं की काका याच्यावर चर्चा करावी की नाही. तर मी त्यांना सांगितले सन्मा. सभागृह, स्थायी समिती सभागृह याची माहिती मागत आहे तर द्यायला काहीच अडचण नाही. जे झाले आहे ते सांगा त्यांना सन्मा. सचिवाकडे सांगितले. सन्मा. सचिवांनी निवेदन केले की, सहीसाठी मी त्याच्याकडे कागद पाठविला मा. महापौरांनी त्याच्यावर सही केली नाही आणि तुम्ही जे एकदम ठोसून उत्तर दिलं की १२ तारखेची सभा आणि १३ तारखेला पुढे पाठविले आहे तर १३ तारखेला काहीच झालेले नाही. १२ तारखेला आम्ही पोलिस स्टेशनमध्ये जाउन तक्रार नोंदवली की आम्ही या सभागृहाचे कस्टोडीयन आहोत आम्ही सन्मा. सदस्य आहोत. सभागृहामध्ये झालेली चर्चा त्याचे रेकॉडींग त्या झालेल्या घटना ते दप्तर पोलिसांनी जप्त करावं असे आम्ही पत्र दिले. पोलिसांकडून काय जप्त करायचे की नाही. करु शकतो किंवा नाही हे आम्ही तुमच्या निदर्शनात आणलेले आहे. तुम्हाला जे अधिकार असेल तेवढं तुम्ही करा. असे करुन आम्ही निघालो नंतर आम्ही मा. आयुक्तांना पत्र दिले की हा विषय गंभीर आहे. ह्या दृष्टीने ह्याच्यावरती तुम्ही शहानिशा करावी. याच्या पलिकडे दुसरे काहीच घडले नाही आज जर तुम्हाला असे वाटत असेल. सहीला पाठविलं असे तर १३ तारखेला पुण्याला सहीला नक्की पाठविले नाही हे मी सांगतो. पुन्हा तुम्ही निवेदन करा आणि ज्यांनी पाठविले असेल त्यांनी करावे की, या तारखेला या टपालाने केलेले आहे. जे गेलेले नाही ते तुम्ही रेकॉर्डवर कशाला आणता?

**मा. महापौर :-**

गेल्या महिन्यामध्ये जो इतिवृत्तांत ठेवण्यात आला होता. दि. २०/६/२००६ चा त्यामधील ठराव क्र. ३४ या ठरावामध्ये जे रेकॉर्डिंग आणि पुर्ण मा. महासभेमध्ये सभागृहामध्ये सन्मा. नगरसेवकांनी प्रशासनावरती आर्थिक बोजा पडू नये म्हणून चर्चा करुन जी बारा पद मंजूर केली होती. जो १२ पदांचा मुळ ठराव होता. ती कायम ठेवण्यात येणार होता त्याच दिवशी मी इतिवृत्तांत रुलिंग दिलेले आहे आणि ते रुलिंग आजही कायम आहे. त्यानंतर जो सहीचा विषय चर्चेला आला त्याबद्दल मी प्रशासनाला आपण प्रत्यक्ष हा शासकीय प्रशासकीय विषय असल्यामुळे ती सही कोणाची आहे याबाबत प्रशासनाने चौकशी करावी ती तज्ञाकडे पाठवावी आणि त्याचा खुलासा करावा त्यावेळेस पण मी रुलिंग दिले आहे आणि आजही रुलिंग माझं कायम आहे. मी माझ्या मतावर ठाम आहे अशा प्रकारे प्रशासनाची ही जबाबदारी आहे आणि प्रशासनाने या विषयावर सविस्तर आपली रितसर एक चौकशी समिती नेमुन त्या मार्फत अहवाल मागवावा. सन्मा. सचिवांनी पुढील विषयाला सुरुवात करावी.

**धनराज अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, अभी जो सन्मा. सदस्य रोहिदास पाटीलजीने बोला और सभागृह नेता इन्होंने बोला उसमे बहूत फरक है। स्थायी समितीमे अभीतक क्या बोला गया। इन्होंने क्या बोला स्थायी समिती मे....

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य धनराज अग्रवालजी विषय अभी इधर खत्म हूआ। प्रशासन चौकशी करेंगा।

**रतन पाटील :-**

विषय संपला नाही. विषयास आता सुरूवात झाली. आपण निवेदन केलेलं आहे. विषयास आता सुरूवात झाली आहे. संपला नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

जी समिती नेमलेली आहे त्यात कोण आहे. जर सही केलेलाच अधिकारी तोच असेल तर तो काय अहवाल देणार आहे. त्यामध्ये हायकोर्टाचा जज घेतला आहे की, कोणती माहिती द्यावी. जेव्हा समिती नेमली आहे तर त्या समितीचा मुख्य कोण आहे?

**रतन पाटील :-**

जेव्हा आपण सह्या पाठविल्या तेव्हा आपण आपल्या हस्ताक्षराचा नमुना पाठविला आहे का? आपण दिलाच नाही आपण तज्ञाकडे पाठविले सुद्धा नाही.

**लिओ कोलासो :-**

मा. महापौर साहेबांच्या परवानगीने बोलतो.

**शिवप्रकाश भुदेका :-**

मा. महापौर मॅडम, यह आपका एकही ऐसा हूआ है की पहिले भी हूआ है।

**लिओ कोलासो :-**

मा. महापौर मॅडम, आम्हालाही या विषयावर बोलायचे आहे म्हणून आम्हाला परवानगी मिळावी.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आम्ही जी समिती नेमली आहे त्याच्याबद्दल विचारत आहे ना.

**रतन पाटील :-**

ती समिती नेमली आहे की नेमायची आहे ते तरी सांगा?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

समितीत कोण आहे? त्याच्यात शासन मान्यता प्राप्त नेमलेली माणसे आहेत काय? ते तज्ञ आहेत काय? उद्या कोणालाही नेमणार आणि अहवाल सादर करणार.

**लिओ कोलासो :-**

मा. महापौर साहेबा, आपल्या परवानगीने बोलत आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

एक मिनिट समितीची नावे तर येउ द्या ना.

**लिओ कोलासो :-**

आमचे सहकारी....

**रोहिदास पाटील :-**

सन्मा. सदस्य (सर) तुम्ही का घाई करता?

**लिओ कोलासो :-**

कोण घाई करतो?

**रोहिदास पाटील :-**

समिती जाहीर करु द्या ना.

**लिओ कोलासो :-**

आपल्या येथून चार-चार जण प्रश्न विचारायला उभे राहतात ही काय घाई नाही का?

**रोहिदास पाटील :-**

आम्हाला उलट बोलायला तुम्ही प्रवृत्त करु नका.

**लिओ कोलासो :-**

तुम्ही उलट बोलूच नका.

**रोहिदास पाटील :-**

उलट बोलू नका म्हणजे तुम्ही जर सरळ बोलले तर आम्ही उलट बोलणारच नाही.

**लिओ कोलासो :-**

आदरणीय पिठासिन अधिकारी, सन्मा. सदस्य यांनी उपस्थित केलेल्या सहीच्या प्रकाराची शंका आणि आपण केलेले त्याच्यावरचे निवेदन तर जे पहिल्या सभेमध्ये जे निवेदन केले होते तेच शब्दशः आपण इथे व्यक्त केले आहे आणि आपण हे सुद्धा म्हणतात की, मी माझ्या पहिल्या निवेदनाशी ठाम आहे तर आम्ही आपले कौतुक करतो. आपण हे स्वीकारत आहात ही फार चांगली गोष्ट करत आहात. ही सही कोणी केली

खरी आहे. खोटी आहे, बोगस आहे. हिरव्या पेनाने केलेली आहे का? ब्ल्यु पेनाने केलेली आहे. हे प्रश्न जेंव्हा तपासायच्या ऐरणीवरती पडतील तेंव्हाच त्याच्यातील सत्य काय, असत्य काय ते बाहेर पडेल. पण, आपण ज्या हिंमतीने सांगत आहात की, पहिल्या सभेमध्ये आपण निर्देश दिलेले आहेत. मी पुन्हा सन्मा. सचिवांकडे या दृष्टिकोनातून की, सभागृहाच्या संचालनाची त्याच्या सर्व दायित्वाची जबाबदारी नगरसचिवांकडे आहे. सभागृहनेत्यानी सांगितलेली माहिती एक सन्मा. सदस्य रोहिदास पाटील यांनी सांगितलेल्या माहितीतील चार वाक्य अधिक ही सगळी वस्तुस्थिती पाहता नगरसचिवांनी याच्यावर खुलासा करायला पाहिजे की, मा. महापौरांनी ॲज अ पिठासीन अधिकारी म्हणून आपल्याला जे काही निर्देश दिलेले होते त्या निर्देशाचा आपण कुठपर्यंत पाठपुरावा केलेला आहे. अशा स्वरुपाची चर्चा करताना असे उपस्थित होते की, तुम्ही काहीच केलेल नाही. आजपर्यंत तुम्ही काहीच केलेले नाही. केले असेल तर आपण कृपया सांगावे. दुसरे सन्मा. सदस्य ओमप्रकाशजी अग्रवाल यांनी व्यक्त केले की, कोणाची समिती हायकोर्टाचा रिटायर जज आहे का? सुप्रिम कोर्टाचा रिटयर्ड जज आहे का? यस व्युई बिलिव्ह इन. निवृत्त न्यायाधिशावर विश्वास ठेवण्याची आमची क्षमता आहे. आम्ही त्यांचा आदर करतो आहोत. जर अशा प्रकारची चौकशी समिती नेमायची असेल तर मा. महापौरजी साहेबाँ मी आपल्याला मुद्दाम सुचना करेन की, आपण ह्या ठिकाणी एखादा रिटयर्ड मॅजिस्ट्रेटच्या माणसाला इथे चौकशीला नेमावे. अधिक त्याला महानगरपालिकेच्या कामकाजाचा अनुभव असेल अशाही व्यक्तीला ह्याच्यामध्ये नेमावे. ही समिती नाही. एक चौकशी अधिकारी नेमण्यात यावा. समिती नेमल्यानंतर किंवा नेमतांना मग चार सदस्य की, आठ सदस्य या बाकी सर्व गोष्टी येतील. तर आपण एखादा रिटायर्ड मॅजिस्ट्रेटच्या दर्जाच्या अधिकाऱ्या मार्फत चौकशी केली तर आम्ही त्यांचे स्वागत करु.

**धनराज अग्रवाल :-**

सचिवांनी माहिती द्यावी की, याच्यावर काय कार्यवाही केली आहे?

**नगरसचिव :-**

मा. महापौरसाहेबांच्या परवानगीने बोलत आहे, ज्या मागच्या सभेला मा. महापौरांची सही नाही हे निवेदन झाल्यानंतर त्याबद्दल मी सही ही खरी आहे किंवा नाही याची खात्री करण्यासाठी मा. महापौरांना पत्र लिहून सहीच्या नमुन्याची मागणी केली होती. शासकिय चौकशीसाठी जी सहीच्या नमुन्याची गरज असते ते मी मागितले होते पण अजून मला मिळाले नाहीत. म्हणून पुढे प्रस्ताव पाठविलेला नाही.

(सभागृहामध्ये गोंधळ)

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सभागृह नेत्यांनी राजीनामा द्यावा.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य आपण शांत बसावे. गोंधळ करु नका.

**रतन पाटील :-**

मा. महापौर मॅडम, सभागृह नेत्याला हे वक्तव्य शोभत नाही. आपण सभागृहात बोललात की, आम्ही त्या सह्या तज्ञांकडे पाठवलेल्या आहेत. प्रशासनाला सांगावे... मा. महापौर मॅडम, जरा लक्ष असु द्या. यावर मा. आयुक्तसाहेबांनी प्रशासनाच्यावतीने उत्तर द्यावे.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य एकेकाने बोला.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, आम्ही जेव्हा विषय आणतो तेंव्हा आपण बोललात की, आम्ही जास्त बोलतो पण आम्ही सत्य बोलतो तेही तुंम्हाला ऐकायला येत नाही आणि जेंव्हा हे खोट बोलतात तेंव्हा आपण ऐकता आणि तेंव्हा आपण ऐकता आणि मा. सभागृहाला खोट बोलतात. आम्ही चांगला विषय आणतो आणि शहराच्या हिताचा विषय आणतो.

**मा. महापौर :-**

विनाकारण गोंधळ करु नका.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आंम्हाला बोलू देत नाही आणि या खोट्या माणसांना सभागृहामध्ये खोट बोलायला देतात. सभागृह नेत्यांनी राजीनामा द्यावा आणि या पदावरुन मुक्त व्हावे. आंम्हाला असा सभागृह नेता नको.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, या प्रकरणात मी स्वतः तक्रारदार आहे. मा. सभागृहातील विषय हा राहिलेला नाही. रितसर ऑफिसर अपॉईंट झालेला आहे. तपासणी अधिकारी अपॉईंट झालेला आहे. त्याचा तपास सुरु झाला आहे. आता प्रत्येकाची स्टेटमेंट यात होणार आहे. म्हणून याविषयी सभागृहात वाद घालण्यात काहीच अर्थ नाही. आपल्याला ॲथोरटी नाही. तुंम्हाला ॲथोरेटी नाही. मा. कमिशनर साहेबांना ॲथोरेटी नाही, मला ॲथोरटी नाही. पोलिस खातं ज्यावेळेला विचार करेल की, ह्या सहीमध्ये डाउट आहे. पोलिस खातं तिथे विश्लेषण करायला पाठविले जाईल. आपण यात वाद कशाला घालायचा. तपास ऑलरेडी सुरू झालेला आहे. खरं कोण खोट कोण समजेल. या सभागृह नेत्यांनी खोटं बोलून कोणाला सावरायचा प्रयत्न करु नये. ते

फक्त सभागृह सांभाळतात. आम्ही बाकी भरपुर काही सांभाळतो, आणि यापुढे खऱ्याचे खरे, सन्मा. सचिव खोटे असतील तर त्यांचे नावं बाहेर येईल. आपण असाल तर आपल नावं बाहेर येईल. मा. आयुक्त जर काही लपवत असतील तर त्यांचे नावं बाहेर येईल. सगळ्यांची स्टेटमेंट आता घेणारच आहेत. आणि असेम्बली क्वेश्चन अपर हाउसला झालेले आहे. आपण कशाला जास्त बोलायचे आणि ते झाल्यानंतर आम्ही कोर्ट मॅटर करणारच आहोत. तर त्यासाठी वाद कशाला घालावा? '' सही रे सही मी त्यातली नाही. ''

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे, आपण इथे कुठलाही अपशब्द वापरु नये.

**रोहीत सुवर्णा :-**

सभागृह नेते खोट बोलले त्याचे काय? सभागृहामध्ये ते खोट बोलले आहेत की, १३ तारखेला पोलिस स्टेशनला प्रस्ताव पाठविला आहे, शासनाकडे प्रस्ताव पाठविला आहे. सहीचे नमुने पाठविले आहेत पण मा. नगरसचिव बोलले की १३ तारखेला हे सहीचे नमुने पाठविलेले नाही.

**मिलन म्हात्रे :-**

तुंम्हाला अधिकार नाही पाठवायचा. पोलिस कंम्प्लेंट झाली आहे तर पोलिस पाठवणार व पहिल्यांदा रिपोर्ट दाखल करणार आहे.

**रोहीत सुवर्णा :-**

हे सभागृहामध्ये खोटं कशाला बोलत आहात?

**मा. महापौर :-**

सचिवांनी पुढील कामकाजास सुरुवात करावी.

**मिलन म्हात्रे :-**

पान क्र. १७ मध्ये माझे जे स्टेटमेंट आहे. ५ आणि ६ केसेस निकाल सोसायटीच्या बाजूने आहेत तर ऑर्डर आलेल्या आहेत. तर रिट- पिटीशनवर ऑर्डर झालेल्या आहेत असे पाहिजे तर ऑर्डर आलेल्या आहेत असे लिहिले आहे. पान क्र. १८ वर माझ्या संभाषणामध्ये आहे की स्ट्रिक्चर आहे त्याच्यामध्ये आर्किटेक्ट स्ट्रिक्चर पास केलेले असतील तर स्ट्रिक्चर असे पाहिजे.

**रोहीत सुवर्णा :-**

पान क्र. १७ वर ज्याठिकाणी सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे बोलत आहेत त्याठिकाणी पी. एल. आय. लावले आहे. तर ते पी. एल. आय. नसून पी. आय. एल. आहे. तिथे सात - आठ लाईनवर मिरा भाईंदरला फक्त मिरा ॲड करा. पण भाईंदरला ६० टक्के असे झाले तर पण मिरा भाईंदर असे पाहिजे. पान क्र. २६ वर ज्याठिकाणी माझे वक्तव्य आहे त्याच्यामधली सहावी लाईन. उपायुक्त साहेबांनी या गोष्टीकडे लक्ष द्यावे. तर लक्ष हा शब्द गाळला आहे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

पान न. २८ वर शेवटी माझे वक्तव्य आहे. मा. महापौर मॅडम, एक सुचना करु इच्छितो की, ह्यामध्ये प्रती वर्षी ५ टक्के ने जी दर वाढ सुचविलेली आहे ती आता पर्यंत आपण बराच नागरिकांवर तेथे बऱ्याच नागरिकांवरती बोजा टाकलेला आहे. तर मी सभागृहाला अशी रिक्वेस्ट करतो की ही दरवाढ प्रतीवर्षी न घेता ३ वर्षांनी घ्यावी.

**रोहीत सुवर्णा :-**

पान नं. ३२ वर वरुन लाईन नंबर ५ मध्ये माझ्या माझ्या माहितीनुसार अनेक प्रकरण पाहिजे हे सन्मा. सदस्य मिलन म्हात्रेंच स्टेटमेंट आहे. त्याठिकाणी अनेक प्रकरणे प्रलंबित आहेत. पान नं. ३८ मध्ये सन्मा. सदस्या जिवी हिरा वाडे या सन्मा. नगरसेविका जे काही बोलल्या आहेत ते वर आले पाहिजे. त्यांच्या नंतर सन्मा. सदस्य जोत्स्ना हसनाळे किंवा सन्मा. सदस्य मिलन पाटील साहेब बोलले आहेत. तुम्ही वरची लाईन बघा सन्मा. सदस्य मिलन पाटील बोलले आहेत. सन्मा. सदस्या जिवी हिरा वाडे ह्या आज बोलायला उभ्या आहेत. त्यांना बोलू द्या. त्यांचा मा. महासभेत प्रस्ताव आहे. तो पास करावा. त्यांच्यानंतर लगेच सन्मा. सदस्या जिवी हिरा वाडे मॅडम उभ्या राहिल्या आणि त्या बोलल्या एक वाक्य त्यांच्यानंतर सन्मा. सदस्या जोत्स्ना हसनाळे मॅडम बोलल्या.

**जोत्स्ना हसनाळे :-**

सन्मा. सदस्या जिवी हिरा वाडे मॅडम उभ्या राहिल्या पण त्या काही बोलल्या नाही. आपण वक्तव्य केल्यानंतर सन्मा. सदस्या जिवी हिरा वाडे मॅडम यांना बोलायला लावले. मग त्यांनी ते बोलले आहे. येथे जे आले ते बरोबर आहे. तसेच, पान नं. ४२ वर पाहा आपण एक शुद्धीपत्रक दिलेले आहे. ठराव क्र. ४३ इतिवृत्तांतमध्ये जो ठराव आहे. ठराव क्र. इतिवृत्तांत आणि शुद्धीपत्रक आणि मुळ ठराव ह्याच्यामध्ये अनुक्रमांक ३ व ६ यामध्ये बदल दिसत आहे ते बघा. खुप बदल झालेला आहे. आपण ३ नंबरला बघा आर. सी. सी. रेट ८५ पैसे आणि शुद्धीपत्रकात तुम्ही १ रु. ४० पैसे असे दिलेले आहे. पुन्हा खाली अनुक्रमांक ६ मध्ये बघा ८५ पैसे आणि इथे पुन्हा बदल केलेला आहे, ५ पैसे म्हणजे मुळ ठराव त्याच्यामध्ये चुकीचा आढळतोय.

**नगरसचिव :-**

जो आहे तो बरोबर आहे ना.

**जोत्स्ना हसनाळे :-**

नाही. इतिवृत्तांत ही बदल आहे आणि याच्यामध्येही बदल आहे.

**हॅरल बोर्जीस :-**

सचिव साहेब, गोषवाऱ्यामध्ये ३ नंबरला ८५ पैसे आहे तिथे चुकीने १.६० केलेले आहे. तिथे दुरुस्ती करुन घ्यावी. १.२० तिथे ०.६५ करुन घ्यावे आणि ०.३५ च्या जागी ०.३२ करुन घ्यावे आणि ०.३५ च्या जागी .०३२ असे मुळ ठरावात आहे. ती दुरुस्ती करुन घ्यावी.

**जोत्स्ना हसनाळे :-**

पान नंबर ६मध्ये इतिवृत्तांतमध्ये ८५ पैसे आहे. तिथे आपण ५ पैसे केले आहेत. शुद्धीपत्रकात ते बरोबर आहे. सचिव साहेब तुम्ही तिथे दुरुस्ती केली का? मुळ ठरावात चुकी झाली आहे त्या पद्धतीने त्यात नमुद करुन घेण्यात यावे.

**लिओ कोलासो :-**

भाईंदर पश्चिम गावठाणातील जो विषय होता तो ही इथे आला नाही.

**रोहिदास पाटील :-**

जसे मॅडमने सांगितले, हे बोलल नाही. बोलण जे असेल तो एक विषय वेगळा. तो आपण क्षम्य समजू शकतो. हे पॉलिसी मॅटर आहे. जेंव्हा आदिवासी यांच्या हक्काचा प्रश्न येतो त्याच्यामध्ये आपण सवलत देतो त्याच्यातील ठराव, गोषवारा, मुळ ठराव आणि आता हा इतिवृत्तांत ह्याच्यात जर बदल होत असेल तर ही गंभीर बाब होते. आमच्या बोलण्यात तुम्ही काही सांगा. आम्ही फार तक्रारी करीत नाही. बोललो, नाही बोललो ठिक आहे. पण तर हे फिगर बदलत असतील तर तो अधिकारी नागरिकांना ती फिगर दाखवणार त्यातली सत्य फिगर कोणती? एकदा आपण त्यांना संधी दिली तर ते अधिकारी ऐकणार नाही.

**जोत्स्ना हसनाळे :-**

सचिव साहेब, आपण मा. महासभेमध्ये जेंव्हा चर्चा केली त्यावेळेला काजुपाडा, चेन्ने, वरसावे, माशाचा पाडा, काशी, मिरागावठाण, महाजनवाडी, घोडबंदर आणि सर्व आदिवासी कुटूंबे यांना माती, विटा, कौलारु लाकडी पट्ट्याच्या भिंती, झोपडी, कुडाच्या भिंती यासाठी आपण ५ पैसे केले होते. तुम्ही इतिवृत्तांतमध्ये ८५ पैसे आणि ६५ पैसे दाखवले आहेत आणि पुन्हा इतिवृत्तांतामध्ये तुम्ही ३ नंबरला ते चुकीच केलेले आहे. त्यामध्ये दुरुस्ती करा.

**रोहिदास पाटील :-**

५ पैसे नक्की करा. ५ पैसे केले असे जाहिर करा. तुम्ही परत विचाराल काय करु. हे आम्ही परत सांगणार नाही. नाहीतर तुम्ही पुन्हा ८५ पैसे कराल.

**जोत्स्ना हसनाळे :-**

५ पैसे ते केलेलं आहे. ते शुद्धीपत्रकात बरोबर आहे. फक्त पान नंबर ३ वर चुक झालेली आहे.

**रोहित सुवर्णा :-**

पान नंबर ४० मध्ये ज्याठिकाणी सन्मा. सदस्य मोहन पाटील साहेब यांचे वक्तव्य आहे. चौथे वक्तव्य आहे त्याठिकाणी परंतु त्यांच्या आर. सी. सी. हे जे आर. सी. सी. आहे ते चुकीच आहे त्यांचे असेसमेन्ट रेकॉर्ड मध्ये पाहिजे. आर. सी. सी. नाही. आदिवासी आर. सी. सी. बंगल्यामध्ये राहत नाही.

**मिलन म्हात्रे :-**

पान नंबर ४६ मध्ये खालच्या साईडला माझ्या वक्तव्यामध्ये रेल्वेचे टेमिनल लिहिले आहे. टेमिनलच्या जागेवर ट्रब्युलर असे पाहिजे. रेल्वे कोर्ट ट्रॅब्युलर असते.

**रोहित सुवर्णा :-**

पान नंबर ४७ मध्ये ज्याठिकाणी बहुतेक श्री. संजय शेट्टी ठाणे महानगरपालिका तेथुन तिसऱ्या लाईनमध्ये मा. आयुक्त साहेबांना प्रत्येक डॉक्टरांना लेखी पत्र. पत्र हा शब्द राहिलेला आहे.

**हॅरल बोर्जीस :-**

प्रकरण क्र. ८४ चा सभागृहासमोर ठराव मांडला.

**सुर्यकांत भोईर :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्यांनी दिलेल्या सुचनांसह इतिवृत्तांत मंजुर. पुढील विषयास सुरुवात करावी.

**प्रकरण क्र. ८४ :-**

दि. २०/०६/२००६ (दि. १२/१०/२००६ रोजीच्या सभेतील तहकुब प्रकरण), दि. ०८/०८/२००६ व दि. २१/०८/२००६ (दि. ०८/०८/२००६ रोजीची तहकुब सभा) रोजीच्या मा. महासभांचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. ६३ :-**

दि. २०/०६/२००६ (दि. १२/१०/२००६ रोजीच्या सभेतील तहकुब प्रकरण), दि. ०८/०८/२००६ व दि. २१/०८/२००६ (दि. ०८/०८/२००६ रोजीची तहकुब सभा) रोजीच्या मा. महासभांच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. हॅरल बोर्जीस.** **अनुमोदन :- श्री. महेंद्रसिंग चौहान.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. ८५ चे वाचन केले.)

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, आपल्या परवानगीने बोलत आहे. हे जे प्रकरण क्र. ४६ मध्ये शिक्षण मंडळाचा ठराव दिनांक १२/९/२००६ वास्तविक पाहता मागच्या वेळेला परिवहनच्या सभापतींना याच्यावर बरेच सभागृहाला मार्गदर्शन केले होते. शिक्षण मंडळातर्फे मा. सभापतीसाहेबांच्या सहीने जो ठराव आलेला आहे. त्याच्यावर आपल्या प्रशासनाचा गोषवारा नाही. मा. आयुक्तांचे रिॲप्रोप्रिएशनच्या बद्दल सँक्शन आहे की, नाही. ॲडव्हान्समध्ये घेतले आहे की नाही त्याचा इथे कुठेही उल्लेख नाही. वास्तविक पाहता या ठरावामध्ये पहिल्यांदा मा. आयुक्तांनी रिॲप्रोप्रिएशन केल्याचे कॅफो आणि आयुक्तांनी ह्या ठरावामध्ये नमुद करायला पाहीजे होत. आणि मग त्याच रिॲप्रोप्रिएशन झाल्यानंतर तुम्ही खर्चाची वर्गवारी ठरावामध्ये घ्यायला हवी होती. माझी आपल्याला अशी सुचना आहे की, ज्या खर्चाचे रिॲप्रोप्रिएशन झालेले नसेल त्याला आतापर्यंत प्रशासनाची मान्यता मिळालेली नाही. खर्चाला माझा विरोध नाही. ७० नाही ८० लाख रुपये जरी केले तरी आमची ना नाही. परंतू, आपल्याकडे राहिलेली तरतुद आहे. ती तरतुद वळवताना ज्या ऑडीटनुसार तरतुदी पुर्ण करायच्या आहेत त्या सर्वप्रथम कराव्यात आणि नंतरच या ठरावास मंजुरी द्यावी अशी माझी आपल्याला नम्र विनंती आहे.

**रोहिदास पाटील :-**

मा. महापौर मॅडम, एक साधारण आपले, आम्ही सगळ्यांना मान देतो. मा. आयुक्तांना देतो. मा. उपआयुक्तांना देतो. ज्या - ज्या समितीवर जे - जे आपण उपआयुक्त पाठवतात त्यांच्याकडून आम्ही अपेक्षा करतो. खरोखरच जे शिक्षण समितीवर मा. उपआयुक्त काम करतात त्यांची एक नैतिक जबाबदारी आहे की, नाही. हा ठराव आपण पाठवते वेळी त्याची बांधिलकी काय आहे? शिक्षण समितीच्या सदस्यांना त्या ठरावाचे महत्व पटवून द्यायचे की, नाही. १ कोटी रुपयाची तरतुद शैक्षणिक अनुदान देण्याच्या दृष्टीने आपण अंदाज पत्रकात तरतुद केलेली होती. आता शिक्षण मंडळ स्थापन झाले. शिक्षण मंडळात ज्याच्यापैकी शासनाचा असा आदेश आहे की तुम्ही शैक्षणिक अनुदान हे ३० लाख रुपयांच्यापेक्षा जास्त देउु शकत नाही. असे तुम्ही लिहिलेले आहे. म्हणजे ७० लाख रुपये उरले. तर आता ७० लाख रुपये उरल्यानंतर ते शिक्षण मंडळाच्या अधिकाऱ्यांची, पदाधिकाऱ्यांची अशी भावना झालेली दिसते की, ७० लाख रुपये आमचेच आहेत. याला दुसरे सभागृहाला विचारण्याचे काही कारण नाही. त्यांनी ठराव केला. त्या ठरावातील कोणत्या फिगर कुठे जुळतात त्यांनाच माहिती. एकतर असे असले पाहिजे की, ते कुठेतरी जुळल पाहिजे ना. कशासाठी, आपण काय मागतो. कुठल्या पिरियड मध्ये मागतो. हा नोव्हेंबर महिना संपत चालला आहे. याच्या इतिवृत्तांताला मंजुरी द्यायला अजुन २ महिने जातील. आपण आपले बजेट २५ - २६ जानेवारीला, किंवा फेब्रुवारीला परत देणार. यामधल्या कोणत्या रक्कमा या बजेटमधून वजा करत आहात. हे बजेट देते वेळी त्यांना जे अत्यंत आवश्यक आहे. एखादे पुस्तक असेल एखादा खेळ असेल, स्पर्धा असेल ते असेल. ते ठिक आहे पण एकदम चुकीचा पायंडा पाडून एवढ्या मोठ्या सभागृहासमोर हा विषय येत आहे. येते वेळी, आता हे तुमच्याकडे आले. मा. आयुक्त म्हणून आपणसुद्धा ह्यामध्ये कोणतीच दखल घेतली नाही. ठराव सभागृहासमोर विचारात ठेवायचा की, नाही ठेवायचा आणि जरी ठेवायचा असे तुम्हाला वाटले की ते योग्य आहे तर त्यावर आपली टिपणी पाहिजे होती की, ७० लाख रुपये त्यांना देणे योग्य आहे की नाही. प्रशासनाची यात काही भुमिकाच नाही. भुमिका तर नाहीच पण आकडेमोडही नाही. हे अत्यंत हास्यास्पद आकडेमोड आहे की, यांची संख्या किती? विद्यार्थ्यांची संख्या किती? त्यांचे गैरहजेरीचे प्रमाण किती? आणि ते मागतात काय? कोणत्या हेड खाली किती मागतात? त्यांनी श्री. दातीर याला किंवा कोणालातरी काम दिले असेल. ते कोणीतरी काम केले. ७० लाख रुपये आंम्हाला पुरे करुन द्या. हे तसे झाले. काय करायचे ठराव मंजुरीला घ्यायचा की, काय करायचे? याबाबतीत तरतुद काय आहे. यात प्रशासनाची काय भुमिका आहे ते आंम्हाला सांगा, मग आम्ही मतदानाला टाकायचे का काय करायचे ही भुमिका आणतो पण एक सांगतो आहे की, नक्की सभागृहाची ही सर्व सन्मा. सदस्यांची भावना राहिल की, शिक्षण मंडळाकडे या महानगरपालिकेमधील मुलांच्या हिताच्या दृष्टीने जर आवश्यक रक्कम असेल तर त्याला काही विरोध करायचे कारण नसावे असे आंम्हालाही वाटते, हे इतरांनाही वाटत असेल. पण अगदी डोळे मिटून आपण कशाला तरी मंजुरी देतो असे सभागृहाचे कामकाज चालायला नको. काय चालले आहे. मा. आयुक्तसाहेब आमची प्रामाणिक इच्छा आहे की, कोणीतरी आपण याच्यात लक्ष घाला. त्यांनी दिले तुम्ही आणले. मा. महापौर मॅडमच्या समोर जाते असे आपले कामकाज होता कामा नये. कोणतही नाही. हे खर्चच करु शकत नाही. आज शहरामध्ये त्या ७० लाख रुपयाची बांधकामाला गरज असेल,

आरोग्याला गरज असेल, पाणी पुरवठ्याला गरज असेल तिथे ते वर्ग करणे गरजेचे आहे. भावनात्मक आपण सांगितले की, कोणी तरी विरोध करतो आहे तर अशातला हा विरोध नाही. ही एकदम ताबडतोब वापरली म्हणजे हे ३ महिनेच तुमच्या हाता मध्ये राहिले आहेत. ३ महिनेही कुठे? डिसेंबर, जानेवारी, फेब्रुवारी ही नाही. मग तुम्ही ती रक्कम कुठे वर्गवारी करणार आहात. त्याच्यासाठी शिक्षण मंडळासाठी जी तरतुद करायची आहे. ती पुढच्या बजेटमध्ये योग्य रक्कम १ कोटी रुपयापेक्षाही जास्त आवश्यक असेल व तशी प्रोव्हीजन असेल तर तसे करा. पण आपण याच्यात कुठे करणार?

**हॅरल बोर्जीस :-**

सन्मा. महापौर मॅडम, शिक्षण मंडळाकडून सन २००६/२००७ अंशदान शाळा, कॉलेज व इतर संस्थांना शैक्षणिक अनुदान देण्याबाबत. याविषयाच्या अनुषंगाने शिक्षण मंडळाकडून मा. महासभेला जो प्रस्ताव आलेला आहे. वास्तविक प्रशासनाकडून या विषयावर कसल्याही प्रकारचा गोषवारा नाही किंवा अंतर्गत लेखाविभागाचा त्याच्यावरती कसल्याही प्रकारचा अहवाल नसल्यामुळे सदर विषय स्थगित ठेवून परिपुर्ण माहितीसह पुढिल मा. महासभेसमोर हा विषय घ्यावा अशी मी आपणांस विनंती करत आहे.

**जोत्स्ना हसनाळे :-**

मा. महापौरसाहेबांच्या परवानगीने बोलते आहे, हा विषय पुढील महासभेत आणणार आहेत तर त्याबद्दल चांगल्या पद्धतीची चौकशी करुन आणि हा जो शिक्षण् मंडळाने ठराव पाठवला आहे. त्यामध्ये जी आकडेवारी दिलेली आहे त्यामध्ये बदल करून आणण्यात यावा. तसेच, आपली मिरा - भाईंदर शाळेमध्ये शिक्षकांच्या बाबतीमध्ये याठिकाणी मला बोलायचे आहे. वरसावे शाळा क्र. २८ येथे आम्ही सभागृहातील चार सन्मा. नगरसेविका यांनी मिळून भेट दिली. त्याठिकाणी दोन शिक्षिका आहेत. एक सौ. मिना तिवारी आणि दुसऱ्या सौ. त्रिभुवन म्हणून आहेत. त्या दोन्ही शिक्षिका ११.०० वाजता तेथे उपस्थित नव्हत्या. मुलं फक्त वर्गात बसलेली होती. आणि ते एक जंगल भाग आहे त्याठिकाणी ती शाळा आहे. अशा भयानक ठिकाणी शिक्षिका उपस्थित नसतात. शिक्षण मंडळाचे त्याकडे लक्ष नाही. तसेच प्रशासनाचेही तिथे लक्ष नाही. ह्यावर मला याचा लेखी खुलासा आणि या सभागृहात मला शिक्षण अधिकाऱ्यांनी खुलासा द्यावा की, तुम्ही याठिकाणी व्हिजिट करायला पाहिजे जे प्रशासनाने काम करायला पाहिजे ते काम आपल्याकडून होत नाही. मला याठिकाणी शिक्षण अधिकाऱ्यांचा खुलासा पाहिजे. शाळा क्रमांक २८ वरसावे शिक्षण अधिकारी यांनी कृपया खुलासा करावा.

**ए. एस. सुर्यवंशी (शिक्षण अधिकारी) :-**

शाळा क्रमांक २८ वरसावे या शाळेमध्ये दोन शिक्षिका कार्यरत आहेत. पटसंख्येप्रमाणे शिक्षक बरोबर आहेत. आपल्या व्हिजिटच्या वेळेला कदाचित त्या शिक्षिका त्यादिवशी लेट आल्या असतील तर त्याबाबतीत मी चौकशी करतो पण ज्या - ज्या वेळेला मी भेट दिली आहे. आमची देते वेळी त्या शिक्षिका तिथे उपस्थित आहेत असे आढळून आलेल्या आहेत.

**जोत्स्ना हसनाळे :-**

साहेब, तुम्ही ज्यावेळी शाळेमध्ये आपण गेलात तेव्हा आपल्याला शिक्षिका तिथे उपस्थित असल्याचे आढळले. असे तुमचे म्हणणे आहे ना. पण मी त्यांचे हजेरी रजिस्टर चेक केलेले आहे. त्यावेळी त्यांचा ११.५० चा टाईम हजेरी रजिस्टर वर प्रत्येक वेळीचा नमुद केलेला आहे. आणि ११.००ची वेळ आहे. त्याठिकाणी एकही शिक्षिका उपस्थित नसेल आणि त्या दोन्ही शिक्षिका आपापसात भांडण करत असतात असे विद्यार्थ्यांचे, गावकऱ्यांचे सगळ्यांचे म्हणणे आहे.

**ए. एस. सुर्यवंशी (शिक्षण अधिकारी) :-**

आम्ही, या सोमवारीच या शाळेला भेट दिलेली आहे.

**शिवप्रकाश भुदेका :-**

आपण त्या शाळेला भेट द्यायला जाण्याच्या वेळी फोन करुन भेट द्यायला गेला असाल.

**ए. एस. सुर्यवंशी (शिक्षण अधिकारी) :-**

जी शिक्षिका उशीरा आली त्या शिक्षिकेचा तो दिवस बिनपगारी केलेला आहे.

**जोत्स्ना हसनाळे :-**

साहेब, हे बघा आपण चुकीची माहिती देउन सभागृहाचे लक्ष दुसरीकडे वेधू नका.

**ए. एस. सुर्यवंशी (शिक्षण अधिकारी) :-**

एकाच शाळेला दररोज व्हिजिट करणे शक्य नाही. सोमवारी ज्यादिवशी मी त्या शाळेत गेलो त्या दिवशी सौ. त्रिभुवन शिक्षिका नव्हत्या त्यांचा तो दिवस बिनपगारी केलेला आहे आणि शिवाय आपल्या भेटीचाही त्यांच्याकडून अहवाल मागवून त्यांच्यावर कार्यवाही करण्यात येईल.

**जोत्स्ना हसनाळे :-**

साहेब, कार्यवाहीचे नाही. पण आपण त्या दोन्ही शिक्षिकांना समज द्या. त्या दोघी आपापसात भांडण करतात त्याचा विद्यार्थ्यांवर परिणाम होत आहे. आज हे ७० लाख रुपये मंजुरीला येत आहेत. त्या मुलांचे भले करण्यासाठी आपण इथे सभागृहामध्ये पैसे मंजुर करण्यास घेत आहोत आणि शिक्षकांचा विद्यार्थ्यांवर काय परिणाम होत आहे. ते तुम्ही कधी चेक केले आहे का? आज मा. महापौर मॅडमही शिक्षिका आहेत. मी सुद्धा

शिक्षिका आहे. इथे मा. सभागृहात बऱ्याचशा नगरसेविका शिक्षिका आहेत. पण त्याचा उपयोग काय? याला जबाबदार कोण आहे? प्रशासन जबाबदार नाही का?

**शुभांगी नाईक :-**

त्या शाळेला मुख्याध्यापक आहे की नाही?

**ए. एस. सुर्यवंशी (शिक्षण अधिकारी) :-**

त्या शाळेला पात्र मुख्याध्यापक पद नसल्यामुळे सिनियर शिक्षक हाच प्रभारी मुख्याध्यापक असतो.

**शुभांगी नाईक :-**

मग शाळा कशी चालते मुख्याध्यापकाशिवाय? अशी शाळा चालू शकते का?

**ए. एस. सुर्यवंशी (शिक्षण अधिकारी) :-**

निकष असा आहे की २०० पेक्षा जास्त पटसंख्या असेल तर पात्र मुख्याध्यापक देता येतो. २००च्या आत पट संख्या असेल तर तिथला सिनियर शिक्षक हा इनचार्ज मुख्याध्यापक म्हणून कामकाज सांभाळत असतो.

**जोत्स्ना हसनाळे :-**

तसेच माशाचा पाडा येथील शाळेमध्ये दिनांक १४ नोव्हेंबरला बालदिना निमित्त शिक्षकाना किंवा मुख्याध्यापकांना आपण कार्यक्रम आयोजित करायला सांगितले होते का?

**ए. एस. सुर्यवंशी (शिक्षण अधिकारी) :-**

वर्षभरातले जे राष्ट्रीय कार्यक्रम असतात त्यावेळी त्या - त्या शाळांना त्या - त्या वेळी साजरा करण्याबाबतच्या कायमच्या सुचना दिलेल्या असतात तशा पद्धतीने २ ऑक्टोबर झाले. १४ नोव्हेंबर झालं. हे जे शाळा स्तरावर कार्यक्रम असतात ते साजरा करण्याबाबत त्यांना सुचना पुर्वी पासुनच दिलेल्या असतात.

**जोत्स्ना हसनाळे :-**

साहेब, शाळेमध्ये कार्यक्रम साजरे व्हावेत हे मी मान्य करते. पण शाळेमध्ये कार्यक्रम घ्यायला पाहिजे ना.

**ए. एस. सुर्यवंशी (शिक्षण अधिकारी) :-**

होय.

**जोत्स्ना हसनाळे :-**

शाळेच्या नियमानुसार कार्यक्रम घ्यायला पाहिजेत ना. आपल्या शिक्षकांनी ते कार्यक्रम कशापद्धतीने साजरे केलेत याची माहिती आपण काढली का? मी सदर दिवशी मा. आयुक्त साहेबांना कंम्प्लेंट केली होती की, हे कार्यक्रम अतिशय चुकीच्या पद्धतीने चाललेले आहेत. त्यानंतर त्याठिकाणी संध्याकाळी ६.०० वाजता तिथे गेलात. ते कार्यक्रम तेथे कशापद्धतीने केलेले आहेत त्याचा सविस्तर खुलासा आपण मला द्यावा.

**ए. एस. सुर्यवंशी (शिक्षण अधिकारी) :-**

मा. आयुक्त साहेब, सायंकाळी ५.३० वाजता मला फोन आला त्यानंतर मी तिथे गेलो त्यावेळी तिथे शकर नारायण सिनियर कॉलेजच्या विद्यार्थ्यांचा १ दिवसाचा कॅम्प होता आणि चाचा नेहरु बालदिनाचे औचित्य साधून आपल्या म. न. पा. शाळा क्र. १९ च्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक व सांस्कृतीक कार्यक्रम, क्रिडा स्पर्धांचे आयोजन करुन आपल्या त्या शाळेतील विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करण्याचे कार्यक्रम हे कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी बालदिनाचे औचित्य साधून घेतले होते.

**जोत्स्ना हसनाळे :-**

साहेब, आपण चुकीची माहिती देउ नका. कॉलेजच्या मुलांचे वय किती? आणि आपल्या शाळेतील मुलांचे वय कीती? कुठला ताळमेळ लावून आपण तो कार्यक्रम आयोजीत करत आहात? तुम्ही शिक्षकांना एवढा मनमानी कारभार करण्यासाठी आपण परमिशन दिली आहे का? त्याबाबतीत आपला अंकुश नाही.

**ए. एस. सुर्यवंशी (शिक्षण अधिकारी) :-**

त्याबाबतीत संबंधीत.....

**जोत्स्ना हसनाळे :-**

पहिली गोष्ट त्या शाळेतील शिक्षकांवर आपला अंकुश नाही. शिक्षक परस्पर आपली खिचडी रद्द करुन बाहेरचे जेवण खातात. हे सर्व बरोबर आहे का?

**ए. एस. सुर्यवंशी (शिक्षण अधिकारी) :-**

त्याबाबतीत त्या शाळेला पत्र पाठवून खुलासा मागविलेला आहे. खुलासा आल्यानंतर मी आपल्याला सांगतो.

**जोत्स्ना हसनाळे :-**

खुलासा नुसता मागवू नका. सदर शिक्षिकावर आपण योग्य ती कार्यवाही करा. आणि आमच्या प्रभागामध्ये आदिवासी लोकांची जर भुल करुन शिक्षक काहीतरी राजकारण करीत असतील तर साहेब मी ते खपवून घेणार नाही. आणि तुम्ही त्या शिक्षकांची बदली तिथून त्वरीत करा अशी माझी या मा. महासभेत मागणी आहे. राजकीय पक्षाचे झेंडे लावून त्या झेंड्याखाली आपले शिक्षक तिथे कार्यक्रम करतात आणि

त्याठिकाणी सुत्रसंचालन तिथे आपले शिक्षक करतात. लाईट नाही, पाणी नाही, गटार नाही हे शिक्षकांचे काम आहे का? आणि असं असेल तर त्यांना सांगा मतदानाला उभ्या रहा आणि निवडून या.

**ए. एस. सुर्यवंशी (शिक्षण अधिकारी) :-**

सन्मा. सदस्या, याबाबतीतील पुर्ण डिटेल अहवाल आल्याशिवाय.....

**जोत्स्ना हसनाळे :-**

पुर्ण डिटेल अहवाल नाही. हा जो कार्यक्रम झाला त्यादिवशी मा. आयुक्त साहेबांना मी ही गोष्ट सांगितली होती. असा प्रकार जो होतो तो योग्य आहे का? तुम्ही मुलांवर काय बिंबवणार आहात?

**लिओ कोलासो :-**

मॅडम, जर अशा प्रकारचा एखादा शिक्षक राजकिय पक्षाचे राजकीय झेंडे लावुन एखाद्या कार्यक्रमात सक्रीय सहभाग घेत असेल तर त्या शिक्षकास सस्पेंड करायला पाहिजे.

**रोहिदास पाटील :-**

मा. महापौरसाहेबांच्या परवानगीने बोलत आहे की, पहिल्यांदा हे आता मास्तर नाहीत. यांनी किती झेंडे लावले ते या सन्मा. नगरसेवकांनी फोटो सहीत देउ शकतो. माझ्याकडे फोटो आहेत ना. सन्मा. मोरुभाउंच्या जोडीला तुमचे किती फोटो आहेत. तो विषय नाही या सभागृहात मा. आयुक्तांना मी पहिला धन्यवाद देत आहे की, मा. आयुक्त अत्यंत संवेदनाशील आहेत. यासाठी मी धन्यवाद देतो की, सन्मा. नगरसेविकेने त्यांच्याकडे विनंती केली. ते संपुर्ण दिवस बैचेन राहीले. त्यांनी शिक्षण अधिकाऱ्यांना कुठून तरी शोधले. शोधल्यानंतर ते शिक्षण अधिकाऱ्यांपर्यंत पोहचले. साधारणतः हे स्वाभविकच आहे. मा. महापौर यांनी सांगितले की, सन्मा. नगरसेविका यांनी स्वतः सांगितल की, त्या शिक्षिका आहेत. दुसऱ्या शिक्षिका आहेत. तिसऱ्या , चौथ्या मा. महापौर आहेत. त्यामुळे स्वाभाविकच आहे की, सभागृहामध्ये शिक्षक आहेत म्हणून शान आहे. इथे माजी शिक्षकही आहेत पण, एक खरं आहे १४ तारीख चाचा नेहरुंचा बालदिन म्हणून साजरा करावा कारण हा राष्ट्रीय कार्यक्रम असतो. त्यामुळे उगाचच कोणाला तोल सोडून बोलू नये.....

**जोत्स्ना हसनाळे :-**

सन्मा. सदस्य रोहिदास पाटील, हा राष्ट्रीय कार्यक्रम आहे. म. न. पा. ले तसे आदेश द्यावेत शाळेतील शिक्षकांना की, राष्ट्रीय कार्यक्रम बालदिन वर्गामध्ये साजरे करा. पण असे नाही की, त्याच्या नावाखाली दुसऱ्यांनी तिथे येउन राजकारण करायचे. आपल्या कॉलेजचा कार्यक्रम आहे. आपण त्या विभागात कार्यक्रम घेतला. त्याच्यामध्ये माझा कोणताही वाद नाही. मी आपल्यावर आरोप करत नाही. हे आपण लक्षात ठेवा. मी तुमच्यावर जरा सुद्धा आरोप करीत नाही. तुम्ही या विषयावर नाहीच बोलाल तर योग्य आहे. मी तुमच्यावर आरोप करत नाही.

**रोहिदास पाटील :-**

आता महाविद्यालयाच्यावतीने तो कार्यक्रम होता आणि मुल काही मतदार आहेत का?

**धनराज अग्रवाल :-**

मुलांना वोटींगचा अधिकार नाही.

**जोत्स्ना हसनाळे :-**

तुमच्यावर मी आरोप करीत नाही. तुम्ही उगीचच मनाला लावून घेउ नका.

**रोहिदास पाटील :-**

त्याचा लेखा जोखा होउु द्या. सभागृहामध्ये हा जो विषय आहे तो रेकॉर्ड वर येउ द्या. त्या बालदिनानिमित्ताने महाविद्यालयाने त्यांना पत्र देउन असे जातात. एक नाही अनेक आणि आमच्या एस. एन. कॉलेजचा गेल्या ८ वर्षाचा हा उपक्रम आहे. वाडा, जव्हार, मोखाडा, वाळवंडा अनेक शाळांवर ज्या आदिवासी शाळा आहेत. निवड अशी केली जाते की, त्या आदिवासी शाळा आहेत. अन्य कोणत्या शाळेत नाही.

**जोत्स्ना हसनाळे :-**

महानगरपालिकेकडे आपण असे कोणते पत्र दिलेले आहे का? शंकर नारायण कॉलेजचे तसे आपल्याकडे पत्र आहे का बघा.

**रोहिदास पाटील :-**

त्याठिकाणी जाउन त्या मुलांना वह्या पुस्तके, लहान खेळणी त्यांच मनोरंजन. त्यांच्यामध्ये बसुन त्यांना.....

**ए. एस. सुर्यवंशी (शिक्षण अधिकारी) :-**

पत्र दिलेले नाही.

**जोत्स्ना हसनाळे :-**

आपल्याकडे असे पत्र दिल आहे का? शिक्षण अधिकाऱ्यांनी असा खुलासा द्यावा. महानगरपालिकेकडे शंकर नारायण कॉलेजने असे पत्र दिले आहे का? नाही ना. मग कोणाच्या परवानगीने परस्पर गेले याचा खुलासा द्या. इथे विषय ट्वीस्ट करु नका. कोणाच्या परवानगीने गेला होतात याचा पहिल्यांदा खुलासा करा.

**रोहिदास पाटील :-**

त्यामुळे तिथे काही वेगळे घडलेले नाही. त्यामुळे उगाचच काही तरी आपण मा. सभागृहात बोलू नका.

**ए. एस. सुर्यवंशी (शिक्षण अधिकारी) :-**

मनपाला त्यांनी तसे पत्र दिलेले नाही मुख्यध्यापकाच्या नावाने पत्र आहे.

**जोत्स्ना हसनाळे :-**

कोणाच्या परवानगीने दिलेल आहे याचा खुलासा करा. शंकर नारायण कॉलेजने पत्र पाठवून आपल्याकडे परवानगी मागितली नव्हती ना. मग शाळेचे मुख्याध्यापक आणि शिक्षकांच्या संगनमताने हे कार्यक्रम झालेले आहेत.

**रोहिदास पाटील :-**

हे कार्यक्रम आता वरसावा शाळा आहे, चेन्याची शाळा आहे, काजुपाड्याची शाळा आहे. जितक्या आदिवासी शाळा आहेत तेथे हे कार्यक्रम झालेत. हे राष्ट्रीय कार्यक्रम आहेत.

**जोत्स्ना हसनाळे :-**

मा. आयुक्त साहेब हे असे कार्यक्रम होतातच कसे? मा. आयुक्त साहेब हे पुर्णपणे चुकीच आहे. आणि याचा चांगला परिणाम होणार नाही. कशाला ७० लाख रुपये देउन शाळांचा दर्जा वाढवता? तर असे राजकारण करता. प्रत्येक सन्मा. नगरसेवक शाळेतील मुलांना घेउन राजकीय कार्यक्रम करु शकतो आणि त्या कार्यक्रमामध्ये शिक्षक सुत्रसंचलन करतो. ते कसे काय?

**रोहिदास पाटील :-**

हे राष्ट्रीय कार्यक्रम असून ते एखाद्या नगरसेविकेच्या मनावर चालणारे नाही आणि ते ह्या सभागृहाचे दुर्दैव आहे की, तुम्ही एक शिक्षिका असुनसुद्धा असे बोलता. तुम्ही या गोष्टीच स्वागत करण्याच गरजेच आहे आणि मी पुन्हा सांगतो मा. आयुक्तांना की त्याची लाईव्ह व्हिडीओ कॅसेट असते. हा कार्यक्रम असा लपून होत नाही. आणि हे स्वाभाविक आहे. शाळेचे मुख्याध्यापक किंवा शिक्षक आलेल्या कॅम्पचे स्वागत करणं, त्यांच्यात उभे राहणे हे काही चुकीचे नाही.

**जोत्स्ना हसनाळे :-**

तसे नाही. आपण नियम दुसऱ्यांना शिकवू नका. आपण किती नियमबाह्य वागतात ते सांगा ना. आपण किती नियमबाह्य वागले ते आपण दाखवा ना. चुकीची माहिती का देता? मी काय सांगते तिथल्या लोकांना एक दिवस काय जेवण देता. रोज जेवण द्या. रोज जेवण देण्याची तुमची तयारी आहे का?

**रोहिदास पाटील :-**

किती दिवस पाहिजे. तुमच्या सहीत देतो.

**जोत्स्ना हसनाळे :-**

रोज द्या जेवायला. एक दिवस खिचडी का देता? रोज जेवण द्या.

**रोहिदास पाटील :-**

किती दिवस पाहिजे. तुमच्या सहीत देतो.

**जोत्स्ना हसनाळे :-**

खिचडी एक दिवस का देता? दररोज द्या ना.

**रोहिदास पाटील :-**

तुमच्या सहीत देतो. किती पाहिजे बोला ना. तुमचे जे कुटूंब असेल ते ही आणा काय फालतू बोलून फायदा आहे.

**जोत्स्ना हसनाळे :-**

माझ्या कुटूंबाची तुम्ही काळजी करु नका. माझ्या कुटूंबाची तुम्ही काळजी घेणारे आहेत भरपूर. तुमची गरज नाही.

**रोहिदास पाटील :-**

सिनियर कॉलेज आहे. सिनियर कॉलेजचा कार्यक्रम असतो.

**जोत्स्ना हसनाळे :-**

सिनियर कॉलेजने महानगरपालिकेकडे परमिशन मागितली होती का?

**रोहिदास पाटील :-**

माझ्या माहितीप्रमाणे काहीच आवश्यकता नसते.

**जोत्स्ना हसनाळे :-**

कोणीपण येउन कोणीही कार्यक्रम करावा असे असते का? कृपया, मा. आयुक्तांनी खुलासा करावा.

**रोहिदास पाटील :-**

त्याची काही आवश्यकता नसते ऐऱ्या - गैऱ्याचे ते कॉलेज नाही.

**जोत्स्ना हसनाळे :-**

मला याबद्दल मा. आयुक्तांनी खुलासा द्यावा. कोणीपण येउन कुठल्याही शाळेमध्ये मनपाच्या शाळेमध्ये कार्यक्रम आयोजित करु शकतो का?

**रोहिदास पाटील :-**

हे राष्ट्रीय कार्यक्रम आहे व हे सरकारी असते. आपण दान करुन बघायच असते. घ्यायला कोणीही घेते.

**जोत्स्ना हसनाळे :-**

तुम्ही रोज दान करा. आम्ही कुठे मनाई करतो. रोज दान करा.

**रोहिदास पाटील :-**

तुम्ही चला, तुम्ही कोणत्या दिवशी येता ते सांगा. मी वरसावे शाळेची तारीख देतो, चेण्याची देतो, आणि काजुपाड्याची देतो. कॉलेजचे पत्र देतो. जेवायला या.

**जोत्स्ना हसनाळे :-**

आम्ही कशाला जेवायला येउ. तुम्हीच जेवण खा आणि लोकांना जेवण घाला. कॉलेजची सगळी मुल तिथे घेउन जा आणि सर्वांना जेवण घाला. त्याबद्दल वाद नाही. पण त्यात कुठल्याही प्रकारचा राजकीय हेतू नसावा. मा. आयुक्त साहेब मला कृपया आपण खुलासा द्यावा की, अशा पद्धतीने करता येते का? शिक्षण मंडळावर मेंबर आहात, मला ह्याच्यावर खुलासा पाहिजे की, अशा पद्धतीने करणे चुकीचे आहे की, बरोबर आहे. बरोबर असेल तर मी खाली बसते पण, चुकीचे असेल तर मला तसे कळवा.

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्यांनी शिक्षिकांच्या बाबतीत जो प्रश्न उपस्थित केलेला आहे आणि यासंदर्भामध्ये सन्मा. सदस्य रोहिदास पाटील यांनी त्यांच्या कॉलेजच्या माध्यमातून जो काही कार्यक्रम त्याठिकाणी आयोजित केला होता. खरे म्हणजे १४ नोव्हेंबर हा जो बालदिन आहे. हा बालदिन सर्व भारतामध्ये साजरा केला जातो. परंतु, अशाप्रकारे वैयक्तिक स्वरुपामध्ये जर कोणाला असा कार्यक्रम आयोजित करायचा असेल महानगरपालिकेच्या माध्यमातून किंवा महानगरपालिकेच्या शाळेतून तर अशा प्रकारचे एक इनटिमेशन वजा पत्र देणे आवश्यक आहे असे मला वाटते आणि अशा प्रकारे हे संबंधित शिक्षण अधिकाऱ्यांकडे दिलेले आहे की, मुख्याध्यापक किंवा शाळेला दिलेले असेल तर शाळेने सुद्धा शाळेच्या मुख्याध्यापकांनी किंवा त्या ठिकाणी जे शिक्षक कार्यरत आहेत. तर त्यांनी तशी परवानगी शिक्षण अधिकाऱ्यांची घ्यायला पाहिजे होती किंवा ते मा. आयुक्तांपर्यंत पोहचवायला पाहिजे होते. परंतु, एकंदरीत चर्चेवरून असे दिसून येते की, तसा काही प्रकार झालेला नाही. परंतु, त्या ठिकाणी कार्यक्रम आयोजित झालेला आहे. तर याच्यापुढे अशा प्रकारच्या सुचना ह्या संबंधित शाळांना देण्यात येतील की, अशा प्रकारे जर कोणी सामाजिक सेवाभावी संस्था ज्या असतील त्यांनी जरी एखादा कार्यक्रम करण्याचे मनोधैर्य जर व्यक्त केले तर त्या संदर्भामध्ये मुख्यालयाची किंवा शिक्षण मंडळातील शिक्षण अधिकाऱ्याची परवानगी घेउनच अशा प्रकारचे कार्यक्रम करावेत. अशा प्रकारची सुचना सर्व शाळांना देण्यात येईल.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

आणि ज्या शिक्षकांनी या बाबत अशी चुकी केलेली आहे की, त्यांनी तिथे राजकीय भाषा वापरून आणि सुत्रसंचालन केले आहे त्या शिक्षिकेवर आपण काय कार्यवाही करणार आहात? साहेब, नाहीतर त्यांचे मनोबल वाढेल अशा पद्धतीने कोणी, उद्या मी त्याचा वापर करेल किंवा इतर संस्था त्यांचा वापर करतील, इतर पक्ष वापर करतील, शिक्षकांनी हे राजकारण करु नये. असे माझे प्रामाणिक मत आहे आम्ही ही पाच वर्ष शिक्षक म्हणून पेशा केला. आता नगरसेविका झालोत. पण आम्ही अशा पद्धतीचे पक्षपात केला नाही.

**हॅरल बोर्जीस :-**

मा. महापौर मॅडम, सभागृहाच्या वतीने जेष्ठ सदस्य लिओ कोलासो साहेब यांनी मागणी केलेली आहे. मी सुद्धा सभागृहामध्ये मागणी करतो की, सन्मा. आमच्या सदस्या ज्योत्स्ना ताई हसनाळे मॅडम, अशा शिक्षकांवर कायदेशीर कायदेशीर रित्या कार्यवाही करावी अशी सभागृहाच्या वतीने मी आपणांस विनंती करतो.

**रोहिदास पाटील :-**

कशासाठी कार्यवाही करणार?

**हॅरल बोर्जीस :-**

सन्मा. रोहिदास पाटीलजी आपण त्या शिक्षकाला कशाला पाठिशी घालता? जर एखादा शिक्षक अशाप्रकारे काम करत असेल तर कशाला पाठिशी घालता.

**रोहिदास पाटील :-**

मला असे माहित आहे की, कोणीही राजकीय पक्षाचे स्वागत केलेले नाही. महाविदयालयाच्या मुख्याध्यापकाचे, महाविदयालयाच्या संस्थापकाचे स्वागत केलेले आहे.

**हॅरल बोर्जीस :-**

जर असे राजकीय पक्षाचे स्वागत केले नसेल तर आम्ही कार्यवाही करायला सांगत नाही. पण असे केले असेल तर कार्यवाही करावी.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

पक्षाचे झेंडे लावलेले होते आणि सूत्रसंचालन केले त्याच्यामध्ये त्यांनी स्पष्ट म्हटलेले आहे की, या विभागामध्ये लाईट, व्यवस्था सन्मा. रोहिदास पाटील (काका) यांनी दिलेली आहे. तर 'काकाच' सगळे करणार आहे तर मग हे ७० लाख मंजूर करण्याची काय आवश्यकता आहे.

**हॅरल बोर्जीस :-**

त्या शिक्षकाने जर तशाप्रकारचे वक्तव्य केलेले असेल तर कार्यवाही करावी.

**रोहिदास पाटील :-**

मुख्याध्यापकाचे त्या शाळेतील शिक्षक स्वागत करणार नाही.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

ते भाषण मी स्वतः ऐकले आणि मोबाईल घेउन मा. आयुक्त साहेबांना सांगितले की, आपण हे भाषण ऐका की येथे काय चालले आहे? त्या शिक्षकावर कार्यवाही झाली पाहिजे अशी माझी मागणी आहे.

**रोहिदास पाटील :-**

राजकीय खासदाराचं स्वागत करताना माझ्याकडे फोटो आहेत आपल्याला आणखीन काय पाहिजे? तुमच्या मोरु भाउची फोटो माझ्याकडे आहेत.

**लिओ कोलासो :-**

आपल्या फोटोचं आम्ही कौतूक करु आपण फोटो घेतले असतील तर आम्ही त्याचं कौतुक करु.

**रोहिदास पाटील :-**

उगाचच कुठला मुद्दा आपण कुठे नेता.

**लिओ कोलासो :-**

प्रश्न असा आहे की, मा. महापौर साहेबा मला बोलू दया.

**रोहिदास पाटील :-**

आपण सरळ सांगा की तुम्ही काही दिलेलचं नाही. तुम्ही आदिवासी लोकांकडे काय बघा का? आम्ही या सभागृहात तुम्हाला प्रश्न विचारत आहोत. काशीच्या शाळेत पाणी आहे का?

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्यांनी कृपया बसून घ्या. आपल्या सर्वांच्या सुचना कळलेल्या आहेत.

**रोहिदास पाटील :-**

वरसावेच्या शाळेत त्यांना एक महानगरपालिकेच कपाट दिलेले आहे ते आहे का? चौकशी करा.

**मा. महापौर :-**

संबंधित विषय प्रकरण क्रमांक २६ अंदाजपत्रक सन २००६ ते २००७ अंशदान शाळा कॉलेज व इतर संस्थाना शैक्षणिक अनुदान देणे हा विषय ह्या मा. महासभेत ठेवलेला आहे. मा. आयुक्त प्रशासनाचा गोषवारा नसल्याकारणाने व बरेच याच्यात तांत्रिक मिस्टेक असल्यामुळे हा विषय सध्या स्थगित ठेवण्यात येत आहे. पुढील वेळेस हा गोषवाऱ्या सहीत विषय महासभेपुढे आणण्यात येईल. सन्मा. सचिवांनी पुढील विषय घ्यावा.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

मा. महापौर मॅडम, मी जो इथे माझ्याच्या पाडयातील शाळेचा विषय इथे नमुद केलेला आहे. मा. महासभेत चर्चा केलेली आहे. तर तो विषय आपण गांभीर्याने घ्यावे. मा. आयुक्त साहेब, आपण सुद्धा हा विषय गांभीर्याने सदर शिक्षकाला बोलावून त्याला समज दयावी आणि त्याला त्या विभागातून दुसऱ्या ठिकाणी कार्यरत करावे अशी माझी मागणी आपण मान्य करावी. त्या विभागातून त्यांनी जे काही केलेले आहे ते चुकीच आहे, गैर आहे. आपण ही ते कबूल करू शकता आणि ते झालेले आहे, घडलेले आहे आणि त्याचा खुलासा मला या मा. महासभेत करावासा वाटला म्हणून मी केलेले आहे. अशा पद्धतीने मिरा भाईंदरच्या सर्व शाळेमध्ये अशा प्रकारचा गैर कारभार शिक्षकांनी करु नये असे मला वाटते. त्यामुळे एकाला कार्यवाही केली तर दुसऱ्यांना समज येईल. तरी कृपया त्याच्यावरती कडक कार्यवाही व्हावी.

**प्रकरण क्र. ८५ :-**

अंदाजपत्रक सन २००६-०७ इ. अंशदान अ शाळा, कॉलेज व इतर संस्थांना शैक्षणिक अनुदान देणे या लेखाशिर्षामधील जादा तरतुद आवश्यक लेखाशिर्षाकरिता उपलब्ध करणे. (मा. शिक्षण मंडळ सभा दि. १२/०९/२००६ रोजीचे प्रकरण क्र. २६)

**ठराव क्र. ६४ :-**

मा. महापौर सो. ह्यांच्या आदेशानुसार सदरचा विषय पुढील सभेत घेण्याचे ठरविण्यांत आले.

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. ८६ चे वाचन केले.)

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो आहे. मॅडम, हा जो विषय आला आहे. त्यामध्ये ३१ वर्षापर्यंत म्हणजे सन २०३१ पर्यत आपण हे करायचे आहे. फक्त एवढंच आहे की, स्टेडीअम बांधणे आणि गार्डन याच्या करिता जी १९३.६० करोडची जी तरतुद केली आहे. त्यात ती जरा कमी करुन त्याच्यात दुसऱ्या चांगल्या अत्यावश्यक लोडमध्ये वळवली तर बरे होईल आणि दुसरी गोष्ट १३ नंबर शहरातील वितरण व्यवस्थेचे मजबूतीकरण करणे आता कोणते वितरण करणार आहेत? आर्थिक वितरण आहे की, पाण्याचं आहे, गटाराचं आहे की, मल निःसारण, जल कसले काहीच दिलेले नाही. शहरातील वितरण कुठचे हे प्रशासनाने ह्याच्यामध्ये नमुद केलेले नाही. ते ह्याच्यात प्रश्नचिन्ह येत आहे. ते आपण ८० लाख रुपये त्याच्यावर खर्च करतोय. वितरण म्हणजे नेमकं कसले याचा उल्लेख करावा नंतरच हा ठराव मंजूरीला घ्यावा.

**रोहित सुवर्णा :-**

मा. महापौर मॅडम, आपल्या परवानगीने बोलत आहे. प्रकरण क्रमांक ८६ मध्ये सुमारे आपण या ठिकाणी १,९२५ करोड रुपयाची तरतुद केलेली आहे. परिशिष्ट ''अ'' मध्ये त्याचा उल्लेख केलेला आहे. या ठिकाणी मी काही आपल्याला सुचना देउ इच्छितो की, सिरीअल नंबर '१०' मध्ये चेन्ना नदी जवळ बंधारा बांधून उदभोग तयार करणे. या ठिकाणी भुजल विभागाकडून फिजिबिलिटी रिपोर्ट घेणे आवश्यक आहे. अन्यथा मागे एकदा सर्व्हे झाला होता की, त्याठिकाणी बंधारा बांधता येणार नाही. त्याठिकाणचा जो स्टोन सॉईल झोन जो आहे. तो पाणी खालच्या बाजूला खेचत असतो. त्यामुळे आपण तो बंधारा त्यावेळी बांधलेला नव्हता. आपण तो फिजिबिलिटी रिपोर्ट चेक करावा. तसेच, नॅशनल राष्ट्रीय उदयानामधून संजय गांधी उदयानामधून येणारा पाणी व गोल्डन केमिकल्सच्या बाजूने पेणकरपाडयाच्या मार्गे जो मिरारोडच्या रेल्वे लाईनच्या खालून जो जातो तो जाफरी खाडी नसून जाफरी नदी आहे. हा रेल्वेच्या डॉक्युमेंट मध्ये आहे. महानगरपालिकेचा जूना रेकॉर्ड जर आपण बघाल २० वर्षापूर्वीचा तर सर्व रेकॉर्डमध्ये जाफरी नदी हा शब्द आहे. आता वस्ती वाढल्यामुळे मिरारोड पूर्वी पुर्वेला त्याचे जाफरी खाडीत रुपांतर झालेले आहे. कारण ई.टी.पी. कुठेही नाही. फक्त सृष्टी आणि शांतीनगरला आहे. ते देखील इररेग्यूलर असल्यामुळे सांडपाणी आपण जाफरी नदीमध्ये सोडतो. त्यामुळे जाफरी नदीचे जाफरी खाडीत रुपांतर झालेले आहे. जर तिथे ही आपण फिजिबिलिटी रिपोर्ट घेतले भूजल विभाग, पुणे कडून तर बंधारा बांधण्यासाठी आपण आजच्या हिशोबाने सक्षम आहोत. त्यानंतर २१ नंबरला वाल्मिकी आंबेडकर आवास योजना मा. महापौर मॅडम, मा. आयुक्त साहेब, आपण कृपया लक्ष दयावे वाल्मिकी आंबेडकर आवास योजना अंतर्गत घरकूल बांधणे. मी आपणास कळवू इच्छितो की, या ठिकाणी वाल्मिकी आंबेडकर आवास योजना पूर्वी होता. आता वाल्मिकी आंबेडकर आवास योजना बंद करण्यात आलेले आहे. हा जो जवाहरलाल नेहरु नॅशनल अर्बन रिन्युअल मिशनमध्ये वाल्मिकी आंबेडकर आवास योजना नाही. तर त्या ठिकाणी....

**दिपक खांबित :-**

बी.एस.यू.पी. नविन योजना आली. इथे त्याच करेक्शन करायचे आहे.

**रोहित सुवर्णा :-**

होय आपण करेक्शन केलेलं नाही. तरी पण मी आपल्याला सांगतो की, आपण ही दुरूस्ती करुन घ्यावी. त्या ठिकाणी फक्त आपण ११.१० कोटी एवढी छोटीशी रक्कम ठेवली आहे. आपल्याकडे जवळ जवळ ४२७ चे ४२८ विस्थापित लोकांची यादी आपणच तयार केलेली आहे. ज्या ठिकाणी लोकांची घरे पक्की घरे तोडून त्यांना आपण बेघर केलेले आहे. त्यामध्ये बंदरवाडी, डॉ. आंबेडकर नगर, भोलानगर आहेत, त्यामध्ये धावगीची झोपडपट्टी येण्याची शक्यता आहे. जर तिथे आपला घनकचरा प्रकल्प व्यवस्थित चालला तर त्या लोकांचे आपल्याला पुर्नवसन करायला लागेल. आंबेडकर नगर आहे, भोला नगर आहे या ठिकाणी टोटल ४२७ लोकांची आपण यादी तयार केलेली आहे. तर ती ४२७ घर २३३ च्या सर्व्हे नंबरमध्ये आपण पूर्णपणे बांधू शकणार नाहीत. त्याठिकाणी समुद्र किनारा तटरक्षक दल येणार आहे. त्यामुळे त्यांनी त्या जागेची मागणी केलेली आहे. त्यानंतर सन्मा. सदस्या नयना म्हात्रे यांना राज्य सरकाराकडून एक पत्र आले होते. त्यानंतर आमची प्रांताधिकाऱ्यांकडे एक सभा झाली. मॅडम, मी सांगू इच्छितो त्यामध्ये एक कारण आहे. हा फार महत्त्वाचा विषय आहे. ४६ हजार स्केअर मिटर पैकी जर २६ हजार स्केअर मिटर जमीन कोस्टलला गेली काही ठिकाणी जमिन बाधीत आहे. तर आपल्याला कमीत कमी १६ हजार स्केअर मिटर मिळण्याची शक्यता आहे. जर १६ हजार स्केअर मिटर जमीन जर आपल्याला मिळत असेल तर आपण त्या ठिकाणी ट्रांझिन्ट कॅम्प ज्या ठिकाणी डेन्जरस बिल्डिंग मध्ये लोक राहतात त्यांना देखील आपण शिफ्ट करु शकतो. तसेच वाल्मिकी आंबेडकर आवास योजना नसून आता जी काही बी.एस.यू.पी. अंडर घरे बांधणार आहोत ती घरे देखील आपण घरकूल योजना, तसेच शांती नगरमध्ये शांती स्टार बिल्डरने जे आर्थिक दुर्बल घटक घरकूल योजना जे हाउसिंग स्कीम पर दि विकर सेक्शन २० अंतर्गत अर्बन लॅन्ड सिलिंग कायदयाच्या अंतर्गत आपण त्याठिकाणी शांतीनगर हाउसिंग स्किम फॉर डब्ल्यू.एस. राबवलेली आहे. स्किम आपण सर्व्हे नंबर २३३ मध्ये आकारू शकतो. मा. मॅडम, हा फार महत्त्वाचा विषय आहे. आता जो विषय मॅडम, यांनी आणलेला आहे त्यावर मी टच न करता फक्त मी मा. महापौरांना सांगू इच्छितो की, स्टेडियम फार मोठा करणे यात आपले आर्थिक नुकसान होण्याची शक्यता आहे. दादाजी कोंडदेव स्टेडीयम ठाण्याला आहे. ठाणे महानगरपालिकेची आपण

परिस्थिती बघा की, वर्षाला १५ दिवस देखील दादाजी कोंडदेव स्टेडीयमचा उपयोग होत नाही. शेवटी तिकडे लहान मुलांना क्रिकेटची प्रॅक्टिस साठी नेट प्रॅक्टिससाठी दिली जाते. त्याचे उत्पन्न मिळत नाही. पेलणीचे आगार त्या ठिकाणी असून मी काल रात्री ११.३० वाजता माझ्या बरोबर सन्मा. सदस्या नयना म्हात्रे यांचे मिस्टर गजानन म्हात्रे हे होते. एक जे.सी.बी. ला नंबर देखील नाही. पासिंग देखील झालेली नाही. त्यावर बसलेला ड्रायव्हर त्याच्याकडे ड्रायव्हिंग लाईसन्स नसताना देखील तो तिकडे जे.सी.बी लावून रात्री ११.३० वाजता मातीची लेव्हलिंग करत होता. मॅडम, मी आपल्याला कळवू इच्छितो की, आंबेडकर नगर व भोला नगरची लोक जी रस्त्यावर झोपतात. उदया सलमान खान सारखी त्या जे.सी.बी ची गाडी त्या गरिबांच्या अंगावरुन जाईल. एखादा मोठा ॲक्सिडेंट होण्याची शक्यता आहे. त्याच्याच बाजूला राधा स्वामीच्या सत्संगच्या बाजूला एका छोटयाशा गार्डनचे रिझर्व्हेशन आहे. मा. महापौर या ठिकाणी....

**महेंद्रसिंग चौहाण :-**

मा. महापौर मॅडम, सब्जेक्ट के उपर बोलने की, परवानगी दिजिए। हम लोग भी बोलना चाहते है। शहर के विकास २०३१ तक जो प्रपोझ किया है इसके बारे मे बोलने की, अनुमती दिजीए ना की, आज कल क्या चल रहा है इसके बारे मे क्योंकी सुबह से शाम तक हम सुन रहे है। हम लोग भी विकास के बारे मे बोलना चाहते है। इनके द्वारा सुधारीत। इन्होने घरकूल बांधे। इसपर तो बात कर सकते है। मगर दुनिया की बातों के लिए आप कमसे कम रोक तो लगाईए।

**रोहित सुवर्णा :-**

मा. महापौर मॅडमजी, मी आपल्याला कळवू इच्छितो सायमन्ड नावाच्या कॉन्ट्रक्टरने काल महानगरपालिकेची माती चोरलेली आहे. डंपर नं. ९६६० आहे. महानगरपालिकेची माती जे मा. आयुक्त साहेबांनी श्री. खांबित साहेबांनी गार्डनच्या जागेवर आरोग्य विभागाने टाकला होता. त्या ठिकाणी सन्मा. सदस्या नयना म्हात्रे आणि मी फॉलो अप करून त्यावर महानगरपालिकेने मातीचा भराव केलेला होता. कारण गरिबांना डेंग्यू किंवा चिकुनगुनिया सारखे आजार होउ नये म्हणून आपण मातीची फिल-अप केली. वीस टक्के माती आपण रात्री टाकलेली आहे. काल सकाळी साडे अकरा वाजता ९६६० नंबरचा डंपर ती सायमन या कॉन्ट्रक्टर ची गाडी आहे. मी त्यांना चोरी करताना पकडले आहे.

**लिओ कोलासो :-**

मा. महापौर साहेबा, हा जो विषय आहे आणि हा प्रस्ताव कुठे आहे आणि आपली चर्चा कुठे चालली आहे. याला आपण जरा आवर घालावा. आम्हाला आवडेल त्यांनी बोललेलं. परंतु, या विषयाला धरुन बोललेलं चांगलं. कारण आम्ही माती टाकली आम्ही पाणी टाकलं.

**रोहित सुवर्णा :-**

कारण मा. आयुक्तांचा निग्लिजन्स. चोरी केली, चोरी... महानगरपालिकेची माती चोरी केली आहे. महानगरपालिकेची दगड चोरी केली. आणि मी परत जाउन तेथे त्यांना ती माती व दगड त्यांना तिथे टाकायला लावली. आणि रात्री साडेअकराला जाउन बघतो तर परत सर्व दगड गूल झालेली होती. मॅडम, हे काय चालले आहे?

**लिओ कोलासो :-**

मा. महापौर साहेबा, मला सुद्धा या विषयावर काही बोलायचे आहे. तर आम्हाला परवानगी दया.

**रतन पाटील :-**

पहिला मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो, २०३१ पर्यंतचा विकासात्मक आराखडा ठेवलेला आहे आणि मा. महासभेसमोर हा प्रस्ताव येथे आलेला आहे. विषय आलेला आहे आणि हा मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या विकासात्मक प्रथम कुठल्या कुठल्या कामाला प्रोत्साहन दयायचे किंवा कुठली – कठली कामे पहिल्यांदा करायची हे ठरले पाहिजे. कारण आज मिरा-भाईंदरच्या दृष्टीने एक सगळ्यात महत्त्वाचे असे आहे की त्याच्यामध्ये एक भुयारी गटार योजना आहे. त्या भुयारी गटार योजनेस लवकरात लवकर प्राधान्य मिळालं पाहिजे. त्याच बरोबर शहरातील भुयारी गटार योजना त्याचप्रकारे एकात्मी नाले प्रकल्प. कारण प्रत्येक वेळेला पावसाळ्यामध्ये ह्याच्या अगोदर जी २६ जुलै मध्ये एक दुर्घटना घडलेली आहे तसे पुन्हा होउ नये म्हणून मा. महासभेने त्याबाबत चर्चा चांगली झाली होती. म्हणजे एकात्मी नाले प्रकल्प योजना ही महानगरपालिकेच्या विभागामध्ये राबवायची अशा पद्धतीने ठरलं होतं तर, मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या प्रथम ह्याच्यामध्ये एकात्मीक नाले प्रकल्पाला प्राधान्य मिळाले पाहिजे, त्याचबरोबर आपण मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मार्केट बांधणार. मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या आपल्या ह्या पूर्ण विभागामध्ये साडे सात लाख लोक वस्तीच्या शहरामध्ये मार्केटची जी बांधणी आहे. ती कुठे जास्त नाही कारण एक मिरा-भाईंदर महानगरपालिकेने एक मार्केट बांधले आहे ते उत्पन्नाची एक बाब आहे. त्याच्याने महानगरपालिकेने जर मार्केट बांधले तर निश्चितच उत्पन्न वाढेल म्हणून त्याबाबत सुद्धा आपल्याला प्राधान्य दयायला पाहिजे. त्याच बरोबर महानगरपालिकेच्या नंबर ८ पोशीर धरणासाठी महानगरपालिकेने भरावयाची रक्कम २७२ कोटी रुपये आणि बारवी, सुर्या, मोरबे उद्भवनातून पाणी पुरवठा योजना १०० कोटी रुपये अशा या दोन्ही अमाउंट दिलेले आहेत. आपण निश्चित बारवी डॅम मधून पाणी उचलणार आहोत की, पोशीर धरणाबाबत महानगरपालिकेचा विचार आहे. मा. आयुक्त साहेब, मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या वाढत्या लोकसंख्येच्या मानाने २०३१ पर्यंत

जो आढावा दिलेला आहे. जो पोशीर धरण मिरा-भाईंदर महानगरपालिका बांधणार आहेत की, आपण सुर्या किंवा बारवी डॅम मधून पाणी घेणार आहोत. निश्चित हे कुठेतरी निर्णय व्हायला पाहिजे की, पोशीर धरण आपण घेणार आहोत किंवा आपण बारवी डॅम मधून पाणी घेणार आहोत त्याबाबत सुद्धा कुठेतरी एक निश्चित ठराव दया की, त्याला प्राधान्य द्या. येणाऱ्या लोकसंख्येच्या मानाने किंवा वाढणाऱ्या लोकसंख्येच्या मानाने मिरा-भाईंदरमध्ये हे जे पाणी आहे. ते आपल्याला अपूरे पडतच राहणार आहे. आज साडे सात लाख लोकसंख्या असली तरी ही महानगरपालिकेची साडे सात लोकसंख्या पार करुन गेलेली आहे. म्हणून आता जे आपले येणारे जो सकाळी प्रकार घडला पाण्याच्या बाबत आपल्याला वाढीव पाणी मिळावं म्हणून तर, तसे प्रकार घडू नयेत तर निश्चितच पाण्याचा सोर्स वाढविण्यासाठी सर्व सभागृहाने निश्चितच प्रयत्न करायचा आहे मी दिलेले जे आहे त्याला प्रथम प्राधान्य दयावे. असे मी सुचवीत आहे.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य रतन पाटील आपल्या सुचना....

**रतन पाटील :-**

आणखिन एक तशीच सुचना आहे. मिरा-भाईंदर महानगरपालिकेमध्ये स्थायी समितीत चर्चा झाली होती. एक स्विमिंगपूल पाहिजे. मिरा-भाईंदरने अशा पद्धतीने स्विमिंग पूलची व्यवस्था नाही. ते सुद्धा महानगरपालिकेच्या उत्पन्नाच्या दृष्टीने एक बाब आहे. एक स्विमिंग पूल सुद्धा त्याबाबत महानगरपालिकेतर्फे बांधण्यात यावे.

**मदन उदितनारायण सिंग :-**

मा. महापौर जी के परवानगीसे बोलना चाहता हूँ। मा. महापौर मॅडम, यह जो योजना आई है। यह जो अहवाल आपने दिया है। उसको पढने से लग रहा है की, ये जो सब काम है अपने को २५ सालमे करना है। उसमे हम लोगो को ऐसे लगता है की, जो काम मंजूर हो गये है और जो अत्यआवश्यक काम है जो शहर के लिए जरुरी काम है। जैसे की ७ नंबर जेसल पार्क जैसे भूयारी मार्ग तयार करने व मिरारोड, भाईंदर दरम्यान रेल्वे ट्रक खाली चार कन्व्हर्ट बांधने। यह शहर के लिये जरुरी काम है और यह काम महानगरपालिका मे मंजूर हो गया है। यह काम इसमे से निकाल करके जैसे मंजूर हो गया है वैसे किया जाए। यह मेरा सुझाव है। इसके बारे मे मा. आयुक्त खुलासा करे। म्हणजे हे किती दिवसात करण्यात येईल ह्याची ऑलरेडी मंजूरी मिळाली आहे ना. मा. महासभेत मंजूरी दिलेली आहे.

**दिपक खांबित :-**

मा. महासभेने मंजूरी दिलेली आहे. प्रस्ताव दोन-तीन टप्प्यामध्ये आहे. तो आला की, आपण टेंडर काढणार आहोत.

**रोहिदास पाटील :-**

म्हणून आमची अशी विनंती आहे की साहेब, ज्या सबवे साठी आपण इतके वर्षे रखडलो त्यानंतर अंतिम टप्प्यात ते आहे ह्या योजनेत त्याला समाविष्ट केल्यानंतर ही योजना साकारते वेळी विविध परवानगी घ्यायला लागतात. विविध खात्याशी तुम्हाला बोलायला लागेल.

**दिपक खांबित :-**

साहेब, तो पर्यंत काम थांबणार नाहीत.

**रोहिदास पाटील :-**

ज्यावेळी आपल्याकडे प्रोव्हिजन असताना, सगळ्यांनी मान्यता दिली असताना ते काम याच्यामध्ये ॲड का करता अशी माझी विनंती आहे. हे काम तुम्ही वगळून दुसरे काम घ्या ही तर चूक भूल द्यावी घ्यावी सारखा लेखा जोखा आहे ना. याच्यात तुम्ही त्या ठिकाणी असलेले १३ कोटी रुपये दुसऱ्या ठिकाणी घ्या. जे नाव आठवेल ते लिहा पण ह्याच्यातून ते वगळा ना.

**दिपक खांबित :-.**

आपण आपल्या खर्चातून करु.

**रोहिदास पाटील :-**

त्याच्यातून सबवे वगळा नाही तर उदया नवीन साहेब तुमच्या सारखे जर कोणी आले तर ते आणखीन सांगतील ही त्या स्किममध्ये आहे.

**दिपक खांबित :-**

नाही सर.

**रोहित सुवर्णा :-**

मी विनंती करतो की, माझ्या एका विनंतीला तरी मान द्या. १३ कोटी रुपये तुम्ही कुठे अन्य ठिकाणी ॲड करा. नवीन ॲड शोधा आणि हे जेसलपार्क रेल्वे सबवे वेगळे ठेवा.

**दिपक खांबित :-**

आपण याचा ठरावात तसा उल्लेख करु.

**रोहिदास पाटील :-**

तसा उल्लेख करा. साहेब, मी याच्यावर बोलू इच्छितो की, १,९२५ कोटी रुपये १७ लाख रुपये हे खर्च करण्याच्या दृष्टीने पहिल्यांदा ही योजना आणल्या नंतर आम्ही तुम्हांला स्टॅण्डींगमध्ये धन्यवाद दिले होते. आम्ही तुमचे अभिनंदन केले होते. तुमच्या बरोबर आम्ही दोन शब्द चांगले बोललो होतो साहेब, त्यावेळी आपण माहिती देते वेळी अशी तुम्ही स्थायी समितीला माहिती दिली नाही की, ही योजना मंजूर झाली ह्याच्यात ५०% हिस्सा आपल्या वाट्याला आहे असे त्यावेळी तुम्ही बोलला नव्हता. आम्हाला वाटले की, सर्व सरकारी केंद्र सरकारचे अनुदान आहे आणि १००% असेल किंवा असेल ते १५% असेल पण ही टिपणी वाचताना असे लक्षात येते की, ह्याच्यामध्ये ५०% महानगरपालिका जे फंड रेंज करायचा आहे. ५०% महानगरपालिका खर्च करेल त्यामुळे त्याचा या स्थायी समितीच्या बैठकीत तुम्ही उल्लेख केला नव्हता. कारण ते होतेय तेच मी सांगत आहे. हा उल्लेख नव्हता तरीसुद्धा ५०% आपल्याला मिळत आहे. आपण त्याचं अभिनंदन आणि स्वागतच करीत आहोत. साहेब, ह्या ज्या योजना आहेत, म्हणजे आपण ज्या काही दुरूस्त्या करु शकतो हे ही आम्हाला माहित आहे. पण त्या योजनांची गोळा बेरीज केलेली आहे एका ठिकाणी आपण स्टेडियमसाठी २२० किंवा १९३ कोटी रुपये आपण खर्च दाखवलेला आहे. जशी मी सहा नंबरमध्ये विनंती केलेली आहे. सोळा नंबरमध्ये घनकच-याचा विषय आहे. तो ही आपण बी.ओ.ओ.टी. तत्त्वावर दिलेला आहे. म्हणजे आता पुन्हा ते हेड ठेवले तर त्याला बघा हे कामकाज करते वेळी आपल्याला अडचणी येतात. कारण याच्यात सरळ परवानगी नाही. इथे साहेब, मा. महापौरांनी, मा. सभागृहाने, मा. आयुक्तांनी यस म्हटलं तर उद्या आपण काहीही करु शकतो. पण ह्या ज्या स्कीममध्ये आपल्याला हा पैसा वापरायचा असेल, मा. महापौर मॅडम, जरा ऐकून घ्या.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य रोहिदास पाटील, आपण जे सुचवत आहात ते सर्व लिस्टमध्ये आहे. आपण जे सुचविलेले आहे ना ते लिस्टमध्ये अंतर्भूत झालेले आहे.

**रोहिदास पाटील :-**

त्या लिस्टमधून ते वगळा म्हणून मी तुम्हाला विनंती करत आहे. मा. महापौर मॅडम, तुम्ही जेव्हा त्याच्यात हेड टाकाल ना, त्या हेडवर खर्च करतेवेळी तुम्ही कितीही करा त्यातला त्यासाठी विशिष्ट परवानगी घ्यायला लागतील म्हणून जे आपलं मार्गी लागलेलं काम आहे ते ह्याच्यात ठेवू नका. तेवढयाच रक्कमेच तुम्ही दुसरं काम सुचवा ना.

**दिपक खांबित :-**

साहेब, ज्या आपल्याला इंटरनल गाडया लागणार आहेत त्याकरिता ते पकडले जात आहे. प्लॅन करण्यासाठी ते नाही.

**रोहिदास पाटील :-**

ठिक आहे आपण त्या लिस्टमधून सबवे बाहेर काढा. सबवेचे तुम्ही लवकरात लवकर काम करा आता आमची निवडणूक येत आहे.

**दिपक खांबित :-**

आपण आपल्या फंडातून करायचं आहे. उद्या जर या योजनेखाली मंजूर झाले तर आपल्याला ५०% पैसे मिळतील. त्याकरिता अडणार नाही.

**रोहिदास पाटील :-**

मी हात जोडून तुम्हाला सांगत आहे की, पण आता जे गुंतले जात आहेत ते आपले पैसे आहेत.

**हॅरल बोर्जीस :-**

पालिकेच्या हितासाठी आहे.

**रोहिदास पाटील :-**

या हेडमधून का? आपण याकरिता दुसरे हेड घ्या ना. १,९२५ कोटी रुपये आणि १७ लाख रुपये मंजूरच करायचे आहे. आपल्याला ते रुपये खर्च करायचे आहेत. तुम्ही हेड दुसरा घ्या ना.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

तुम्ही त्याच्यात स्कायबस आणि मेट्रो रेल्वेचा विषय टाका.

**रोहिदास पाटील :-**

त्यांनी सांगितल्याप्रमाणे तसे काही चांगल टाका.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

स्काय बस आणि मेट्रो रेल्वे घ्या.

**रोहिदास पाटील :-**

सन्मा. सदस्य जे सांगत आहेत ते घ्या. ते कधीच बोलत नाही ते आता बोलले आहेत त्याच्या सुचना घ्या.

**हॅरल बोर्जीस :-**

मा. महापौरांच्या परवानगीने, प्रकरण ८६ सर्व सन्मा. सदस्यांकडे अनुक्रमांक १ ते ३८ अशाप्रकारे प्रशासनाच्या मार्फत गोषवारा प्राप्त झालेला आहे. त्यामध्ये सन्मा. सदस्य रोहिदासजी पाटील जेष्ठ सदस्य या

सदस्यांनी अनुक्रमांक ६ रिंग रोड प्रकल्प त्याच प्रमाणे अनुक्रमांक १४ भुयारी गटार योजना, अनुक्रमांक ६,१४ आणि २४,३७ मा. महासभेने याला यापुर्वीच परवानगी दिलेली आहे.

**मिलन म्हात्रे :-**

१३ चे काय झाल? १३ मध्ये शहरातील वितरण व्यवस्था त्याचे काय झाले?

**हॅरल बोर्जीस :-**

मा. महापौर मॅडम, या यादीमध्ये...

**मिलन म्हात्रे :-**

जल आणि मलनिःसारण याचे काय आहे.

**हॅरल बोर्जीस :-**

अनुक्रमांक २२ ह्याच्यामध्ये सभागृहाला प्राप्त गोषवारा त्याच्यामध्ये कत्तलखाना बांधणे या हेड वर ६ कोटी ५४ लाख रूपयांचे प्रावधान दाखविलेले आहे. त्या जागी ८ कोटी ५२ लाख रूपये अशा प्रकारे ते ठरावात अंतर्भुत करण्यात येत आहे. ही दुरूस्ती सन्मा. सदस्यांनी लक्षात घ्यावी. प्रकरण क्रमांक ८६ जवाहरलाल नेहरू.....

**रोहिदास पाटील :-**

त्याच्यातच डिजायस्टेड मॅनेजमेंट एक महत्वाचा विषय इतका प्रकर्षाने आलेला नाही. साधारण आपण अपेक्षा करतो की, आपल्या हद्दीत जेवढे हायवे आहे. आपण दरवर्षी म्हणजे हायवे खर्च करते त्याची ३ इंच, ४ इंच, ६ इंच उंची वाढत जाते. आज प्रकर्षाने जाणवते की, हायवेची उंची वाढल्यामुळे आणि आता कायम स्वरूपी भिंतीचे डिवायडर टाकल्यामुळे पावसाळ्यात पाण्याची पातळी वाढते आणि त्या ठिकाणी असलेली घरे जी मुळ घरे १५ वर्ष, २० वर्ष, २५ वर्षापासून आहेत. घराची काही उंची वाढत नाही. पहिल्यांदा घराच्या पायरी पर्यंत पाणी येत होत. आता ओटीवर यायला लागले आणि गेल्या वर्षी गुडघ्यापर्यंत पाणी चढल होत तर सन्मा. खांबित साहेब स्लॅप ड्रेन या हेडखाली तुम्ही मोठी रक्कम घ्या भुयारीची रक्कम त्यात घ्या आणि ते वाढवा. साहेब, मी तुम्हाला विनंती करतो मा. आयुक्त साहेब, याच्या बद्दल तातडीने पत्र जावे. जे आपल्याशी संबंधित नाही. एम.एस.आय.टी. ने जो रस्ता बनवायला घेतलाच आहे. वरसावे ब्रिज ते कापूरवाडी नाका आपण रोज आपल्याही लक्षात येत असेल त्याच्यावर अनेक उघाडी होत्या. आज एवढा मोठा रस्ता बनतेवेळी त्या उघाडीचा कुठेही विचार झालेला नाही. त्या दिवशी सिटी इंजिनियरशी माझी मिटींग झाली मी सांगितले की, साहेब आपण सर्व डिग्री घेतलेली लोक आणि आम्ही बिन शिकलेली लोक जे आम्हाला दिसते ते त्या पदाधिका-यांना का दिसत नाही. मी एक उदाहरण सांगतो मा. महापौर मॅडम, यांना माहित आहे. सगळ्यांना माहित आहे. सभागृह नेते यांना ही हे माहिती आहे, की गायमुख जिथे महादेव मंदीर आहे तिथं पासून ते भाईंदर पाडा या ठिकाणी साहेब पहिल्यांदा चार उघाडया होत्या. आज उघाडी न ठेवता पहिल्यांदा जेव्हा जिल्हा परिषदेचा रस्ता होता त्याच्यावर अडीच फुट उंच केला कारण ते बुडते म्हणून परिणाम रस्ता बुडणे कमी झाले. पण मागची सर्व घरे बुडायला लागली. आता तुम्ही पुन्हा बघितले असेल तर अडिच फुट पुन्हा उंची वाढवायला घेतली म्हणजे त्या घरात कंबरे एवढे पाणी पण स्लॅब ड्रेन वगैरे नाही. आपल्या हद्दीतील काजू पाडयातील चेण्याचे त्याठिकाणचे असेल तर प्रश्न ठाणे महानगरपालिकेचा आपल्या हद्दीसाठी मा. आयुक्तांनाच आपले पत्र जावे. अशी मी विनंती करतो. गायमुख कडे जी उघाडी बांधली ती उघाडी उंचावर झाली आणि मी जिथे म्हणतो तो सखल जो भाग आहे. तो सर्व बुडतोय तिथे लोकांची घरं आहेत. त्याठिकाणी पण ते ठाणे महानगरपालिकेच्या हद्दीत गेला आपली हद्द जिथून आहे त्या हद्दीत ज्या उघाडया अपेक्षित आहेत दोन पाहिजे असतील तर तुम्ही चारचे पत्र द्या. आम्ही ते प्रकरण चालवत राहू. एक कॉपी मला मिळावी. धन्यवाद.

**हॅरल बोर्जीस :-**

प्रकरण क्र. ८६ ठराव अनु. क्र. १ ते ३८ वरीलपैकी अनु. क्र. ६,१४,२४ आणि ३७ या कामांना यापूर्वीच मा. महासभेने दि. ५/६/०४, ठराव क्र. ७ मा. महासभा दि. १८/१२/०४ ठराव क्र. ५९ मा. महासभा दि. १८/५/०६ ठराव क्र. २१ मा. महासभा दि. १८/५/०५ ठराव क्र. २० अन्वये मान्यता दिलेली आहे. प्रस्तावात नमुद सर्व कामे सन २०३१ पर्यंत टप्याटप्याने हद्दीत घ्यावयाचे आहेत. अनु. क्र. ६,१४,२४ व ३७ ही कामे वगळून इतर कामांच्या खर्चाचे.....

**रोहिदास पाटील :-**

सभागृह नेते, हॅरल बोर्जीस आम्ही जे तुम्हाला सांगतो त्यामुळे तुम्हाला काही अडचण वाटते का?

**दिपक खांबित :-**

साहेब, तसे नाही मी आपल्याला विषय सांगतो.

**रोहिदास पाटील :-**

नसेल तर आम्ही असेच बोलणार की, तुम्ही त्याच्यात खोडा घातला. आम्हाला त्यातले माहित आहे. तुम्हाला जितके माहिती आहे त्या पलीकडे आम्हालाही माहित आहे. जेव्हा या स्किम मध्ये गेल्यानंतर तो सबवे होणार नाही.

**दिपक खांबित :-**

सन्मा. सदस्य रोहिदास पाटील (काका) मी तुम्हाला सांगतो आपण जी....

**रोहिदास पाटील :-**

तुम्ही ६ काढलात तर ७ काढायला काय हरकत आहे.

**दिपक खांबित :-**

आपण जी मंजूरी दिली होती ती साडेचार कोटी रुपयांची दिली होती आणि २.८० कोटी हे रेल्वेच्या उघाडयासाठी त्यांच्यासाठी आणि त्याचे एस्टीमेट रिवाईजर रेटने केलं तर ते १३ कोटीच आहे. आपण जी मंजूरी दिली आहे ती कमी आहे. त्यामुळे आपण ते परत रिवाईज मंजूरी करिता घेतले आहे.

**रोहिदास पाटील :-**

काय?

**दिपक खांबित :-**

आर्थिक मंजूरी.

**रोहिदास पाटील :-**

आपण खरं काम करणार आहोत ना. ६ कोटीचे ७ कोटी करा.

**दिपक खांबित :-**

होय. तेच केलं आहे. १३ कोटी केलं आहे.

**रोहिदास पाटील :-**

महानगरपालिका आपला पैसा खर्च करते तर त्यात बिघडले कुठे?

**हॅरल बोर्जीस :-**

सन्मा. खांबित आर्थिक प्रशासकीय मंजूरी साडे चार कोटी रुपयाला दिलेली आहे ना.

**दिपक खांबित :-**

होय, आपले ७ कोटी ३० लाख होते तर ते १३ कोटी झाले आहे. म्हणून ते घेतले आहे.

**हॅरल बोर्जीस :-**

साडे चार मध्ये होत नाही म्हणून आपण याच्यात अंतर्भूत केले आहे.

**रोहिदास पाटील :-**

काय?

**दिपक खांबित :-**

तो खर्च वाढला आहे म्हणून आपण ते रिवाईज मंजूरी घेत आहोत.

**हॅरल बोर्जीस :-**

साडे चार कोटीं ला मंजूरी दिली आहे ना आणि साडे चार कोटीच्या व्यतिरिक्त....

**दिपक खांबित :-**

साडे चार जी होती...

**रोहिदास पाटील :-**

सन्मा. सभागृह नेते हॅरल बोर्जीस यांच्याशी आणि तुमच्या मंजूरीशी काय संबंध आहे. येथे चूक भूल दयावी आणि घ्यावी. अशातला आपला प्रस्ताव चालला आहे. तुम्ही असेच बरेच आमचे प्रस्ताव घेतले. आमची दिशाभूल करु नका. आम्ही तुम्हाला विनंती करतो. मा. मॅडम, जेसल पार्कच्या सबवे चे काम मार्गी लागते. या मध्ये हेडमध्ये ते टाकू नका. ८ कोटी रुपये लागत असतील तर १२ कोटी रूपये खर्च करा तो खर्च नाही करायचा आहे का? तो तर महानगरपालिकेचा खर्च आहे. लोकांसाठीच आपण खर्च करतो. तो खर्च सन्मा. बारकुंड साहेब, सन्मा. खांबित साहेब करत नाही.

**दिपक खांबित :-**

साहेब, आपण समजून का नाही घेत.

**रोहिदास पाटील :-**

नाही.

**रतन पाटील :-**

साहेब, त्या हेडमध्ये रेल्वेखाली चार कलवट बनवायची आहेत.

**दिपक खांबित :-**

जे एकूण एस्टीमेट आहे ते ७ कोटी ३० लाख रुपयाचे होते. आता रेल्वेने मंजूरीसाठी जे पुटअप केले व जे एस्टिमेट केले त्यानुसार एकूण खर्च १३ कोटी रूपये झालेला आहे. त्या करिता आपण रिवाईज मंजूरी घेतो म्हणून त्याचा उल्लेख केलेला नाही.

**रोहिदास पाटील :-**

आपल्याकडे १३ कोटीं रूपये आहेत ना.

**दिपक खांबित :-**

आहेत ना आपल्याकडे १३ कोटी रूपये आहेत आणि आपण काम करणार आहोत ना.

**रोहिदास पाटील :-**

त्यातूनच करा ना.

**दिपक खांबित :-**

त्याच्यातूनच आपण करणार आहोत.

**रोहिदास पाटील :-**

याच्यातून गेल्यानंतर मंजूरीसाठी तुम्हाला विविध....

**दिपक खांबित :-**

सर, आपल्यांला पैसे येणार आहेत ना.

**रोहिदास पाटील :-**

आम्ही प्रामाणिक विनंती करतो ते तुमच्या कसे लक्षात येत नाही. दुसरं हेड घ्या. तुम्ही दुसरा हेड घ्या ना त्यातून तुम्ही काम करा.

**दिपक खांबित :-**

सन्मा. सदस्य (काका) रोहिदास पाटील जर उदया आपल्याला तेथून पैसे आल्यावर आपल्याला नको आहेत का?

**रोहिदास पाटील :-**

दुसरं नाव लिहले तर पैसे येणार नाही.

**दिपक खांबित :-**

कुठले?

**रोहिदास पाटील :-**

दुसरं कोणतेही चांगलं नाव लिहा सन्मा. सदस्य ध्रुवकिशोर पाटील यांनी जे नाव सांगितलं ते घ्या.

**दिपक खांबित :-**

आपण ते काम लगेच करणार.

**रोहिदास पाटील :-**

मी नाही सांगितले आहे. मी सांगतो याला तुम्ही जबाबदार राहाल हे तर काही काम करण्याच्या मनस्थितीत नाही.

**दिपक खांबित :-**

तसे नाही.

(सन्मा. सभागृह नेता श्री. हॅरल बोर्जिस ह्यांनी प्रकरण क्र. ८६ च्या ठरावाचे सभागृहासमोर वाचन केले.)

**रतन पाटील :-**

सर्व सन्मा. सदस्यांच्या सुचनासहीत घ्या.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

इस ठराव को मेरा अनुमोदन है।

**रतन पाटील :-**

मॅडम, सुचनासहीत घ्या.

**सुर्यकांत भोईर :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**लिओ कोलासो :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलत आहे. सन्मा. सभागृह नेत्यांनी ठराव मांडला आणि खरचं हा आपल्या शहराच्या फार मोठ्या प्रतिष्ठेची विकास योजना आपण सर्व संमतीने चांगल्या प्रकारे चर्चा करुन स्विकारत आहोत. परंतु, यामध्ये मला मा. आयुक्त साहेब आपल्याला अशी एक विनंती करायची आहे की हा जो एवढा मोठा शिवधनुष्य जवळ-जवळ उचलण्यासाठी कटीबध्द होत आहोत. परंतु, हे राबवताना महानगरपालिका पातळीवरती एखादा स्पेशल सेल या ठिकाणी असायला पाहिजे. आपले जे सार्वजनिक बांधकाम जे खातं आहे. हे केवळ महानगरपालिकेच्या निजी निधी मधून काम करणं एवढचं समर्थ आहेत आणि जर हा सन २०३१ पर्यंत हा प्रकल्प राबवायचा असेल तर एखादा खास विभाग महानगरपालिका पातळीवर स्थापन करावा.

**रोहित सुवर्णा :-**

मा. महापौर मॅडम, संबंधित नगरसेवक आणि मी ज्या सुचना दिल्या आहेत ते कृपया या ठरावामध्ये ॲड कराव्यात अशी रुलिंग दयावी.

**हॅरल बोर्जीस :-**

मा. महापौर मॅडम, माझी अशी एक सुचना होती की, २१ नंबरवर वाल्मिकी आंबेडकर आवास योजना (वॉम्बे) त्याठिकाणी बी.एस.यु.पी. असे करेक्शन केलेले आहे.

**मा. महापौर :-**

सन्मा. सभागृहाने, सन्मा. सदस्यांनी ज्या सुचना ..........

**रोहित सुवर्णा :-**

मा. महापौर मॅडम, याच्यामध्ये करेक्शन आहे. याच्यामध्ये ज्याठिकाणी आपण भुयारी गटार योजना जे १४ नंबर ला स्ट्राँग ड्रेनींग वॉटर हे पावसाचे पाणी असते आणि भुयारी गटार योजनेतुन सांडपाणी जाते. हे दोन्ही वेगळे सेपरेट आहेत आणि मी इ.टी.पी. बोललो होतो. इक्वल ट्रीटमेन्ट हे दोन्ही आपण या ठरावामध्ये ॲड करुन घ्यावे अशी माझी सुचना आहे आणि वाल्मिकी आंबेडकर आवास योजनेतुन आपल्याला ४२८ घरें बांधायची आहेत. ते ह्या ११ कोटीमध्ये होणार नाही. म्हणून आपण याच्यात वाढ करावी अशी माझी सुचना होती. ती सुचना आपण या ठरावामध्ये समाविष्ठ करावी.

**रोहिदास पाटील :-**

४२८ कशी? वाढतील ना ती. जसे जसे वायडींग होतील तसे तसे ते वाढतील.

**मा. महापौर :-**

सन्मा. सभागृह व सन्मा. सदस्य यांनी सुचविलेल्या सुचनांसह हा ठराव सर्वानुमते मंजुर करुन करण्यात आला आहे.

**प्रकरण क्र. ८६ :-**

जवाहरलाल नेहरु नॅशनल अर्बन रिन्युअल मिशन अंतर्गत तयार करण्यात आलेल्या शहर विकास आराखड्यात (C.D.P.) समाविष्ट विकास कामानां प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे व प्राधान्यक्रम ठरविणे.

**ठराव क्र. ६५ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका मा. महासभा दि. २०/०१/२००६ ठराव क्र. ८५ अन्वये जवाहरलाल नेहरू नॅशनल अर्बन रिन्युअल मिशन अंतर्गत मिरा भाईंदर महानगरपालिकेचा समावेश करण्यास व शहर विकास आराखडा तयार करून घेण्यास मान्यता देण्यात आली होती. सदर कामी महानगरपालिकेने तांत्रिक सल्लागार म्हणून मे. टंडन ॲन्ड असोसिएटस यांची नेमणूक केली होती. त्यांच्या मार्फत केंद्रशासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार शहर विकास आराखडा तयार करण्यात आला आहे. सदर शहर विकास आराखड्याची अंमलबजावणी २०३१ सालापर्यंत करावयाची आहे. सदर शहर विकास आराखड्याचे सादरीकरण मा. मुख्यमंत्री यांचे अध्यक्षते खलील राज्य शासनाच्या सुकाणु समिती समोर मा. आयुक्त यांनी केलेले असुन त्यास सुकाणु समितीने तत्वता मान्य केले आहे. सदर शहर विकास आराखड्यात नमुद प्रकल्पा करिता केंद्र शासनाकडून ३५% खर्च महानगरपालिकेस करावयाचा आहे. सदर शहर विकास आराखड्यात खालील प्रकल्पांचा समावेश करण्यात आलेला असुन त्यांचे सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करून राज्यशासनाकडे मान्यतेकरिता पाठवावयाचे आहेत. भुमिगत गटार योजनेकामी तयार करण्यात आलेला DPR शासनाच्या सुकाणु समितीने मंजुर करून अंतिम मंजुरी करिता केंद्र शासनाकडे शिफारस करण्यात आलेले आहे. सदर शहर विकास आराखड्यात समावेश करण्यात आलेल्या प्रकल्पांचा तपशिल परिशिष्ट ''अ'' मध्ये जोडला आहे.

## परिशिष्ट ''अ''

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम (कोटी) |
|---|---|---|
| १. | राष्ट्रीय महामार्ग क्र. ८ वरील दहिसर चेकनाका ते काशीमिरा जंक्शन पर्यंत सर्व्हिस रोड व गटार बांधणे. | रु. १७.०० |
| २. | विकास आराखड्यातील रस्ते | रू. १००.०० |
| ३. | मिरा रोड स्थानकावर (पुर्व) / (प.) रस्ता जोडणारा उड्डाणपुल बांधणे. | रू. २४.५२ |
| ४. | सिमेंट कॉंक्रीट रोड | रू. ३०.०० |
| ५. | सुभाषचंद्र बोस मैदान ते उत्तन रस्त्याचे रुंदीकरण करून रस्ता पुर्नःपृष्ठीकरण करणे. | रू. ५५.७३ |
| ६. | रिंग रूट प्रकल्प | रू. ६९.०३ |
| ७. | जेसल पार्क येथे भुयारी मार्ग करणे व मिरा रोड भाईंदर दरम्यान रेल्वे ट्रॅक खाली चार क्लर्वट बांधणे. | रू. १३.०० |
| ८. | पोशीर धरणासाठी महानगरपालिकेने भरावयाची रक्कम. | रू. २७२.०० |
| ९. | बारवी / सुर्या / मोरबे उद्‌भवनातुन पाणी पुरवठा योजना. | रू. १००.०० |
| १०. | चेना नदी जवळ बंधारा बांधून उद्‌भव तयार करणे. | रू. ४०.०० |
| ११. | डिझास्टर मॅनेजमेंट अंतर्गत विविध कामे करणे. | रू. ३३.०० |

| | | |
|---|---|---|
| १२. | जलशुद्धीकरण व उद्‌भवापासून शहरापर्यंत उध्ववाहीणी टाकणे . | रू. ६०.०० |
| १३. | शहरातील वितरण व्यवस्थेचे मजबुती करण | रू. ८०.०० |
| १४. | भुयारी गटार योजना | रू. ३४३.०० |
| १५ | एकात्मिक नाले प्रकल्प | रू. २२२.२६ |
| १६ | घनकचरा प्रकल्प | रू. ७४.०० |
| १७ | काशिमिरा जंक्शन येथे उड्डाण पुल बांधणे | रू. १७.०० |
| १८. | बहूमजली वाहनतळ बांधणे. | रू. १.०० |
| १९. | बसस्थानके बांधणे. | रू. १.०० |
| २०. | वाहतुक नियोजन व सुधारणा (स्टीट्र फर्निचर इत्यादी) | रू. ६.०० |
| २१. | B.S.U.P. योजने अंतर्गत घरकुल बांधणे. | रू. ११.१० |
| २२. | कत्तलखना बांधणे | रू. ८.५२ |
| २३. | फिशिंग इंडस्ट्रीसाठी पायाभुत सुविधा | रू. ५०.०० |
| २४. | टाउन पार्क | रू. ७.०० |
| २५. | म्युनिसिपल हॉस्पीटल | रू. ६.०० |
| २६. | विश्रामगृह बांधणे | रू. ०.२५ |
| २७. | स्टेडियम बांधणे व गार्डन | रू. १९३.६० |
| २८. | टाउन हॉल व नाट्यमंदिर बांधणे. | रू. ५.०० |
| २९. | मिरा - भाईंदर महानरगपालिका क्षेत्रात मार्केट बांधणे. | रू. २.०० |
| ३०. | मैदाने विकसित करणे. | रू. १५.०० |
| ३१. | क्रिडा संकुल | रू. ५.०० |
| ३२ | कम्युनिटी हॉल | रू. २.०० |
| ३३ | जकात नाका व इमारत | रू. ८६.०६ |
| ३४ | वेलफेअर सेंटर | रू. ०.५० |
| ३५ | पुस्तकालय (वाचनालय) | रू. ०.५० |
| ३६. | अग्निशमन केंद्र उभारणे व यंत्र खरेदी | रु. ६.८० |
| ३७. | प्रभाग कार्यालय व हॉस्पीटल बांधणे | रू. २.२८ |
| ३८. | अर्बन गव्हरनर्सच्या निर्देशकनुसार प्रशासकिय कामकाज पद्धीतीसाठी. | रू. २५.०० |
| | **एकूण** | रु. १९२५.१७ |

वरील पैकी अ. क्र. ६,१४,२४,३७ या कामांना यापूर्वीच अनुक्रमे मा. महासभा दि. ५/०६/२००४ ठराव क्र. ०७ मा. महासभा दि. १८/१२/२००४ ठराव क्र. ५९ मा. महासभा दि. १८/०५/२००६ ठराव क्र. २१ मा. महासभा दि. १८/०५/२००५ ठराव क्र. २० मान्यता दिलेली आहे. प्रस्तावात नमूद सर्व कामे ही सन २०३१ पर्यंत टप्याटप्याने हाती घ्यावयाची आहेत. अ.क्र. ६,१४,२४,३७ ही कामे वगळून इतर कामांच्या खर्चास व प्रशासनाने तयार केलेल्या शहर विकास आराखडयास प्रशासकीय / आर्थिक मान्यता देण्यात येत आहे. तथापी मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्र मुंबई महानगरपालिकेलगत असल्याने मुंबई मधील कामानिमित्त येणारे सर्व मिरा-भाईंदर परिसरात वास्तव्यास आल्याने या शहराची लोकसंख्या ही सन १९९१ ते २००१ या कालावधीत सुमारे ३००% टक्क्यानी वाढलेली आहे. सदर शहरात झालेली लोकसंख्या वाढ व पुरविण्यात यावयाच्या नागरी सुविधाचा विचार करता या शहराकरिता तयार करण्यात आलेल्या शहर विकास आराखडयात नमुद कामाकरिता जवाहरलाल नेहरू अर्बन रिन्यूअल मिशन अंतर्गत प्रकल्पा खर्चापैकी केंद्र शासन व राज्य शासन कडून अनुक्रमे ३५% व १५% अनुदान मिळणार आहे. व ५०% खर्चाची रक्कम महापालिकेने उभी करावयाची आहे. या ऐवजी ८०% निधी केंद्र व राज्यसरकार कडून उपलब्ध करून देण्याकरिता एक खास बाब म्हणून राज्य सरकार मार्फत केंद्र सरकार कडे शिफारस करण्यास ही सभा मंजूरी देत आहे. केंद्र शासनाच्या JNNURM अंतर्गत आवश्यक असलेल्या Reforms ची यादी परिशिष्ट ''ब'' मध्ये जोडली आहे. सदर Reforms अंमलात आणण्यास व कंद्र शासन सोबत आवश्यक करारनामा करण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच सदर योजनेत समाविष्ठ करण्यात येणाऱ्या कामांकरिता शासनाच्या इतर योजनेतून किंवा कर्जातून, महानगरपालिका निधी उपलब्ध होत असल्यास सदर कामे त्यामधून हाती घेण्यात यावीत. सदरची बाब तातडीची असल्याने ठरावाची अंमलबजावणी इतिवृत्त मंजूर होण्या आधीच करणेत यावी.

**परिशिष्ठ ''ब''**

## Reforms Asssessment :- Mandatory Reforms

1. Double Entry accounting System
2. Adoption of public disclosure law
3. Passage of community participation law
4. All special agencies under one umbrella
5. formation of citizens technical advisory group
6. Planning functions to ULBS
7. Introduction of e-governances
8. Reforms of Property tax to improve the resources base of ULBS
9. Levy of Reasonable user charges

## Reforms Asssessment :- Optional Reforms

1. Revision of bye laws to stremline the approval process
2. Reservation of land for Housing for urban poor
3. Revision of bye law to make rain water harvesting mandatory
4. Bye - Laws to reuse of reclaimed water

**सुचक :- श्री. हॅरल बोर्जीस.** **अनुमोदन :- श्री. महेंद्रसिंग चौहान.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. ८७ चे वाचन केले.)

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलत आहे की, विषय क्र. ८७ ज्या वाहनांची या ठरावा बरोबर लिस्ट दिलेली आहे त्यामध्ये काही वाहन अजुनही चालू स्थितीमध्ये आहेत आणि अत्यावश्यक सेवेमध्ये ती कार्यरत आहेत. या ठरावाच्या मागे मी स्टँडींगला असताना असाच एक ठराव आला होता आणि माझ्या माहितीनुसार चालू असलेला ट्रॅक्टर संगनमताने ती विकली गेली. तो ट्रॅक्टर आता दुस-याच्या गाडीमध्ये आजही चांगल्या रितीने कार्यरत आहे. त्याचे नंबर आणि फोटोग्राफ देतो मी किंवा व्हिडीओ शुटींग लाईव्ह डेट व्हाईज आणून देतो. परिस्थिती अशी आहे की या चालू स्थितीतील गाड्या आणि आपण दिलेला गोषवारा तो आर.टी.ओ. ने आपल्याला परवानगी दिलेली आहे. पण ह्या गाड्या विकण्याच्या लायकीच्या आहेत. हे कुठल्या तज्ञाने सांगितले आहे. असो. यात उल्लेख नाही. टँकरचा उल्लेख येथे चालू आहे. एक नादुरुस्त आहे ती विकायला हरकत नाही. त्याच्यावरसुध्दा एक टँकर चार साडे साडेचार रुपये खर्च केलेला आहे. श्री. आर.डी. शिंदे साहेब असताना आणि या गाड्या बदलापुरवरुन रिपेअर करुन आणल्या होत्या. या गाड्यांमध्ये ज्या चालू आहेत त्या आता रुग्णवाहिका, शववाहिका, फिरता दवाखाना जिथंपर्यंत महानगरपालिकेच्या लोकवस्तीच्या हिशोबाने रिक्वायरमेन्ट नुसार नविन गाड्या कार्यरत होण्यासाठी आपल्याकडे रुजु होत नाही. आपल्या महानगरपालिकेच्या आस्थापनेमध्ये किंवा आपल्या महानगरपालिकेच्या सेवेमध्ये अशा गाड्या नविन येईपर्यंत या गाड्यांचा आपण निष्कर्षीत करु नये. त्या गाडया आहेत परमिशन दया तुम्ही ठराव घ्या. पण त्या गाडयांचा लगेच दुस-या दिवशी लिलाव करतील. आणि नंतर फिरता दवाखाना परिवहनमध्ये चालतोय मिनी बस म्हणून ही पॉसिबिलीटी आहे. त्याकरिता इथे नविन गाडी आली की, मग त्या गाडया सेवेतून कमी कराव्यात असे मला वाटते. कारण, मागच्या वेळेला या फिरत्या दवाखान्याचा आपल्या जे.ई. ने रिपोर्ट तयार केला होता. आपल्याकडे जे मेकॅनिकल ऑटो मोबाईल इंजिनियर आणलेले आहेत तर तो रिपोर्ट ॲक्च्युअली साफ खोटा म्हणजे सन्मा. रणखांब साहेबांनी जाउन तो दवाखाना बघितला ५० हजार रुपये खर्च करुन तो दवाखाना दिड वर्ष चालला. अगदी चांगली व्यवस्थित सेवा तर ह्या गाडया दुस-या नविन गाडया येई पर्यंत सेवेतून कमी करु नये. ठराव करा मंजूरी देउन ठेवा. अशी माझी आपल्याला सुचना आहे आणि अत्यावश्यक सेवेतील गाडया आहेत. पाणी टँकर आपल्याला मी एक सुचना दिलेली आहे की, विहीरीतून ज्या टँकरमध्ये पाणी येत त्या टँकरने सप्लाय करायला सुरूवात करा. तर ह्या गाडयांचा आपण विचार करावा रुग्णवाहीका ही जी १०

हजार रुपयाची नादुरुस्त दिलेली आहे तिचा भुगा झालेला आहे. १० हजार रुपये काय कोणी त्या रुग्णवाहीकेचे १ हजार रुपये सुदधा देणार नाही आणि ही रुग्णवाहीका आजच्या तारखेला आपल्या ताब्यात देखील नाही ती अक्षरशः भुगा होउन गेलेली आहे ती आपल्या लिस्टला त्याचे १० हजार रूपये दाखविले जात आहेत. जरा या लिस्टच पुन्हा अवलोकन करा. ज्या गाडया जाण्यासारख्या असतील नादुरूस्त बंद आहेत त्या विकायला आमची हरकत नाही. परत एकदा तुम्हाला मी विनंती करतो आहे की, आपल्या अत्यावश्यक सेवेतील गाडया सोडून बाकीचा आपण लिलाव करावा. अत्यावश्यक सेवेच्या गाडया आल्यावर मग या गाडया काढाव्यात. धन्यवाद.

**रोहिदास पाटील :-**

मा. महापौर मॅडम, आपण हे आमच्या समोर माहिती साठी कागद दिलेले आहे. तुम्ही हे वाचलेलं असणारच याच्यात ज्या गाडया नादुरुस्त किंवा जुन्या झाल्यात म्हणून त्या विकायच्या आहेत त्यांची विल्हेवाट लावायची आहे. आपण काय लिहले आहे की, दि. १९/१/२००६ अन्वये प्रादेशिक परिवहन अधिकारी ठाणे यांना विनंती केली होती. त्यानुसार त्यांनी वाहनाची तपासणी करुन बाजार भावाप्रमाणे प्रत्येक वाहनाची किंमत व यांत्रिक स्थिती या बाबत दि. ३१/१२/२००५ रोजी अहवाल सादर केला आहे. म्हणजे आपण विनंती कधी केली? त्यांनी अहवाल कधी दिला. आधी अहवाल की, दिला नंतर विनंती केली. विनंती केल्यानंतर अहवाल दिला. त्याच्यामागे तुम्ही तक्ता लावला आहे. ह्याच्यात दिले आहे की, दि. ३१/१२/२००५ रोजी आर.टी.ओ. अहवालानुसार वाहनांची किंमत, आता १ वर्षानंतर आपण विकायला गाडया काढल्यात तर नक्की काय? हीच किंमत मिळणार आहे की, वाढीव किंमत मिळणार आहे की, आता कमी किंमत होणार आहे काय आहे? सभागृहाला कागद देते वेळी त्याच्यात बघा ना आपण विनंती करता दि. १९/१/२००६ ला.

**मा. आयुक्त :-**

सन २००५ ला त्यांच्याकडून जो अहवाल आला आहे. त्याच्याप्रमाणे कार्यवाही लगेच व्हायला पाहिजे होती किंवा लिलाव आक्षेप व्हायला पाहिजे होता तसे झाले नाही.

**रोहिदास पाटील :-**

नाही. तुम्ही कळवले दि. १९/१/२००६ ला. मी तुम्हाला वाचून दाखवतो.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आपण कळवले नाही.

**रोहिदास पाटील :-**

१० वर्ष पूर्ण झालेली व निरुपयोगी झालेली वाहने निर्लेखित करुन लिलावाव्दारे विक्री करण्याबाबत एकूण २५ वाहनांची तपासणी करुन त्यांची स्थिती व किंमत ठरवून देण्याबाबत जावक क्र. म.न.पा. वाहन ३४७,२००५-२००६ दिनांक १९/१/२००६ ह्याला आपण विनंती केली आणि त्याने त्याच्या आधीच आपल्याला उत्तर दिलेले आहे दि. ३१/५/०५ ला. तिथे पण खाली लिहा, चूक भूल दयावी घ्यावी.

**दादासाहेब खेत्रे :-**

सन्मा. महापौरांच्या परवानगीने बोलत आहे की, प्र. जा जावक क्रमांक १४९/११८७/२००५-२००६ दि. २४/८/२००५ महानगरपालिकेने मा. प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्याला पत्र लिहले होतं. त्या अनुषंगाने आपण त्यांचा रेफरन्स मागितला होता तो दि. ३१/१२/०५ ला आपल्याला प्राप्त झाला.

**रोहीदास पाटील :-**

हे पहिलं आहे ते चुकलं आहे का? १९/१/२००६ हे चुकलेलं आहे का? त्याचा जावक नंबरही चुकलेला आहे का? कोणताही नंबर बघितला गेला नाही. त्यावर कोणत्या मा. आयुक्तांनी सही केलेली आहे? तर ते मा. उपायुक्त कोण? साहेब, यावर कोणाची सही आहे. मा. खतगांवकर साहेब, त्यांनी सगळं समेट घडवून सह्या करतात का? त्यांनी परिवहनच पत्र का बघितलं नाही? तेच पान क्रमांक आहे का तिचं संख्या आहे का? तेच रुपये आहेत का? आम्ही तुमच्यावर किती विश्वास ठेवायचा हे तुम्ही सांगा ना.

**शिवप्रकाश भुदेका :-**

सन्मा. खेत्रे साहेब, वो जो गाडी लिस्ट दिया है, वो गाडी तो है ना, या बिक गई?

**हॅरल बोर्जीस :-**

सभागृहाला विनंती करतो की, प्रकरण क्र. ८७ जो गोषवारा प्रशासनातर्फे आलेला आहे. त्यामध्ये जा.क्र. मनपा/वाहन-३४७ च्या जागी १४९ दि. २४/८/०५ प्रशासनामार्फत प्रादेशिक परिवहन अधिका-यांना २४ ऑगस्ट ०५ ला पत्र दिलेले होते. ठराव महानगरपालिकेने १० वर्षे पुर्ण झालेले...

**रोहिदास पाटील :-**

मा. सभागृह नेते, आपण आम्हाला याबाबत माहिती घेउ दया.

**दादासाहेब खेत्रे :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलत आहे की, सन्मा. सभासदांना मी अशी माहिती देवू इच्छितो की, एकूण २५ निर्लेखित वाहनांपैकी नादुरूस्त वाहन एकूण १६ आहेत. त्या १६ वाहनांपैकी त्याच्यामध्ये चालू स्थितीमध्ये ९ वाहने आहेत.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

पोझिशन क्या है? यह कहा पर है?

**रोहिदास पाटील :-**

आपले टँकर रेकॉर्डवर येतात एक आणि आपले सन्मा. सदस्य रतन पाटील यांनी चार टँकर नंबरसहीत वेगवेगळ्या कलरचे चार फोटो दिले होते त्याचे कोणीही उत्तर देउ शकले नाही. आपण या विषयावर एवढी घाई करु नका. ज्या गाडया आहेत त्याची माहिती नाही. कारण त्यांना आपण ऑफिस दिले, असिस्टंट दिले. सगळं दिले. त्यांना त्यांच्या कर्तव्याची जर जाणीव होत नसेल व त्यांचे मनोबल वाढत नसेल तर हे महानगरपालिकेचे दुर्देव आहे.

**दादासाहेब खेत्रे :-**

त्या ९ वाहनामध्ये ४ जीप आहेत, १ रुग्णवाहीका आहे, १ शववाहीनी आहे, १ फिरता दवाखाना आहे, २ टँकर आहेत. ज्या ४ जीप चालू आहेत. इतर १६ वाहने आहेत. ९ वाहने सोडून सर, ती वाहने अगदी जीर्ण अवस्थेत पडलेली आहेत. मी तुम्हाला सांगतो, ती वाहने कुठे आहेत ते सांगतो. कॉन्टेसा ही गाडी ठाणा कलेक्टर ऑफीसला आहे. १ जीप हेड ऑफीसला आहे. दुसरी जीप फायर बिग्रेड ऑफीसला आहे. तिसरी जीपला हेडऑफीसला आहे. चौथी जीप हेड ऑफीसला आहे, पाचवी जीप हेडऑफीसला आहे. सहावी जीप ओव्हरब्रीजच्या खाली आहे. मारुती जिप्सी ओव्हर ब्रिजच्या खाली आहे. रूग्णवाहीका हेड ऑफीसला आहे शववाहिका हेड ऑफिसला आहे. फिरता दवाखाना हेड ऑफीसमध्ये आहे. फायर फायटर फायर ब्रिगेडमध्येच आहेत. धूर फवारणी गाडी हेडऑफिसच्याच पाठीमागे लावलेली आहे. पाण्याचा एक टँकर फाटकच्या एक टाकीवर आहे. दुसरा पाण्याचा टँकर फायर बिग्रेडमध्ये आहे. तो परत पाण्याचा टँकर फायर बिग्रेडमध्ये आहे. डोझर हा ओव्हरब्रीजच्या खाली आहे. ट्रक्टर ओव्हरब्रीजच्या खाली आहे. दुसरा ट्रक्टर हेडऑफीसला आहे. एक ट्रक्टर पुन्हा हेडऑफीसला आहे. ट्रक्टर ओव्हरब्रीजच्या खाली आहे. तो पण ओव्हरब्रीजच्या खाली आहे. रुग्णवाहीका ओव्हरब्रीजच्या खाली आहे.

**प्रकाश दुबोले :-**

ही कधीची पोझिशन?

**दादासाहेब खेत्रे :-**

आताची. मी सन्मा. सदस्यांना विनंती करतो, आपण जर मला वेळ दिला तर मी ते सर्वांना दाखवतो.

**प्रकाश दुबोले :-**

साहेब, फिरता दवाखाना ओव्हरब्रीज खाली पडलेला आहे. हे सांगतात की, तो फिरता दवाखाना महानगरपालिकेच्या हेडऑफीसमध्ये आहे.

**लिओ कोलासो :-**

मा. महापौर साहेब, आम्हाला एकतरी शब्द बोलू दया.

**मिलन म्हात्रे :-**

आम्ही ती ताब्यात घेतली.

**प्रकाश दुबोले :-**

आपले हेडऑफीस गोडाउन नाही. सगळ्या गाडया येथे पडलेल्या आहेत हे सांगायला.

**मिलन म्हात्रे :-**

आणि एक ॲम्बेसिटर गाडी ही आम्ही तुमच्याकडून ताब्यात घेतली.

**शुभांगी नाईक :-**

गोदाम केलेले आहे.

**प्रकाश दुबोले :-**

तुम्ही येथे हेडऑफीसला कुठे दाखविलेले आहे?

**मिलन म्हात्रे :-**

कॉन्टेसा आपल्या ताब्यामध्ये आहे.

**दादासाहेब खेत्रे :-**

काही गाडया....

**प्रकाश दुबोले :-**

फिरते दवाखाने ओव्हरब्रीजच्या खाली पडलेले आहे आणि आपण सांगता की हेडऑफीसला आहे.

**मिलन म्हात्रे :-**

आम्हाला ना.भा.पाटील साहेबांचे आम्हाला पत्र आलेले आहे. महाराष्ट्र राज्य शासनाचे की, तुम्हांलाही गाडी ताब्यात घेण्यासाठी जिल्हाधिका-यांना आदेश दिलेला आहे. त्याची जरा कागद वाचा आणि मगच उत्तरे दया. काहीतरी आपले विचित्र बडबड करायचे.

**लिओ कोलासो :-**

मा. महापौर साहेबा, मला या विषयावर बोलू दया.

**मिलन म्हात्रे :-**

आता तुमची खटारा गाडी कोणी घेणार नाही? आता तुमच्याकडे गाडीची वाट लावून दिली आहे.

**लिओ कोलासो :-**

मा. महापौर साहेबा, सन्मा. विरोधी पक्षाच्या सदस्यांनी या ठिकाणी वाहनाच्या स्थितीबद्दल म्हणजे वेस्ट अबाउट बद्दल प्रश्न विचारले आहेत आणि अशा प्रकारची गोंधळवाणी परिस्थिती निर्माण करत आहेत की ही वाहने जागेवरतीच नाही, ती कुठे हरवलेली आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

आम्ही निर्माण करीत नाही, परिस्थितीच तीच आहे.

**लिओ कोलासो :-**

मा. महापौर साहेबा, जे अधिकारी उत्तर देत आहेत. त्यांनी खरोखरच चांगल्या पद्धतीने उत्तर दिलेली आहेत. वाहनाची स्थिती...

**प्रकाश दुबोले :-**

त्या विरोधात आपलेच नगरसेवक सन्मा. प्रकाश दुबोले ह्यांनी सांगितलेले आहे. फिरता दवाखाना ब्रीजच्या खाली आहे.

**लिओ कोलासो :-**

संबंधांचा इथे काहीही प्रश्न नाही. या ठिकाणी या वस्तूस्थितीचा प्रश्न आहे. मा. महापौर मॅडम, हा अधिकारी जर खरं सांगत नसेल तर त्याला शिक्षा करा. पण तो जे सांगत आहे त्याची कोणीतरी खातर जमा करून बोलायला पाहिजे. जेव्हा अधिकारी बोलतात ही वस्तू या ठिकाणी आहे, सन्मा. विरोधी पक्षांनी सांगायचं की तिथे नाही आम्ही त्यांना आव्हान देतो. हे आव्हान आम्ही सत्ताधारी पक्ष म्हणून स्विकारायला तयार आहोत.

**हॅरल बोर्जीस :-**

संबंधित अधिका-यांनी त्याच्या पलिकडे जाउन वक्तव्य केलेले आहे की, जर मला वेळ दिली की, सन्मा. सदस्यांना वाहन दाखवितो.

**रोहिदास पाटील :-**

साहेब, तुम्ही थोडे कष्ट करा आणि तिथे जाउन या. त्या कंपाउंन्डमध्ये किती गाडया आहेत त्या मोजा.

**लिओ कोलासो :-**

मग आपण बोला. त्या ठिकाणी चार ट्रक्टर किंवा चार जीप नाही. आम्ही त्यांना आव्हान देतो, आम्ही येतो पंचनाम्याला.

**रोहिदास पाटील :-**

सर, मी तुम्हाला हकीकत सांगतो. सन्मा. मॅडम, तुम्ही स्टॅंडींगमध्ये होत्या. सन्मा. रतन पाटील यांनी ४ फोटो दाखविले. चारही फोटोमध्ये चार अलग नंबर होते. आपला अधिकारी सांगतो की एकच टॅंकर आहे. तीन टॅंकर आहेत, फोटो दाखविले त्यांनी. ती स्थिती आम्ही संागतो आहोत. मास्तरांनी काही टॅंकर नेलेत असे सांगतो आहे का मी?

**लिओ कोलासो :-**

मॅडम, मी तुम्हाला सांगतो आहे की, आम्हाला एक धडा होता की, सांड की निशानी. एका माणसाने सांगितलं होतं की त्याच्या दाराजवळ रात्री बैल बसला होता म्हणून तेच घरं त्याच आहे. परंतु, तो बैल सकाळी उठून दूस-या ठिकाणी गेला. तर ते त्याचं घरं तिथे गेले का? तर नाही. हे असे आहे. ही वाहनं कुठं-कुठं जातील त्याचा आपल्याला पत्ता काय आहे का?

**रोहिदास पाटील :-**

आपण जिकडे फिरतो तिकडे वाहन जाते.

**रतन पाटील :-**

त्या बैलाला तिकडे कुणीतरी नेले असेल ना. त्याचा कोणीतरी मालक आला असेल आणि त्या बैलाला तिकडे नेला असेल. हे पण विचारात घ्या.

**रोहिदास पाटील :-**

सन्मा. सदस्य चालत्या बैलाबद्दल बोलले.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सध्या जी चालू स्थिती आहे आणि त्याची १५ हजार रूपये व्हॅल्यू तुम्ही धरलेली आहे. जर चार टायर विकले तर त्याचेही १५ हजार रूपये येतील तर त्याची व्हॅल्यू कशी धरली? १५ हजार रूपयाचे टायर विकले तरी १५ हजार रूपये येतील.

**हॅरल बोर्जीस :-**

सन्मा. सदस्य ओमप्रकाशजी ३१ डिसेंबर, २००५ की यह किंमत है आजकी किंमत के हिसाब से और डिप्रेसिएशन की हिसाब से उसकी किंमत कम आएगी।

**रतन पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो आहे, माझी सुचना आहे.

**रोहिदास पाटील :-**

नवीन किंमतीने देणार आहात की, जुन्या किंमतीने देणार आहात ज्याने महानगरपालिकेचा फायदा होईल.

**रतन पाटील :-**

सन्मा. सभागृह नेते साहेब, एक सुचना अशी आहे की, सदरची चालू वाहन असे ह्यामध्ये दिलेलं आहे. ती जर महानगरपालिकेच्या याच्यामध्ये वापरायला मिळत असतील तर घ्या. आपण भाडयाने गाडया घेत आहोत. जर आपल्या वापरात असतील तर वापरायला घ्याव्यात.

**हॅरल बोर्जीस :-**

प्रकरण क्र. ८७ चा सभागृहासमोर ठराव मांडला.

**सुर्यकांत भोईर :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

ठराव मंजूर.

**प्रकरण क्र. ८७ :-**

महानगरपालिकेची १० वर्षे पुर्ण झालेली व निरूपयोगी वाहने निर्लेखित करून लिलावाद्वारे विक्री करणे बाबत.

**ठराव क्र. ६६ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेकडे एकुण ७४ वाहने असुन एकुण वाहनांपैकी २५ वाहनांना १० वर्षापेक्षा जास्त कालावधी झाला असुन सदर वाहने जुनी व नादुरूस्त झाली आहेत. सदरची वाहने निर्लेखित करणेबाबत शासन निर्णय वित्त विभाग क्र. विअप्र-१०९१/प्र.क्र. १२/विनियम, दि. १ ऑक्टोबर १९९१ नुसार अटीबाबत मार्गदर्शन केलेले आहे. एकूण २५ वाहनापैकी १५ वाहाने कायम स्वरुपी बंद असुन ९ वाहाने हे चालु स्थितीत आहेत. चालु स्थितीतील वाहानांचा दुरुस्ती व इंधन खर्च हा इतर वाहानांच्या दुरुस्ती व इंधन खर्चापेक्षा जास्त होत असुन सदर स्थितीत ही वाहने वापरणे योग्य नाही कारण ही वाहने वारंवार दुरुस्ती करुन ती परत नादुरूस्त होतात. त्यामुळे सदरची वाहने मनपाच्या आर्थिक दृष्टया किफायतशिर नसल्याने ते निर्लेखित करणे योग्य होईल.

१० वर्षे पुर्ण झालेली व निरूपयोगी झालेली वाहने निर्लेखित करून लिलावाद्वारे विक्री करणेबाबत एकुण २५ वाहनांची तपासणी करून त्यांची स्थिती व किंमत ठरवुन देणेबाबत जा.क्र. मनपा/वाहन/१४९/२००५-०६ दि. २४-०८-२००५ अन्वये मा. प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे यांना विनंती केली होती. त्यानुसार त्यांनी वाहनांची तपासणी करून बाजारभावाप्रमाणे प्रत्येक वाहानाची किंमत व यांत्रिक स्थिती याबाबत दि. ३१/१२/२००५ रोजी अहवाल सादर केलेले आहते. मा. प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे यांचे व्हॅल्युएशन नुसार तसेच मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ७९ (क.) प्रमाणे कार्यवाही करुन खालीलप्रमाणे वाहने निर्लेखित करावी व उड्डाणपुलाखाली पडुन असलेले भंगार याची लिलावाद्वारे विक्री करण्यास ही सभा मंजुरी देत आहे असा मी ठराव मांडतो.

**निर्लेखित करावयाचा वाहनांचा तपशिल**

| अ. क्र. | वाहनाचा प्रकार | वाहनाची खरेदी दिनांक | वाहनाची क्र. | वाहनांस झालेला कालावधी | दि.३१-१२-२००५ रोजी आर.टी.ओ. अहवालानुसार वाहनाची किंमत | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | कॉन्टेसा | १५/०९/१९९४ | MH-04-AN-4401 | १२ वर्षे | २०,०००/- | नादुरुस्त बंद |
| २ | जीप | ०१/१२/१९९२ | MH-04-A-7858 | १४ वर्षे ८ महिने | ३०,०००/- | चालु स्थितीत |
| ३ | जीप | ०९/०३/१९९२ | MH-04-Q-28 | १४ वर्षे ६ महिने | २०,०००/- | नादुरुस्त बंद |
| ४ | जीप | ०९/०३/१९९३ | MH-04-Q-29 | १३ वर्षे ६ महिने | १५,०००/- | चालु स्थितीत |
| ५ | जीप | ०१/१२/१९९४ | MH-04-Q-2103 | १२ वर्षे ८ महिने | १५,०००/- | चालु स्थितीत |
| ६ | जीप | ०१/१२/१९९४ | MH-04-Q-2107 | १२ वर्षे ८ महिने | २८,०००/- | चालु स्थितीत |
| ७ | जीप | २९/१२/१९८८ | MGR-9600 | १७ वर्षे ९ महिने | ५,०००/- | नादुरुस्त बंद |
| ८ | मारुती जिप्सी | ०३/०५/१९९० | MH-04-A-2455 | १६ वर्षे ४ महिने | ५,०००/- | नादुरुस्त बंद |
| ९ | रूग्णवाहिका | १२/०४/१९९४ | MH-04-H-124 | १२ वर्षे ५ महिने | ३०,०००/- | चालु स्थितीत |
| १० | शववाहिका | २५/०९/१९९५ | MH-04-H-8301 | ११ वर्षे | १,५०,०००/- | चालु स्थितीत |
| ११ | फिरता दवाखाना | ३१/०३/१९९३ | MH-04-H-108 | १३ वर्षे ६ महिने | १,७५,०००/- | चालु स्थितीत |
| १२ | फायर फायटर | २७/०४/१९८७ | MCY-598 | १९ वर्षे ५ महिने | १,५०,०००/- | नादुरुस्त बंद |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १३ | धुर/दवा फवारणी व्हॅन | २७/०७/१९८७ | MH-04-S-5746 | १९ वर्षे २ महिने | ५०,०००/- | नादुरुस्त बंद |
| १४ | पाणी टँकर | ३१/०३/१९९३ | MH-04-P-2392 | १३ वर्षे ६ महिने | ६०,०००/- | नादुरूस्त बंद |
| १५ | पाणी टँकर | ३१/०३/१९९३ | MH-04-P-2394 | १३ वर्षे ६ महिने | १,५०,०००/- | चालु स्थितीत |
| १६ | पाणी टँकर | १४/०२/१९९५ | MH-04-P-2396 | ११ वर्षे ७ महिने | १,५०,०००/- | चालु स्थितीत |
| १७ | डोझर | ०१/०३/१९९३ | MH-04-B-388 | १३ वर्षे ६ महिने | २०,०००/- | नादुरुस्त बंद |
| १८ | ट्रॅक्टर | ०१/०३/१९९३ | MH-04-B-248 | १३ वर्षे ६ महिने | १५,०००/- | नादुरुस्त बंद |
| १९ | ट्रॅक्टर | ०१/०३/१९९३ | MH-04-B-249 | १३ वर्षे ६ महिने | १५,०००/- | नादुरुस्त बंद |
| २० | ट्रॅक्टर | १२/०९/१९९२ | MH-04-B-250 | १४ वर्षे | २२,०००/- | नादुरुस्त बंद |
| २१ | ट्रॅक्टर | १२/०९/१९९२ | MH-04-B-225 | १४ वर्षे | २२,०००/- | नादुरुस्त बंद |
| २२ | ट्रॅक्टर | २०/०२/१९८७ | MH-04-B-226 | १९ वर्षे ७ महिने | १५,०००/- | नादुरुस्त बंद |
| २३ | ट्रॅक्टर | २०/०२/१९८७ | MGR-3974 | १९ वर्षे ७ महिने | ५,०००/- | नादुरुस्त बंद |
| २४ | ट्रॅक्टर | ०९/०२/१९८८ | MGR-7488 | १८ वर्षे ७ महिने | ५,०००/- | नादुरुस्त बंद |
| २५ | रूग्णवाहिका (मॅटॅडोर) | २४/१२/१९८२ | MCY-5431 | २४ वर्षे ७ महिने | १०,०००/- | नादुरुस्त बंद |

**सुचक :- श्री. हॅरल बोर्जीस.** **अनुमोदन :- श्री. सुर्यकांत भोईर.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, जे मागच्या सभेमध्ये 'ज' प्रस्ताव होते तर आपण सांगितले की, सभागृहामध्ये गोषवारा सहीत आणणार आहेत. एक महिना झाला. मागच्या वेळेला दिलेला प्रस्ताव अजूनही आला नाही. आपण रुलिंग केले की, त्यांना गोषवा-यासहीत सभागृहामध्ये आणू ते आलेलं नाही म्हणून आम्ही....

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सभागृहाला मी माहिती देत आहे की, जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुर्ननिर्माण अभियान एकात्मीक गृह निर्माण व झोपडपट्टी विकास अभियाना अंतर्गत राज्यस्तरीय समन्वय समिती व सुकानू समिती अधिकरणाची नियुक्ती केंद्र सरकारने आपल्याकडे जवाहरलाल नेहरु नागरी पुर्ननिर्माण अभियान या अंतर्गत एकात्मिक गृह निर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम जाहीर केलेला आहे आणि त्या संदर्भामध्ये एक मिटींग मागच्या सोमवारी पुण्याला झाली होती आणि त्या पुण्याच्या मिटींगमध्ये मी स्वतः हजर होतो. शासनाच्या या बाबतीमध्ये सुचना आहेत की, ह्या महानगरपालिका क्षेत्रामध्ये ज्या ज्या ठिकाणी झोपडपट्टया आहेत त्या त्या ठिकाणी एक डी.पी.आर तयार करायचा आहे आणि डी.पी.आर सुकानू समितीला सादर करायचा आहे. सुकानू समितीची बैठक ही १८ तारखेला मा. मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात बोलवलेली आहे. तर त्या संदर्भामध्ये आपण आपल्या महानगरपालिकेच्या एक ५ ठिकाणचा प्रस्ताव तयार केला आहे. तो सभागृहाच्या माहितीसाठी सांगतो. बंदरवाडी स्मशानभूमी जवळ भाईंदर पूर्व ही खाजगी जागा आहे तर त्याचा सर्व्हे क्रमांक १५३ आहे. त्याठिकाणी १२८ झोपडया आहेत. त्यातील लोकसंख्या ३६९ आहे आणि जागेचे क्षेत्र हे जवळ-जवळ २००० चौरस मिटरचे आहे. इंदिरानगर कोठार, भाईंदर पूर्व ह्या ठिकाणची जी झोपडपट्टी आहे ती खाजगी जागेवर आहे. त्याचा सर्व्हे नंबर ३९(अ) आहे. एकुण झोपडयांची संख्या २१३ आहे. लोकसंख्या त्याची ८५० आहे आणि त्याचे क्षेत्र हे ३६९० चौरस मीटर आहे. काशीची झोपडपट्टी ही खाजगी जागा आहे. सर्व्हे क्रमांक त्याचा ७६,७७,७८ असा आहे. एकूण झोपडयांची संख्या त्याठिकाणी २८३ आहे. लोकसंख्या ३४९ आहे आणि त्याचे क्षेत्र हे १२११० चौरस मीटर आहे. काशी विभाग, काशी गाव, गावठण खाजगी क्षेत्र आहे. त्याचा सर्व्हे नंबर ९१,९५,७६ एकूण झोपडयांची संख्या ३५ आहे. लोकसंख्या ४२० आहे आणि जागेचे क्षेत्र हे ६६,७७० चौरस मीटर आहे. सेना नगर गोडदेव स्मशानभूमीच्या बाजूला या ठिकाणची जी झोपडपट्टी आहे ती खाजगी आहे. त्याचा सर्व्हे नंबर २१७ आहे एकूण झोपडया ४० आहेत. त्याची लोकसंख्या २५२ आहे आणि त्याचं क्षेत्र हे १०८५ असे आहे. ५ ठिकाणच्या ह्या झोपडपट्टयाच्या बाबतीमध्ये आपण डिटेल रिपोर्ट तयार करीत आहोत आणि तो १८ तारखेला टेनटिटीव्ह सादर करीत आहोत. तिथे डिटेल सिस्टीमेट्स आणि जे काय आहे ते आपण काय आहे ते आपण नंतर तयार करणार आहोत. या संदर्भामध्ये केंद्र सरकार कडून आपल्याला साधारण २५.०३० मीटरचा घर अपेक्षित आहे. म्हणजे साधारण २७० चौरस फुटा पर्यंतच घर आहे. त्याच्यासाठी जो काही खर्च अपेक्षित आहे त्या खर्चापैकी केंद्र

सरकारकडून आपल्याला ८०% रक्कम मिळणार आहे. १०% रक्कम ही स्थानिक स्वराज्य संस्थेने म्हणजे आपल्या महानगरपालिकेने त्याच्यामध्ये टाकायची आहे आणि १०% रक्कम ही बेनिफिशिअर्स आहेत त्यांनी ती उभी करायची आहे. अशा प्रकारची ही एक नविनच योजना आलेली आहे आणि मा. मुख्यमंत्र्याच्या अध्यक्षतेखाली जी सुकाणू समिती आहे. त्याच्यामध्ये आपल्या मिरा-भाईंदरचं नाव आपण त्याच्यात इनक्ल्युड केलेले आहे. अजेंडयावर आपले नाव आहे आणि हे जे ५ ठिकाणी मी आपल्याला सांगितले त्या ठिकाणचे प्रस्ताव आपण १८ तारखेला मिटींग मध्ये आपण सादर करणार आहोत.

**रोहिदास पाटील :-**

साहेब, यामध्ये आपण इंदिरा नगर का घेतले नाही?

**मा. आयुक्त :-**

ही जी ५ ठिकाण आपण जी निश्चित केलेली आहेत.

**रोहिदास पाटील :-**

सहावे का नाही केले?

**मा. आयुक्त :-**

सांगतो. एकूण आपल्याकडे जी झोपडपट्टीचे ठिकाण आहेत ती जवळ-जवळ एकूण ३५ ठिकाणे आहेत. ज्या-ज्या ठिकाणी केंद्र सरकारची जागा आहे. ज्या ज्या ठिकाणी सी.आर.झेड आहे. त्या बाबतीमध्ये आपण आता लगेच घेतलेले नाही. जे आपल्याला एकदम क्लिअर करता येईल किंवा क्लिअर झोपडपट्टी ज्या ठिकाणी आहे. ती झोपडपट्टी विनासहाय आपल्याला आपण जो प्रस्ताव सादर केला तो आपला प्रस्ताव मंजूर होणार अशी खात्री आहे. म्हणून आपण या ५ ठिकाणबोध प्रस्ताव राज्य सरकारला सादर करीत आहोत.

**रोहिदास पाटील :-**

साहेब, मग त्यामध्ये जनता नगर का घेतलं नाही? ती शासकीय जमिन आहे. ९५ क्लिअर कट आहे आणि सी.आर.झेड ने बाधित ही नाही.

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलत आहे. त्याच्यामध्ये डॉ. आंबेडकर नगर, भोलानगर हे ही घेतलेले नाही.

**रोहिदास पाटील :-**

तिथे सी.आर.झेड नाही. जागा टायटल क्लिअर आहे. काशी मध्ये आपण काशी गाव का घेतले. त्याच्यामध्ये एक उल्लेख आला नाही की, राजेंद्र प्रसाद यांनी घरकूल केले होतं. तो सर्व्हे नंबर कोणता? त्याचा सर्व्हे नंबर टायटल क्लिअर आहे. त्याला काही त्याला अडचण नाही.

**आसिफ शेख :-**

आमच्या प्रभागामध्ये ही क्लिअर आहेत.

**मा. आयुक्त :-**

या ठिकाणी कुठल्याही प्रकारची लिटीकेशन नाही. म्हणजे उदा. सी.आर.झेड असेल किंवा केंद्र सरकारच्या जागेवरती झोपडपट्टया असतील तर केंद्र सरकारची आपल्याला एन्.ओ.सी. लागते. नंतर आपण प्रयत्न करणार आहोत. परंतु, आज आपल्याला जेवढे क्लिअर आहे. एकदम क्लिअर झोपडपट्टया आहेत. त्याचा प्रस्ताव आपण सादर करीत आहोत.

**रोहिदास पाटील :-**

साहेब, ही महाराष्ट्र शासनाची जागा आहे. त्याला कोणतीच अडचण नाही. तुम्ही जी सुचना केली. ती महाराष्ट्र शासनाची जागा आहे व त्याला कोणतीही अडचण नाही.

**आसिफ शेख :-**

नेहरु नगर लाल बहादुर शास्त्री नगर केंद्र सरकारच्या जागेवर आहे. सॉल्ट डिपार्टमेंट केद्र सरकारचे आहे.

**मा. आयुक्त :-**

मी सन्मा. सभागृहाला निर्देशित केलेले आहे की, ज्या ठिकाणी एकदम क्लिअर असेल म्हणजे केंद्र सरकारच्या जागा सोडून त्याचप्रमाणे सी.आर.झेड मधील किंवा खाजगी जागेवर असेल किंवा महाराष्ट्र शासनाची जागा असेल किंवा राज्य शासनाची जागा असेल तर त्याला....

**आसिफ शेख :-**

त्याला सी.आर.झेड आहे ना.

**मा. आयुक्त :-**

सी.आर.झेड च्या बाबतीमध्ये डिटेल सांगतो.

**आसिफ शेख :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो की, काशी मिरा पोलिस स्टेशनच्या बाजूला जे डोंगर आहे ते क्लिअर आहे. तसेच, निलकमलच्या मागे जी झोपडपट्टी आहे....

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

काशी, गावठण चा आपण उल्लेख केला आहे. तो का? काशीचर्च म्हणाले आणि काशी, गावठण.

**आसिफ पटेल :-**

मा. आयुक्त साहेब, सन्मा. सदस्या हे जनता नगर बोलतात आणि मी वेगळं बोलत आहे.

**आसिफ शेख :-**

साहेब, आमच्या येथे ही झोपडपट्टीचा भाग आहे.

**आसिफ पटेल :-**

काशिमिरा पोलिस स्टेशनच्या मागे जे डोंगर आहे. ती शासकीय जागा आहे. कलेक्टर लॅन्ड आहे.

**आसिफ शेख :-**

साहेब कलेक्टर लॅन्ड आहे.

**आसिफ पटेल :-**

आपण ती जागा देखिल इन्क्लूड करा नंतर आपण पाठपुरावा करु. नंतर मग परत त्रास होईल.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

सरकारी जागेचे सातबाऱ्याचे उतारे आहेत.

**आसिफ पटेल :-**

वाटल्यास आम्ही आपल्याला सातबाऱ्याचे उतारे पुरवू. पण तुम्ही त्याच्यामध्ये इन्क्लूड करा.

**मा. आयुक्त :-**

आपण आमच्याकडे ते द्या.

**आसिफ पटेल :-**

आम्ही आपल्याला उतारा देतो. उद्या उतारा देता.

**मा. आयुक्त :-**

आजच उत्तर द्या.

**आसिफ पटेल :-**

होय. आजच उतारा देतो. धन्यवाद.

**आसिफ शेख :-**

मा. आयुक्त साहेब, नेहरु नगर आणि अण्णा नगर हे कलेक्टरच्या जागेवर आहेत. ते क्लिअरकट आहेत. तेही इन्क्लूड करावे. सातबाऱ्याचे ही आपल्याकडे उतारे आहेत.

**लिओ कोलासो :-**

सर, आमच्या उत्तनला सर्व्हे नंबर ३४९ ही सरकारी जागा आहे. महसूल खात्याची जागा आहे आणि त्या ठिकाणी जी झोपडपट्टी आहे. ती शासनाने स्वातंत्र्याच्या रौप्य महोत्सवानिमित्त भुमिहीन शेतमजूरांना दिलेली ती जमिन आहे. शासनाचे त्याच्यावरती मंजूरी पत्रक आहे. ती झोपडपट्टी जरी सी.आर.झेड ने बाधित असली तरी १९७५ च्या पूर्वी दिलेली आहे. तिथे वसाहती आहे. तर सर, तीही जागा ह्याच्यामध्ये इन्क्लूड करायला पाहिजे. त्याच सोबत आपल्या धावगीच्या डोंगरावरची घनकचऱ्याच्या बाजूचीही झोपडपट्टी त्याच्यामध्ये घेतली पाहिजे.

**मा. आयुक्त :-**

याच्यामध्ये मी आपल्याला सांगितल्याप्रमाणे आपण ह्या सगळ्या झोपडपट्टया घेणार आहोत. ज्याठिकाणी आपल्या ३५ झोपडपट्टया आहेत. त्या सगळ्याच्या सगळ्या आपण टप्या-टप्याने घेणार आहोत. फक्त एवढाच आहे की, ज्याठिकाणी केंद्रसरकारच्या जमिनी असतील त्या ठिकाणी केंद्र सरकारची एन.ओ.सी. घ्यायची आहे. ज्या ठिकाणी सी.आर.झेउ असेल त्याठिकाणी सी.आर.झेड उठवण्यासाठी प्रयत्न करणार आहोत. ज्या क्लिअर आहेत त्याच फक्त आपण आता घेतलेल्या आहेत.

**जोजफ घोन्सालवीस :-**

माननिय महापौरांच्या परवानगीने बोलत आहे. साहेब, आता सन्मा. सदस्य लिओ कोलासो साहेब बोलले. धावगीची जी झोपडपट्टी आहे ती सुद्धा ह्याच्यात घेतली पाहिजे. तर आता आपण तिकडे डंम्पिग ग्राउंड करणार आहोत.

**रोहित सुवर्णा :-**

डंम्पिंग ग्राउंड नाही. घनकचरा व्यवस्थापन.

**जोजफ घोन्सालवीस :-**

तिकडेच लोकांना आपण शिफ्ट करणार आहोत ना.

**आसिफ शेख :-**

साहेब, जेव्हा तुम्ही यादी तयार केली तेव्हा एक-एक पत्र जर तुम्ही प्रत्येक नगरसेवकाला दिले असत. आपापल्याप्रमाणे झोपड्या क्लिअन असतील तर बरं झालं असतं. हा विषय पुन्हा प्रत्येक सदस्य बोलत आहे.

**रोहित सुवर्णा :-**

तुम्ही विचारा त्याच्या केबिनमध्ये बसून..

**जोजफ घोन्सालवीस :-**

साहेब, नक्की काय आहे. ते जे डंम्पिंग ग्राउंन्ड आपण बनवणार आहोत. तिथे वस्ती आहे तर ती आपण तिथुन हलवणार आहोत की, त्यांना आपण तिथेच ठेवणार आहोत. सन्मा. लिओ कोलासो यांनी आता जी सुचना केली की, त्या झोपडपट्टीत सुद्धा बांधकाम झाली पाहिजेत. तर नक्की आपण काय करणार आहोत. ते ठेवणार आहोत की तिथून हलवणार आहोत. साहेब, आपण उत्तर द्यावे. म्हणजे तुम्ही तिथून हलवणार नाही त्यांना. ती पण माणसं आहेत.

**मा. महापौर :-**

सचिवांनी, पुढील विषय घ्यावा.

(नगरसचिवांनी प्र. क्र. ८८ चे वाचन केले.)

**लिओ कोलासो :-**

मी हा प्रस्ताव मागे घेतला आहे.

**मा. महापौर :-**

सन्मा. सभापती लिओ कोलासो प्रभाग समिती क्र.१ यांनी 'ज' चा जो प्रस्ताव दिलेला आहे. तो त्यांनी मागे घेतलेला आहे. सचिवांनी पुढील विषय घ्यावा.

**प्रकरण क्र. ८८ :-**

सन्मा. सभापती, प्रभाग समिती क्र. १ श्री. लिओ कोलासो यांचे दिनांक १०/११/२००६ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. - महापालिका आस्थापनेवरील कर्मचारी वर्गाच्या सेवा जेष्ठता प्रकरणात / वेतनवाढीस सलग सेवेत / अनेक कर्मचाऱ्यावर अन्याय झाल्यामुळे त्या कामी सभागृहाची समिती नेमून अहवाल तयार करण्याबाबत.

(मा. महापौर मॅडम च्या परवानगीने सदरचा प्रस्ताव मागे घेण्यात आला.)

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. ८९ चे वाचन केले.)

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्या नयना म्हात्रे यांनी दिलेला जो प्रस्ताव आहे तो गेल्यावेळेसच मा. आयुक्त साहेब, नगररचना विभाग यांच्याकडे बसून त्या माझ्या दालनात जेव्हा आल्या होत्या. तेव्हा ह्या विषयावर चर्चा झाली आणि नंतर मी मा. आयुक्त, नगरविभागाचे अधिकारी यांच्याकडे बसून या विषयावर चर्चा केली. तत्पूर्वी त्यांनी हा गोषवारा सहित घेण्यात येणार आहे. सध्या हा विषय पेंडिग ठेवण्यात येईल.

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, तुम्ही गेल्यावेळेस सुद्धा अशाच बोलला होतात.

**मा. महापौर :-**

आपण हा विषय 'ज' च्या प्रस्तावाखाली दिलेला आहे. आज गोषवारा तयार आहे आणि तो आपल्याकडे आलेला आहे.

**रोहित सुवर्णा :-**

मा. महापौर मॅडम, त्याठिकाणी मी तुम्हांला क्लिअर कटपणे सांगू इच्छितो की, महानगरपालिकेचे अधिकारी फक्त बिल्डरकडून ४० घर घेतात. १०१ घराचा ताबा घ्या. असे बिल्डरने आपल्याला लेखी पत्र पाठविलेले आहे. मी दोन महिन्यामध्ये १०१ घरांचा ताबा देणार आहे. तर आपण १०१ घरांचा ताबा घ्या. मग गोषवाऱ्यामध्ये विषयपत्रिका आणा. परत असे. लिंगरींग ठेवाल तर मग परत लेट होतो. लेखी पत्र दिलय आपल्याला. आणि १०१ घरांचा ताबा देताना आदिवासी विकास विभागाने मा. आयुक्तांना पत्रव्यवहारा केलेला आहे. आदिवासी विभागात जो कातकरी समाज आहे. त्या आदिम जमातीच्या लोकांना प्राधान्याने तुम्हांला युद्धपातळीवरती त्यांचे पुनर्वसन करायचे आहे. तसेच जे लोक बेघर झालेले आहेत. जे आपल्याला धोरण ठरवायचे आहे. बिल्डरकडून आपण १०१ घरांचा ताबा घ्या. पाहिजेत तिथे सिक्युरिटी लावा. महापालिकेच्या नगररचना विभागाचे असे म्हणणे आहे की, लोकांनी काचा फोडल्या तर. आपण ताबा घेणार त्याच रक्षण कोण करणार? त्याचे रक्षण करण्यासाठी आपल्याकडे सिक्युरिटी आहे. तर आपण कृपया तशी रुलिंग द्यावी. मी पुढच्या वेळी तो विषय आपण विषयपत्रिकेवर रितसर आणावा. लेखी पत्र दिलेले आहे.

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, आमच्याकडे लेखी पत्र आहे.

**रोहित सुवर्णा :-**

दि. १४/६/२००६ ला पत्र दिलेले आहे की मी दि. १४/८/२००६ ला ताबा देणार आहे. मा. महापौर मॅडम, कृपया आपण ह्याच्यावर रुलिंग द्यावी.

**मा. महापौर :-**

पुढील मिटींगमध्ये धोरण ठरवण्यासाठी हा विषय ठेवण्यात येणार आहे. गोषवारा आलेला आहे व तोपर्यंत आपल्या ती १०१ घरेसुद्धा आपल्या ताब्यात येतील.

**रोहित सुवर्णा :-**

मा. महापौर मॅडम, धन्यवाद.

**मा. महापौर :-**

नगरसचिवांनी पुढील विषय घ्यावा.

**प्रकरण क्र. ८९ :-**

सन्मा. सदस्या श्रीम. नयना गजानन म्हात्रे यांचे दिनांक १०/११/२००६ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. - मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात विकास योजनेच्या कामामुळे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर, भोला नगर येथील लोक विस्थापित झाले. योजनेत रस्ता रुंदीकरणात विस्थापित झालेल्यांना प्राधान्य देऊन घरे उपलब्ध करून देण्यात यावीत असे स्पष्ट निर्देश शासनाने मनपाकडे दिले आहेत. आरक्षण क्र. २२२ व २२२अ (बेघरांसाठी घर) या जा्गेच्या मालकाने / विकासकाने १०१ सदनिका मनपाकडे दि. १६/०८/२००६ रोजी विनामुल्य हस्तांतरीत करणार आहेत असे लेखी पत्र दिले आहे. तरी मनपा ने १०१ सदनिका ताब्यात घेऊन विकास नियंत्रण नियमावलीतील विनियम क्र. ९ टेबल ३-१ ब नुसार विकास योजना अंमलबजावणी कामी विस्तापीत होणाऱ्या झोपडीधारकांना सदरील घरे देऊन पुर्नवसन करणे व घरे वाटप करण्याबाबत मनपाने धोरण निश्चीत करून योग्य निर्णय घेणेबाबत.

(मा. महापौर सोा. ह्यांच्या आदेशानुसार सदरील प्रस्ताव पुढील महासभेत प्रशासनाकरण गोषवाऱ्यासह विषयपत्रिकेवर घेण्यात येईल.)

(नगरसचिवांनी प्र. क्र. ९० चे वाचन केले.)

**महेंद्रसिंग चौहाण :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका महासभा दि. १२/०८/२००५ में ठराव क्र. २९ अन्वये उद्यान अधिक्षक पद के लिए सेवाशर्ती नियम कि गए थे। उसपद में और सेवा नियम सदर पदाचे मा. महासभा दि. १२/८/२००५ का ठराव क्र. २९ मध्ये सेवा नियमात बदल करुन खालीलप्रमाणे सेवा नियम करण्यात आलेले आहे. उद्यान निरिक्षक १०० टक्के पदोन्नती इसमें मान्यताप्राप्त कृषी विदयापिठाची पदवी या पदविका प्राप्त एल.एस.जी.डी. परिक्षा प्राप्त, एल.एस.जी. परिक्षा प्राप्त. भाईंदर नगरपरिषद महानगरपालिका शहरातील उदयाने, बगिचे व रस्त्याचे कडेला दुतर्फा झाडे लावणे व त्यांची दैनंदिन निगा, विकास व तत्सम कामाचा किमान ३ वर्षाचा अनुभव पहले जो ५ वर्ष का था उसको कम करके ३ वर्ष किया है। महाराष्ट्र राज्य तंत्र व उच्च तंत्र शिक्षण मुंबई यांचे अधिकृत एम.एस.सी.आय. टी परिक्षा उत्तीर्ण। इस तरह का चेंज किया गया है। उसके बाद दुसरा था उद्यान विद्या सहाय्यक। इसमें भी पदोन्नती १०० टक्के की गयी है। इसमें मान्यताप्राप्त कृषी विदयापिठाची पदविका प्राप्त, एल.एस.जी.डी. परिक्षा उत्तीर्ण। भाईंदर नगरपरिषद मे कामकाज किमान ३ वर्षाचा अनुभव। पहले ५ वर्ष का था इसमें ३ वर्ष का अनुभव दर्शाया गया है। महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ मुंबई यांचे अधिकृत एम.एस.-सी.आय.टी परिक्षा उत्तीर्ण। इस तरह का यह ठराव मे सुचित करता हूँ। कृपया इस तरह से सुधार किया जाए।

**रोहित सुवर्णा :-**

आमचा या विषयाला विरोध आहे.

**प्रकाश दुबोले :-**

मा. महापौर मॅडम, हा जो ठराव झालेला आहे.

**शुभांगी नाईक :-**

मा. महापौर मॅडम, हा ठराव फेटाळण्यात यावा. जे क्वालिफिकेशन शासनाने दिलेले आहे. त्यापेक्षा हे क्वालिफिकेशन कमी आहे. जे शासनाने गेल्या महासभेला ठराव ठरवलेला होता त्यावर मा. नगरसचिवांची सही आहे व तो ठराव मंजूर झालेला आहे. मग आता हा ठराव आणण्याची गरज काय?

**प्रकाश दुबोले :-**

मा. महापौर मॅडम, नियमावली सुद्धा मंजूर झालेली आहे. आणि शासनाकडे मंजूरी साठी गेलेला आहे. या सभागृहाने नियमावली मंजूर केलेली आहे आणि आता शैक्षणिक पात्रता कमी का करण्यात येत आहे.

**शुभांगी नाईक :-**

मा. महापौर मॅडम, हा ठराव फेटाळण्यात यावा.

**आसिफ शेख :-**

सन्मा. महापौर मॅडम, या ठिकाणी सन्मा. सदस्य महेंद्रसिंग चौहाण साहेबांनी जो 'ज' खाली प्रस्ताव ठेवलेला आहे. यांचे त्यांनी वाचन केलेले आहे. आणि आपण आपल्या अखत्यारीत सन्मा. आयुक्त साहेब आणि सन्मा. महापौर मॅडम योग्य तो निर्णय आपण या संदर्भात घ्यावा आपल्याला अशी माझी विनंती आहे.

**शुभांगी नाईक :-**

पण, मागच्या मा. महासभेत हा ठराव झालेला आहे ना मग पुन्हा कशाला आणायचे झाले ना क्वॅलिफिकेशन काय आहे ते समजले ना.

**सुर्यकांत भोईर :-**

मागे हा ठराव मजुंर झालेला आहे मग पुन्हा ठराव का आणता?

**शुभांगी नाईक :-**

ठराव पुन्हा आणायची गरजच काय आहे.

**प्रकाश दुबोले :-**

मा. महापौर मॅडम, हा मंजूर झालेला ठराव आहे. नियमावली मंजूर आहे आणि हे पुन्हा येथे कशाला?

**शुभांगी नाईक :-**

हा ठराव झालेला आहे हे आपण बघा.

**प्रकाश दुबोले :-**

शैक्षणीक पात्रतेमध्ये सुट देउु नये.

**शुभांगी नाईक :-**

हा ठराव फेटाळण्यात यावा.

**प्रकाश दुबोले :-**

मा. महापौर मॅडम, शैक्षणीक पात्रतेमध्ये कोणालाही सुट देउ नये.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, जर असे असेल तर ठरावाच्या बाजुने मतदान दयावे.

**रोहीत सुवर्णा :-**

फक्त एका पदासाठी ज खाली प्रस्ताव आणलेला आहे. गरज नसताना विषयपत्रिकेवर विषय आणलेला आहे.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

सन २००५ मे ऐसा कोई सुधार इसमे बाकायदा दिया हुआ है।

(सभागृहात गोंधळ )

**आसिफ शेख :-**

सन्मा. महापौर मॅडम, या विषयाला यापुर्वीच मा. महासभेत ठराव झालेला आहे.

**रोहीत सुवर्णा :-**

म्हणून आम्ही बोलत आहोत की, परत गरज नाही.

**आसिफ शेख :-**

सन्मा. सदस्य महेद्रसिंग चौहाण साहेबांनी ज चा प्रस्ताव आणला आहे. तर आपण या प्रस्तावावर आपण आपल्या अखत्यारित निर्णय घ्यावा. मा. आयूक्त साहेब आणि मा. महापौर मॅडम, आपण दोघांनी म्हणजे रामबाण उपाय सांगतो .

**रोहीत सुवर्णा :-**

परत गरज नाही तर मा. महासभेमध्ये एकदा मंजुरी मिळाली आहे तर परत गरज नाही आहे.

**शुभांगी नाईक :-**

मंजुरी ठरावास मिळाली आहे परत कशाला विषय आणला?

**रोहीत सुवर्णा :-**

सेटींग झाली असेल तर तसे सांगा की, सेटींग झालेली आहे.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

किसी भी तरह से ठराव का मुल रुप बदला नही गया है। लेकीन ५ साल का जो ज्ञान था असे ३ वर्ष किया गया यह पहले भी था अभी भी किया गया। यह सर्व संमती से।

**मिलन म्हात्रे :-**

नही यह झुठ बोल रहे है।

**महेंद्रसिंग चौहाण :-**

चलिए ५ साल किजिए। मुझे कोई प्रॉब्लेम नही है।

**रोहीत सुवर्णा :-**

नही, लेकिन नंबर १ मे क्या है।

**महेंद्रसिंग चौहाण :-**

कोई प्रॉब्लेम नही है। अनुभव का १५ साल किजिए कोई ऑब्जेक्शन नही है। आप ५ साल किजिए।

**रोहीत सुवर्णा :-**

मा. महापौर मॅडम, मान्यता प्राप्त कृषी विदयापिठाची बी.एस.सी ॲग्रीकल्चर किंवा हॉर्ल्टीकल्चर परीक्षा उर्त्तीण असणे असे मा. महासभेने मंजुरी दिलेली आहे.

**शुभांगी नाईक :-**

मंजुरी दिलेली आहे आणि सचिवांनी सही केली आहे .

**रोहीत सुवर्णा :-**

मा. महापौर मॅडम आणि आता आज ......

**महेंद्रसिंग चौहाण :-**

अभी भी मुल ठराव मे मान्यता प्राप्त कृषी विद्यापीठ की पदवी अभी भी ठराव मे यही शब्द है।

**रोहीत सुवर्णा :-**

पदविका  क्यु है यहा आया? पदविका का मतलब है डिप्लोमा।

**महेंद्रसिंग चौहाण :-**

यही सबजेक्ट है और मान्यता प्राप्त कृषी विद्यापीठ से है यह वह अक्षर है। जो आप बोल रहे है।

**रोहीत सुवर्णा :-**

नाही, मा. महापौर मॅडम, त्या ठिकाणी पदवी ऑब्लीक पदविका करण्यात आले आहे. पदविका म्हणजे डिप्लोमा एक वर्षाची किंवा दोन वर्षाची असते. पण पदवी म्हणजे डिग्री असते डिग्री पाच वर्षाची असते ती कृषी विद्यापीठ देते. ह्याच्यात बदल करण्यात आला आहे. जाणुन बुजून ऑब्लीक शब्द टाकला आहे म्हणजे खेळ जशी तुमची कोणीतरी खोटी सही केली तस त्याच्यामध्ये एक ॲड केले आहे.

**लिओ कोलासो :-**

पुन्हा - पुन्हा बोलु नका खोट्या सहीच प्रकरण पुन्हा का काढत आहेत.

**रोहीत सुवर्णा :-**

मॅडम, बोलल्या आहेत ना, ती माझी सही नाही म्हणून बोललो खोटी सही लागत पण काय करणार सन्मा. सदस्य महेंद्रसिंग साहेबांची कुठेतरी सेटींग झालेली आहे असे वाटते.

**हॅरल बोर्जीस :-**

सन्मा. महापौर मॅडम, सभेला ...........

**महेंद्रसिंग चौहाण :-**

आपको इस प्रकारका कोई भी अधिकार नही है ठराव के बारे मे बोलने का आप कृपया ..........

**रोहीत सुवर्णा :-**

सब अधिकार है। मैं सुचना दे रहा हु।

**महेंद्रसिंग चौहाण :-**

आप कृपया अपना देखिए। आप निवेदन कर सकते है। सुचना नही कर सकते हो।

**रोहीत सुवर्णा :-**

में ठराव नही मांड रहा हुँ। अगर आप गलत कर रहे है। मा. महापौर मॅडम गलत कर रहे है। स्विकृत नगरसेवक आप भी थे। आप को भी यह सब मालुम है।

**महेंद्रसिंग चौहाण :-**

मॅडम, समय से जादा किसीको सभागृहमे बोलने भी नही देना चाहिऐ।

**रोहीत सुवर्णा :-**

आप कौन होते हो बोलने वाले?

**महेंद्रसिंग चौहाण :-**

बोलने का क्या? हमे यहा साडे १४ साल हुऐ यह देखते हुए हम तुम जैसेको यहा पर सिखाते है। तुमको क्या आता है।

**रोहीत सुवर्णा :-**

पर आप कुच काम के नही है। हमे १४ साल हुए है और तुम्हे साडे चार साल हुए है।

**हॅरल बोर्जीस :-**

मा. महापौर मॅडम, मी सर्व सभागृहासमोर शोकप्रस्ताव मांडण्यासाठी आपल्याकडे परवानगी मागत आहे.

**प्रकाश दुबोले :-**

या विषयावर रुलिंग तर द्या ना.

**रोहीत सुवर्णा :-**

मा. महापौर मॅडम, आमच्या विषयात काय झाले यावर रुलिंग द्यावी.

**प्रकाश दुबोले :-**

महापौर मॅडम, 'ज' च्या प्रस्तावाचे काय झाले.

**आसिफ शेख :-**

पुढच्या सभेत सांगणार.

**रोहीत सुवर्णा :-**

महापौर मॅडम, 'ज' च्या प्रस्तावाचे काय झाले.

**शुभांगी नाईक :-**

महापौर मॅडम, 'ज' च्या प्रस्तावाबद्दल रुलिंग द्या ना.

**मा. महापौर :-**

ठराव मंजुर करण्यात आला.

**प्रकरण क्र. ९० :-**

सन्मा. सभापती, प्रभाग समिती क्र. २ श्री. महेंद्रसिंह चौहान यांचे दिनांक १४/११/२००६ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. - मिरा भाईंदर महानगरपालिकेने दि. १२/८/२००५ अन्वये ठराव क्र. २९ नुसार सेवा प्रवेश नियम २००५ नुसार सेवा प्रवेशांना मंजुरी दिलेली होती. सदर सेवा प्रवेशात उद्यान विभागाकरिता उद्यान अधिक्षक, व उद्यान विद्या सहाय्यक ह्या पदांकरिता शैक्षणिक व इतर अर्हतेबाबत.

**ठराव क्र. ६७ :-**

मिरा-भाईदर महानगरपालिका मा. महासभा दि. १२/०८/२००५ ठराव क्र.२९ अन्वये उदयान अधिक्षक पदाचे सेवानियम करण्यात आले आहेत. सदर पद हे वर्ग -३ चे सेवा नियम असल्याने सदर पदाचे मा. महासभा दि. १२/०८/२००५ ठराव क्र. २९ मध्ये सेवा नियमात बदल करून खालील प्रमाणे सेवानियम करण्यात यावेत.

| १ | २ | ३ | ४ | ५ |
|---|---|---|---|---|
| १ | उद्यान अधिक्षक | १ पदोन्नती (१०० %) | | १) मान्यता प्राप्त कृषी विद्यापिठाची पदवी / पदविका प्राप्त<br>२) एल. एस. जी. डी. परिक्षा प्राप्त<br>३) एल. जी. एस. परिक्षा प्राप्त<br>४) भाईदर नगरपरिषद / महानगरपालिका शहरातील उद्याने, बगीचे व रस्त्याच्या कडेला दुतर्फा झाडे लावणे. त्यांचे दैनंदिन निगा, विकास व तत्सम कामांचा किमान ३ वर्षाचा अनुभव<br>५) महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण मंडळ मुंबई यांचेकडील अधिकृत MS-CIT परिक्षा उत्तीर्ण |
| २ | उद्यान विद्या सहाय्यक | २पदोन्नती (१०० %) | | १) मान्यता प्राप्त कृषि विद्यापिठाची पदविका प्राप्त<br>२) एल. एस. जी. डी. परिक्षाउत्तीर्ण<br>३) भाईंदर नगरपरिषद / महानगरपालिका शहरातील उद्याने, बगीचे व रस्त्याच्या कडेला दुतर्फा झाडे लावणे. त्यांचे दैनंदिन निगा, विकास व तत्सम कामांचा किमान ३ वर्षाचा अनुभव<br>४) महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण मंडळ मुंबई यांचेकडील अधिकृत MS-CIT परिक्षा उत्तीर्ण |

वरील प्रमाणे सेवा नियमास व त्यानुसार पद भरणे बाबत पुढील कार्यवाही करण्यात मंजूरी देण्यात येत आहे. सदर ठरावाची इतिवृत्तांत मंजूरीची वाट न पाहता मा. सचिवांनी ठरावाचे वाचन करून तातडीने अंमलबजावणी करण्यात यावी.

**सुचक :- श्री. महेंद्रसिंह चौहान.** **अनुमोदन :- श्री. लिओ कोलासो.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**हॅरल बोर्जीस :-**

मिरा - भाईंदरमहानगरपालिकेच्या आपल्या राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे आणि या सदनाचे सदस्या सौ. जिवी हिरा वाडे मॅडम यांचे पती श्री. हिरा वाडे यांचे दिनांक २४ ऑक्टोबर, २००६ रोजी दुःखद निधन झालेले आहे. तर यांच्या निधनाबद्दल ही महासभा शोक प्रकट करते असा मी ठराव मांडतो.

**आसिफ शेख :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

ठराव मंजुर.

**नगरसचिव :-**

सर्वांनी २ मिनिटे उभे राहायचे आहे.

**दुःखवटा ठराव :-**

मिरा - भाईंदर महानगरपालिकेच्या आपल्या राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे आणि या सदनाचे सदस्या सौ. जिवी हिरा वाडे मॅडम यांचे पती श्री. हिरा वाडे यांचे दिनांक २४ ऑक्टोबर, २००६ रोजी दुःखद निधन झालेले आहे. त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो अशी ईश्वरचरणी प्रार्थना करुन त्यांना श्रद्धांजली वाहण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. हॅरल बोर्जीस.** **अनुमोदन :- श्री. आसिफ शेख.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(सभागृहामध्ये दोन मिनिटे शांतता राखण्यात आली.)

**मा. महापौर :-**

सर्व उपस्थित सन्मा. सदस्या, सन्मा. सदस्य, मनपा अधिकारी वर्ग, मनपा कर्मचारी वर्ग आपणा सर्वांचे आभार मानून आजची सभा संपल्याचे जाहिर करित आहे.

**सभा संपल्याची वेळ :- दु. ३.१५ वाजता.**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**